# मराठीचा मोहोर

म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. ९३८८
१०५५८

संग्राहक :

डॉ. ना. गो. नांदापूरकर
एम्. ए., पीएच्. डी.

REFBK-0009106

मूल्य १-४-०

# मराठीचा मोहोर

(मराठवाड्यांतील स्त्रीगीतांचा संग्रह)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 22458 दि.
क्रमांक
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ठा. क्र. ६१०५

संग्राहिक :

डॉ. ना. गो. नांदापूरकर

एम्. ए., पीएच्. डी.

REFBK-0009106

मूल्य १-४-०

प्रकाशक :
डॉ. ना. गो. नांदापूरकर
' आशीर्वाद '
इम्लीबन कुनबीगुडा,
हैदराबाद, आंध्रप्रदेश

आवृत्ति पहिली
१९५६
(सर्व हक्क स्वाधीन)

मुद्रक :-
जयहिंद प्रिंटिंग प्रेस
मालक व संचालक :-
भारत मुद्रक आणि प्रकाशक लि.
अ, ८।५५८ नारायणगुडा, हैदराबाद द.

मराठी ग्रंथालय,
अनुक्रम 22848 दि. 3/05
क्रमांक 23/e नों. दि. 30/9/1/4/60

# प्रस्तावना

आजचें युग लोकशाहीचें आहे. सर्व राज्य लोकमतानुवर्ति असून लोककल्याणाचा विचार दृष्टीसमोर ठेवूनच सर्व व्यवस्था होत असते. तद्वतच वाङमयांतहि लोकांच्या वाङमयाचा विचार सर्वप्रथम व्हायला पाहिजे. संस्कृतिसंपन्न असे आपण ज्या ज्या वेळीं वाङमयाचा विचार करतों त्या त्या वेळीं सुशिक्षित, प्रतिष्ठित, विद्वान अशा व्यक्तींनीं निर्माण केलेल्या वाङमयाचाच विचार करतों. धात्वर्थानें पाहिलें तर या प्रतिष्ठितांनीं आणि विद्वानांनीं निर्माण केलेला प्रकार लिखित आहे; आणि वाङमय तर वाणींतूनच निस्सरण व्हायला पाहिजे. या दृष्टीनें पाहिलें असतांना लोकांनीं निर्माण केलेला प्रकार, त्यांच्यांत निरक्षरतेचेंच प्रमाण अधिक असल्याकारणानें, केवळ मौखिक आहे, वाणीमय, वाक्‌मय आहे, तेंच खरें वाङमय. तेव्हां लोकवाङमयाचा विचार करतांना बहुधा अलिखित, मुखपरंपरेनें प्राप्त झालेलें जें ज्ञान त्याचाच विचार करायला पाहिजे. जनतेच्या भावभावनांचें, आचारविचारांचें आणि सर्व गोष्टींचें प्रतिबिंब ज्यांत उमटलें आहे अशा त्यांच्या वाङमयाचा आधीं विचार करावयास पाहिजे. लोकवाङमय म्हणजे माझ्या दृष्टीनें तरी लोकांनीं निर्माण केलेलें आणि मौखिक परंपरेनें प्राप्त झालेलें जें वाङमय तेंच होय. ह्याचा कर्ता लोकच अर्थात अज्ञात अशी लोकसमाजांतील व्यक्ति. यास्तव लोकांनीं केलेलें, लोकभाषेंत केलेलें आणि लोकांच्या परंपरेबरोबरच चालत आलेलें असें जें वाङमय तेंच लोकवाङमय होय.

कोणत्याहि समाजांतलें लोकवाङमय त्या समाजांतील संस्कृतीच्या विकासापासून चालत आलेलें असतें. हें वाङमय आपल्या समाजांतील संस्कृतीपासून आपल्या प्रेरणा घेतें नि जीवन रंगवितें. समाजांतील संस्कृति

बनते ती त्यांतील आचार–विचारांवरून. सामाजिकांच्या देवधर्माच्या कल्पना, साधुसंतांच्या कल्पना, तीर्थक्षेत्रांसंबंधींच्या कल्पना, सणावारांतील सदाचार, समाजांतील व्यक्तिव्यक्तींतील संबंध, व्यवहारांतील त्यांचे संकेत आणि समजुती त्याचप्रमाणें गृहजीवनांतील त्यांचें आचरण ह्या सर्व गोष्टींच्या योगानें त्यांचें काव्य निर्माण होतें. संक्षेपानें सांगावयाचें म्हणजे लोकवाङमयांत आपल्या समाजाचा सांस्कृतिक इतिहासच पहावयास सांपडतो. असा आपला काव्यमय इतिहास अभ्यासिणें हें अर्थात् क्रमप्राप्तच आहे. ह्या दृष्टीनें ह्या लोकवाङमयाचें महत्त्व फार आहे. लोकवाङमयाच्या ह्या प्रकारांत लोककथा, कहाण्या, आहाणे, उखाणे आणि लोकगीतें हीं येतात. "स्त्रीगीतें" हा प्रकार त्यांतीलच एक भाग आहे. वेदांची वाणी अगम्य आहे, कवींची कल्पना दिपविणारी असते, पण घराघरांतून मंजुळ नादानें झुळझुळ वाहणारी ही भाववाहिनी मोठी मोहविणारी नि लाघवी आहे. प्रत्येक स्त्री ही गानगंगा आहे. तिच्या अंत:करणाच्या गंगोत्रीपासून नि:सरण पावणारी गीतगंगा उज्ज्वल आणि पावन आहे.

जीवन हें विविध परींनीं नटलेलें असून मानव हा त्याचा एक अंश आहे. तो आपल्या कर्तृत्वाच्या योगानें स्वत:चें जीवन विकसित करण्याचा प्रयत्न करतो. त्याच्या ह्या प्रयत्नांत वाङमय हें एक साधन आहे. अथांग अशा जीवन-सागरावर हेलकावे खात असतां त्याच्या वृत्तींचें आणि भावनांचें जें आकुंचन आणि प्रसरण होतें तें तो पुढील मार्गदर्शनासाठीं आणि सद्य:स्थिति सह्य होण्यासाठीं जेव्हां शब्दनिबद्ध करतो तेव्हां तें साहित्य अथवा वाङमय बनतें. मराठी भाषेच्या जन्मापासून अशा प्रकारचें वाङमय निर्माण होत आलें आहे. महाराष्ट्र–जीवनसरितेवरील हे जीवनतरंग अनंत मुखांनीं निर्माण झाले. त्यांतील अल्पविभाग लेखन–निबद्ध झाला. पण उर्वरित विपुल भाग जो मौखिक परंपरेनें आपणापर्यंत आला तोच हा लोकवाङमयाच्या रूपानें प्रसिद्ध आहे. लिखित आणि अलिखित अशा दोन्ही प्रकारचें वाङमय संस्कृतीच्या अभ्यासासाठीं महत्त्वाचें आहे. पण विद्वानांनीं निर्माण केलेल्या ग्रांथिक वाङमयांत

संस्कृतीचें दर्शन अगदीं स्थूल रूपानेंच घडतें. त्यांत संस्कृतीच्या व्यापक अंगांचा विचार असून बारीक सारीक गोष्टींचा त्यांत अन्तर्भाव केलेला नसतो. समजांतील सर्व स्तरांचें चित्रण त्यांतून होणें शक्य नसतें. पण याउलट लोकवाङ्मयाचे निर्माते जनतेंतील, सर्वसाधारणांतील असल्याकारणानें आणि प्रस्तुत प्रकारांत तर स्त्रीसमाज असल्याकारणानें यांत संस्कृतींतील साध्यासुध्या गोष्टींचा विचार येतो. त्याचप्रमाणें त्यांच्या निर्मितींत धर्म, पंथ, वर्ण, जाति, शिक्षण इत्यादि कोणतेंहि बंधन नसल्याकारणानें समाजांतील सर्वच स्तरांतील गोष्टींचें दर्शन यांत घडतें. समाजांतील सर्व अंगांचा यांत अंतर्भाव होतो. अशा प्रकारच्या या लहान सहान गोष्टी म्हणजे समाजपुरुषाच्या मुद्रेवरील अनंत भावभावनांचें आलेखन होय. चित्रकारानें निर्मिलेल्या चित्रांत तो भिन्न भिन्न रंगच्छटांनीं विविध भावना निर्माण करून सौंदर्यांत संपूर्णता आणतो त्याचप्रमाणें ह्या गीतरूपी छटांनीं समाजपुरुषाचें संपूर्ण व्यक्तिदर्शन घडतें. ह्याचे निर्माते अज्ञात आहेत, अजान आहेत, स्त्रिया आहेत म्हणून ह्या वाङ्मयाची उपेक्षा करणें सर्वस्वी लांछनास्पद आहे.

आपल्या समाजांत अनेक देवदेवता आणि तीर्थस्थानें आहेत. त्यांची आपण उपासना करतों आणि त्यांचा आदर दर्शवितों. पण उपासनेंत सर्वांचीं पद्धति सारखी नाहीं. व्यंकटेशाची पद्धति वेगळी तर खंडोबाच्या उपासनेची पद्धति वेगळी. 'आठा दिवसा सुक्करवारीं । नैवेद्य खिचडीचा । जेवनार तातडीचा । देव बालाजी माझा ॥' तसाच 'बारीक तांदूळ । गंगाळीं भिजू घाला । पारन्यासाठीं आला । देव बालाजी माझा ॥' असा व्यंकटेश आहे. यांत तो तेलंगी असून त्यास लक्ष्मी आणि पद्‌मावती अशा दोन पत्न्या आहेत, त्याचा वार शुक्रवार, साखरेची शिरणी, खिचडीचा नैवेद्य, वर्षांतून एकदा पारणें, इत्यादि गोष्टी कळतात तर खंडोबासंबंधीं त्याची सट, तळी उचलणें, बेलभंडार उधळणें, इत्यादि गोष्टी कळतात. त्याचबरोबर त्याचें वैशिष्टयहि त्यांनीं वर्णन केलें आहे तें असें, 'धनगरवाडयांत । कुतरी भुकती । देवा मल्हारीनं । बानू नेली कोन्या गति ॥' धनगरवाडयांत । कुतऱ्याहुचचा केंगा । देवा मल्हारीनं ।

बानू तेली लालबागा ' 'धनगरीन बाई । तुह्या ताकामंदी माशा । देव ह्यो मल्हारी । सोडीना तुहा पिच्छा. ' देवींच्या वर्णनांत तिची भोगी, कल्लोळ, पोत, वहनें, मंगळवार इत्यादि अनेक उल्लेख येतात. एवंच देवतांच्या वर्णनांत त्यांच्या सर्व वैशिष्टयांचा उल्लेख असतो. विठोबाच्या वैशिष्टयांत तुळशीची माळ, अबीर, बुक्का, दिंड्या, भजन, दहिहंडी, गोपाळकाला, दर्शनाची बारी, एकादशी, गरुडखांब इत्यादि सर्व गोष्टींचा निर्देश आगत्यानें येऊन आठवण उजळून निघते. पण ह्या सर्वांहून अधिक म्हणजे विठ्ठल हा कानडा असून तो कोणाचें कुलदैवत नाहीं, तो वारकऱ्यांचा आहे ही गोष्ट विशेष महत्त्वाची वाटते. 'पंढ-रीचा देव । नाही कोनाच्या देव्हारीं । माळकऱ्यांच्या हुर्दावरी ' 'कानडी रुक्माबाई । कानडी तिची चाल । तिच्या उजव्या बाहीवरी । देव नारायन लाल.' तसेंच कुशावर्त तीर्थासंबंधीं त्या सांगतील, 'शेंडीचं नारेळ । कुशावर्ताला वाह्याचं । मूळ गंगचं पाह्याचं ॥ ' 'नाशिक त्रिंबक । गंगाबाईचं माहेर । जरीच्या पातळाचे । केलें रामान आहेर ' आणि परळीसंबंधीं म्हणतील " परळी गावामध्यें । देव वैजोबा उमाटीं । देली मैदानीं राहोटीं । जगमित्र नागांनीं." एवंच देवदेवतांच्या भक्तिप्रकारां-सह त्यांच्या ऐतिहासिक कुळकथाहि यांतून पहावयास सांपडतात.

तीर्थक्षेत्रांप्रमाणेंच यांतून साधुसंतांचे अनेक उल्लेख आहेत. जवळ जवळ त्यांचीं जीवनचित्रेंच म्हटलें तरी चालेल. पण याहिपेक्षां योग्य म्हणजे त्यांचीं तीं भावचित्रणें आहेत. यात ज्ञानेश्वरादि चारीं भावंडें आणि त्यांचें साधुत्व आहे, एकनाथ आणि त्यांचा श्रीखंड्या आहे. तुकारामांचें सदेह स्वर्गगमन आहे, त्यांच्या बीजेचा उल्लेख आहे. नाथांच्या षष्ठीचा निर्देश आहे. आषाढी-कार्तिकीच्या वाऱ्या आहेत. दामाजीचें प्रकरण आहे. नामदेवाचें लग्न आहे. जनीविषयीं तर पुसूंच नका. 'सोन्याचं घुंगरू । देवाच्या गाईला । तीनशें साठ मोती । जनाबाईच्या रईला ॥ ' असा तिचा सर्व जीवनक्रमच पांडुरंगमय आहे. हे संत म्हणजे आमच्या संस्कृतीचे संरक्षक आणि सुधारक होत. ह्या संतसंकीर्तनांत पुरातन, त्याचप्रमाणें आधुनिक काळांतील लहान मोठ्या अनेक संतांचीं चरित्रें

आहेत. आणि तीं त्यांच्या वैशिष्टयांसह आहेत. त्यांत लोणीचे सखाराम महाराज, येहळेगांवचे तुकाराम महाराज नि उमरखेडचे आईनाथ आहेत. 'टाकळीला जाया', 'गंगामाईचं निमित्त' असलं तरी 'दाजी महाराजांच्या भेटीचं अगत्य' आहे. 'नारायन गडावरीं। शिंग वाजतं दोहेरी। महचा भगवान बाबाचा। मेना निघाला बाहेरी॥' असा वंजारी संताचा वैभवासह उल्लेख आहे. औशाच्या महाराजांचा नि अनेक साधूंचा उल्लेख आहे. यासमवेतच उल्लेखनीय गोष्ट म्हणजे गुरुभक्तीची. गुरु मोक्षाला नेतात, संसारसागरांतून तारतात आणि जन्ममरणाचा फेरा चुकवितात, असा त्यांचा दृढ भाव आहे. गुरूंच्या संबंधीं मनांत असलेला नितान्त आदर त्यांनीं आपल्या कवनांत प्रगट करून भक्तीच्या उमाळ्यांनीं गुरूचे गोडवे अनेक प्रकारांनीं गायिले आहेत. एवंच धर्मविषयक, उपासनापर, साधुसंतांसंबधीं त्या सर्वांच्या वैशिष्टयांसह त्यांचीं चित्रणें यांतून आहेत.

सामाजिक आणि घरगुती जीवनांतील व्यवहारांत माता-पिता, बहीण-भाऊ, बहिणी-बहिणी, कन्या-पुत्र, जांवई, सासू-सासरा, नणंदा-भावजया, दीर-जावा, मामा-मावशी,पति-पत्नी इत्यादि अनेक नात्यांनीं वागावें लागतें. या सर्वांचें सम्यक् दर्शन यांतून घडतें. या सर्व नात्यांइतकेंच जवळचें एक शेजारपणाचें नातें असतें. शेजीसारखी मायबहीण नाहीं, आणि शेजीसारखी वैरीण नाहीं. 'शेजारिनी बाई। एका रस्त्यानं वागूं। तुझी मैना माझा राघू' 'शेजी शिव्या देती। माझ्या बाळाला देखून। जाई ग तुझ्या कळचा। वटीं घेतल्या येचून' हिचें उभय प्रकारचें चित्र यांत असून तें नितांत सुन्दर आणि वास्तव आहे. गांवांतील मंडळींत पाटील, पांड्ये, भट आणि भांडचे या सर्वांचा समावेश होतो तसाच वाणी, वैराळ, चाटी, सोनार यांचाहि संबंध येतो. या सर्वांचीं व्यक्तिवैशिष्टयें या वाङमयांत पहावयास सांपडतात.'जातींमंदी जात। वैराळाची खरी। भरल्या बाजारीं। हात गरतीचा धरी' हें चित्रण खरें तर आहेच पण 'हात गरतीचा धरी' ह्या म्हणण्यांतील कोटी प्रथम विरोध उत्पन्न करून लगेच तिचा परिहार न सांगतांच करते हें तर

अत्यंत मार्मिक आणि हृद्य आहे. त्याचप्रमाणें जीवनांतील महत्त्वाचे प्रसंग जन्म, मरण, मुंज, लग्न, नहाण, गरोदरपण, बाळंतपण, भांडणें, वांटण्या, यात्रा इत्यादिहि यांत आहेत. यांत चुलत आहे, मालत आहे, सावत्र आहे, सवत आहे, दोन बायकांची हाऊस आहे, नाचणी आहेत, कळवांतणी आहेत, कोल्हाटणी आहेत, थोडक्यांत सांगायचें म्हणजे हें सर्व जें आपलें जीवन तें यांत आहे. हें वाङ्मय आपल्या सामाजिक आचारविचारांचें सार आहे, तसेंच भांडार आहे. समाजाच्या बऱ्यावाईट, दोन्हीं अंगांचें यांत चित्रण आहे. आणि त्यांतहि विशेष महत्त्वाची गोष्ट अशी कीं, तें स्वानुभवाच्या मुशींतून ओतून काढलें आहे. हें अगदीं यथातत्थ आहे. यांत असत्याला जागाच नाहीं. जें पाहिलें, साहिलें, तेंच गायिलें आहे.

शिक्षण आणि सुधारणा यांच्या योगानें समाजांत सपाट्यानें क्रांति होत आहे. आज ह्या गीतांतील विचारांशीं आपण परिचित असलों तरी पुढच्या पिढीसंबंधीं सांगतां येत नाहीं. यांतील पुष्कळशा गोष्टी नष्ट होणार हें निश्चित; पण म्हणून काय त्यांची आठवणहि आम्ही बुजवून टाकावी ? यांत समाजांतील सर्व घटकांचा सर्वांगीण इतिहास आहे. सामाजिक इतिहासाच्या दृष्टीनें या लोकवाङ्मयाचें महत्त्व विशेष आहे. हा इतिहास समाजांतील व्यक्तींनीं स्वतःसंबंधीहि लिहिला आहे आणि स्वसंबंधीं व्यक्तिविषयींहि लिहिला आहे. त्याचप्रमाणें तो सर्व स्तरांतील व्यक्तींनीं लिहिला आहे आणि कोणत्याहि प्रकारचा आडपडदा न ठेवतां लिहिला आहे. तेव्हां त्याचा संग्रह आणि अभ्यास होणें मराठीच्या विकासाच्या दृष्टीनें महत्त्वाचें आहे.

लोकगीतांचें दुसरें वैशिष्ट्य त्यांच्या काव्यात्मतेंत आहे. ह्या वाङ्मयाच्या प्रेरणाच मुळांत सामाजिक आहेत. तें समाजजीवनावर अधिष्ठित आहे. जीवनांतील विविध आणि हृदयस्पर्शी चित्रणें त्यांत आहेत. मानवी जीवनांत भावनेचें प्राबल्य अधिक नि सर्वत्र आहे. त्यांतहि स्त्री जात्याच भावनाप्रधान असते. तिचें जीवन पुरुषापेक्षां अधिक भावसंकुल असतें. प्रत्यक्ष जीवन हें खडतर असलें तरी तें

भावरम्य आणि सौंदर्यसंपन्न करून जगण्याची कला तिला प्राप्त झाली आहे. काव्य म्हणजे भावनांचा सहजरम्य आविष्कार आहे. रस होतो तो या भावनांचाच आणि वाङ्मयांतील आनंद जो असतो तोहि अर्थात् भावगम्यच. यास्तव भावनांचें आलेखन आणि उत्कटत्वानें चित्रण काव्यांत असावें लागतें. पण केवळ उत्कटत्वानेंच काम भागत नाहीं. उत्कटतेनें आस्वाद्य झालेल्या भावना सर्वदा आणि सर्वत्रच आनंद निर्माण करतील असें नाहीं. यासाठींच त्याच्यासमवेत उदात्तीकरणाची कसोटी शास्त्रकारांनीं लाविली आहे. भावनेचें उदात्तीकरण होऊन जेव्हां ती रसिकांच्या चित्तवृत्ति उचंबळून आणते आणि मन प्रसन्न करते तेव्हां तिच्यांत काव्य येतें.

काव्याच्या गुणांचा विचार करतांना प्रामुख्यानें भावनेचा उद्रेक, विषयाचें उदात्तीकरण, प्रतिभेची भरारी, वर्णनांतील विविधता, भाषेंतील आलंकारिकता आणि साधेपणा, रसोत्पत्ति आणि विविध व्यक्तिदर्शनें इत्यादींचा विचार करावा लागतो. यांच्या विपुल आणि सार्वत्रिक दर्शनानें त्या विशिष्ट प्रकरणीं काव्य निर्माण झालें असें आपण मानतों. या गीतांतील भावनोद्रेकासंबंधीं तर बोलायलाच नको किंवा बोलतच रहावें म्हटलें तरी चालेल. त्यांचें जीवनच मुळीं भावनामय असतें. यांत जीवनांतील विविध प्रसंग मनापासून गयिलेले असतात. सुखाच्या संवेदनांनीं मनाचा मळा पिकतो आणि त्यांत भावनांचीं कळ्या–फुलें मनमोकळेपणानें उत्फुल्ल होतात. एखाद्या स्त्रीला जर तिची जातकुळी आणि आईबाप विचारले तर ती सहजच पण भावनोत्कटतेनें म्हणते, 'माझी जातकुळी। मामारायाला पुसा। साकर झाली पुंड्या ऊंसा ॥' किंवा 'माझं कुळशीळ। कोन पुसत आंगनीं। खाशा बागाची लिंबोनी। हारन मायबाई ॥' यांतील भावना काय पुन्हा विवरण करून सांगायला पाहिजेत ? हा कळ्या–फुलांचा हार गळ्यांत घालून मिरवायची कुणाला लाज वाटेल ? ही गंगथडीच्या ऊंसाची साखर आहे, मराठवाड्याच्या मळ्यांतील लिंबोणी आहे. सुखाच्या प्रसंगांपासून जशा या सरिता वाहतात तशा दुःखाच्या दाहकतेंतहि या अंतःकरणास द्रववितात.

अंतःकरणाच्या कटाहांतून हा उमाळा जेव्हां बाहेर येतो तेव्हां बाहेर येतां येतांच काव्य त्याला वेढून घेतें. अनुभूतीच्या क्षेत्रांत येईल तें तेंच त्या सांगतात. पण काव्यकला त्यांच्या संगतीसाठीं त्यांच्या पंगतींतून मिरवते. काव्याचा खटाटोप हा त्यांनी केलाच नाहीं. ' जिवाला जाचनी। जशी झाडाला करवत। अंतरीचं दुःख। जिव्हाळ्याला सांगत ' असं होतं तेव्हांच हें काव्य बाहेर पडतं. एऱ्हवीं, ' अंतरी गुजाच्या। हृदयांत झाल्या गांठी। माय मावली ग माझे। सांठविल्या तुझ्यासाठीं ' अशी त्यांच्या काव्याची उत्पत्ति आहे. त्यांच्या जीवींचा हा जिव्हाळा आहे. ह्याजकडे हळुवार मनानेंच पाहिलें पाहिजे, ' देल्यानं घेतल्यानं। पानी पुरना नईच। गोड बोलन सईच। माय हरनीचं माझ्या ' असं त्यांचं काव्य मोठं गोड आणि भावरम्य आहे. सुखदुःखांच्या गळ्यांत गळा घालूनच स्त्री आपली जीवनकथा गाते. त्या समयींचे ते क्षण तिच्या भावतरंगिणींत सुस्नात होऊन उत्कंठेच्या उसळीसह बाहेर पडतात. तेव्हां त्यांची शोभा कांहीं अनुपम, अवर्णनीय असते.

हा तिचा भावनाविलास अनेक रूपें धारण करून येतो. मातेविषयीं माऊली म्हणते, " नदीला येतो पूर। लवनाला येतो फेस। गंगा वाहे बारमास। माय हारन माझी." दुसरी माऊली म्हणते, ' सरवे गोत। एका पेंडीचा आळा। माय ग वाचून। कोठं लागन जिव्हाळा ' तर तिसरी म्हणते, ' समुद्र शोपिल्यानं। जाईन माझी तहान। गंगा माझी आसमान। माय हारनाबाई ' जाळावांचून कढ नाहीं आणि मायेवांचून रड नाहीं म्हणतात तें काय उगीच आहे ? दुसरी दुसऱ्याच एका अवस्थेचें वर्णन करते, ' मायबापाच्या म्हागारी। भाऊ भावजया कोनाच्या। संपतीच्या सोयरीनी। चिमन्या चालल्या उन्हाच्या ' यांत किती आर्तता आहे ! केवढें हें विदारक आणि वास्तव चित्रण ! ज्या आईबापांच्या राज्यांत ' भरला तांब्या दिला नाही ' नि ' पुढलं ताट उचललं नाहीं, ' ' रांजनाचं पानी। झालं कोसाच्या मानीं,' त्यांच्यानंतर त्याच घरीं अशी स्थिति व्हावी कीं भाऊ-भावजयांनीं संपत्तीच्या तोऱ्यांत राहावं आणि बहिणींना, ह्या चिमण्यांना निवाराहि मिळू नये. हें चित्र

मनोहर असूनहि मनाच्या ठिकऱ्या उडविणारें नाहीं काय ? ही आई लेकीसंबंधीं कशी काळजीनें कोळपून गेली आहे तें पहा, " लेकीचा जन्म। रानांतली पातर। जीवा लागली कातर ', 'नलीच्या पलीकडे। लेक देऊन झाली येडी। सांगडीला हात जोडी.' आतां यांत भावना नाहीं असें कोण म्हणेल ?

यांतल्या शृंगारविषयक भावना पहा :– 'पान्याला बाई गेली। गेली अंधार करून। देली घागर भरून.' यांत घागर भरून देण्याच्या मिषानें प्रेमाविष्कार किती कोमलतेनें सुचविला आहे ! एकजण आपल्या पतीचें सुख सांगते, 'भ्रताराचं सुख। हांसून सांगती गोतांत। अंगावरल्या शेल्याची। केली सावली सेतांत–' दुसरी म्हणते, 'भ्रताराचं सुख। सांगती हांसुनी। केली सावली बसूनीं ' तिसरी म्हणते, 'काय सांगूं बाई। माझ्या चुड्याची नवती। भांगोभांग मोती। मह्या कुखाच्या भंवती. ' या त्यांच्या प्रेमभावनेंत शृंगाराची सूचना असून पतीच्या सौंदर्याचें नि वैभवाचें वर्णन पूर्ण भरलें आहे. स्वतःच्या शृंगारप्रमाणेंच त्या आपल्या भावाभावजयींचा शृंगारहि तितक्याच मुग्धपणें आणि सूचकतेनें चित्रितात. 'सीताबाई माझे। तुझ्या केसाचा येतो वास। भाई-राजसाच्या। केवडा मुंडाशांत', 'कोन कोमावली। मालन माझी मंदिरांत। बाई ईच्या भर्ताराच्या। फौजा गेल्या इंदूरांत.' भावजयीच्या सूचक शृंगार–भावनेप्रमाणेंच विरहावस्थाहि आकर्षक आहे. यांची सूचकता जशी मोहक असते तशी स्पष्टोक्तीहि दाहक असते. एक म्हणते, 'नवतीची नार। उभी राहिली वाटला। आंबा मव्हरानं दाटला.' दुसरी म्हणते, ' नवतीचे नारी। तुही नवती आवर। तुझ्या बोलन्याचा। पडला सख्याला बावर.' तिसरी तिच्याहि पुढें जाऊन सांगते, ' मव्हनी मव्हनी। मव्हनी घातली इड्यांत। सख्या सोयऱ्याचा। पाय ठरना जोड्यांत' यांत शृंगाराची सूचना आहे, स्पष्टोक्ति आहे आणि थोडासा निषेधहि आहे. पण यापुढील स्पष्टोक्ति तर उघड उघड अपमान करणारी आहे, 'माझ्या घरामागं झाड। येरंडाचा वारा घेतो। चहाटळ

नारी । कां ग तुला राग येतो ?' आतां यापेक्षां स्पष्ट कान–उघाडणी अजून कोणती असते ? यांत अश्लीलता अद्याप तरी आली नाहीं. भावना उदात्त करावी तर स्त्रियांनींच. त्यांचें जीवनच मुळीं त्यागमय, प्रेमपूर्ण आणि उदात्ततेनें भरलेलें असतें.

शृंगार, वात्सल्य, कारुण्य इत्यादींप्रमाणें त्यांच्या वाङ्मयांत विनोदहि पूर्ण भरला आहे. त्याच्या एक–दोन ओव्या पहा– 'सुभद्रा नांव घेती । करूं नका गलबला । क्रिष्णानं देलं मला । अर्जुना संन्याशाला', 'दळन दळीते । गव्हा ग हरबऱ्याचं । मव्हतुर माझ्या कारभाऱ्याचं', 'दोघी बायकाची । हाऊस आहे त गडयाला । दिवाळीच्या दिशीं । केली आंघूळ वढयाला,' 'पान्या पावसाची । आभाळाला आली खारी । हौशाला दोघी नारी । पलंग टाकीला बाहेरी', 'सकाळच्या प्रहरीं । काम मी करी घाई घाई । पाव्हने आले पायीं । मला यकादसी बाई', 'भरला समिंदर । वाजतू घडा घडा । नर्मदा बहिनीवरी । येऊ देईना सितूडा' या सर्वांत विनोद आहे. कोटीक्रम आहे, शृंगाराची सूचना आहे आणि सूचकतेसह संयम आहे.

आणखी दोन चार ओव्या पाहून दुसऱ्या विभागाकडे वळूं. 'बहीन भावंड । काहीं लागन भेद । सीता मालन माझी । रानी मव्हळाचा मध' यांतील मव्हळाच्या मधाची गोडी अभिनव तशीच अवीट आहे. 'गांवाला गेला । गांवाकडे माझा डोळा । नवतीचा पानमळा.' ह्या नवतीच्या पानमळ्यास डोळ्यांत तेल घालून जपायला नको काय ? 'दूरल्या देशींचा । हिंवसा वारा आला । प्रानाचा भाईराज । खुशाल आयकीला', 'भाऊ इन्हाई करीतें । जन मनी जुना पेंड । केळीचा वल्ला दांड । आम्ही बहीन भावंड' संसारांतील गोष्टींप्रमाणें हिला मृत्यूचीहि आठवण आहे, 'चालता बोलता । गाडा आखरीं खसला । राजहंस निघुनी गेला । साटा धरनीवर पडला,' पण हींत भीतीचा लवलेश नाहीं. मृत्यूप्रमाणें हिच्यांत देवाची भक्तिहि आहे. 'रात्र न दिवस । तुमच्या नांवाची घोकनी । सख्या इठुलाचे । टाळ वाजती सपनीं',

'इठ्ठल रुखमीन। नांदती पंढरपुरीं। आबीर बुक्याचा। छापा माझ्या चोळीवरी', 'इठ्ठल माझा पिता। रुक्मीन माझी आई। चंद्रभागा भावजई। येता जाता पाय धुई.' ती अशीं देवाशीं एकरूप होऊन बाहेर पडते.

आतां या वाङमयांतील कल्पनाविलास, रचनाचातुर्य आणि वर्णनाचा विचार करूं. काव्यांत भावनाविलास महत्त्वाचा असला तरी कल्पनाविलास आणि रचनाचातुर्यहि तितकेंच महत्त्वाचें आहे. भावनेची मांडणी नीटनेटकी आणि वेगवेगळ्या परीनें झाली कीं ती आल्हाददायक वाटते. तिच्यांत काव्य येतें. त्यासाठीं प्रत्येक वेळीं वेगळी भावना, वेगळा प्रसंग असलाच पाहिजे असें नाहीं. एकच वस्तु वा भावना निरनिराळ्या स्वरूपांत नि परिवेषांत प्रगट झाली कीं तिच्यांत भिन्नपणा आणि पृथगात्मता येतात. भिन्न दृष्टिकोणावर त्या गोष्टी अवलंबून असतात. ह्या वाङमयांतील व्यक्तिदर्शन स्त्रियांनीं आपापल्या कल्पनाकुसरीनें भिन्न परिसरांत करविलें आहे. त्यायोगें यांत नावीन्य नि नवलाई निश्चतपणेंच निर्माण होते.

रचनाचातुर्य, कल्पनाविलास, शैली, आलंकारिकता इ. गोष्टी विद्वत्तेच्या निदर्शक आहेत, आणि ही रचना तर बायाबापड्यांची आहे, असा प्रश्न सहजच आपल्या मनांत येईल. पण तें चुकीचें आहे. कवन म्हटलें कीं ह्या गोष्टी आपोआपच त्याजमागें लागतात. ह्याचा विचार त्यांत व्हावाच लागतो. आणि चमत्कार असा कीं ह्या सर्व गोष्टींची जाणीव काव्य करणाराला असते. सुज्ञ–सुशिक्षित ओळख ठेवून ह्या गोष्टींचा विचार करतात तर अज्ञ अभावितपणें, अनुकरणानें आणि अंगवळणी पडल्यामुळें ह्या गोष्टींचा उपयोग करतात. काव्य जेव्हां अंतःकरणांतून उचंबळून बाहेर पडतें तेव्हां तें विशिष्ट आकार घेऊन कल्पनेचा परिवेष धारण करूनच येतें. ह्या भावना भिन्न भिन्न वेळीं वेगवेगळ्या प्रकारांनीं व्यक्त होतात. अशा बोलण्याच्या ह्या भिन्न परि म्हणजेच अलंकार. हें उक्ति-वैचित्र्य या रचनेंत विपुल आहे. त्यांच्या प्रत्येक ओळींत जें वर्णन आहे आणि भावनेचा जो विलास आहे त्यांतून

हा खेळ दृष्टीस पडतो. एक दोन वर्णनें पहा :—' मैनाला झाली द्रिष्ट। हातच्या बिलवरा। कवळी तुही जानी। आंब्याचा फुलवरा', ' मोठे मोठे डोळे। भुवया वळन। मथुरेची गवळन। नेनंती प्रानसई', ' ब्राह्मनाचे पोरी। किती करशील यनी फनी। मही गवळन तुह्यावनी। माघं सारिल्या वानिनी', ' बाई उजेड पडला। नाकांतल्या मोरनीचा। भांग टिळा गवळनीचा। मह्या लाडक्या वहेनीचा', ' यवल्याचा पितांबर। भरला तोळाभर। नाजुक मैनाची कंवर। मिऱ्या पडल्या शंभर ' ह्यांतील उपमा, उत्प्रेक्षा, रूपकें, अतिशयोक्ति, आणि पर्या-योक्ति किती सुंदर आहेत ! वर्णनांतील कल्पना–विलासहि साधा असला तरी सांगण्याच्या पद्धतीनें किती तरी आकर्षक झाला आहे. " आडद्या पडद्यानं। सासू पाह्याती जावाई। केवडयाचं पान बाई" तद्वतच स्पष्टो-क्तीच्या धसमुसळेपणापेक्षां पर्यायोक्तीनें गुदगुल्या करीत सुचविलेला हा कल्पनाविलास खरेंच केवळ 'केतकीचं पान' वाटतो. स्वभावोक्तींतहि त्यांचा असाच प्रकार आहे. 'सिता सिता मनून। कवटाळितो झाड। सिता डोंगराच्या आड' ही रामाची शोकद अवस्था स्वाभोवोक्तीनें सुंदर चित्रिली आहे. 'दारवंटा उभी। मी त आपल्या भारानं। वहेनी मनून। हाक मारीली देरानं' स्वभावोक्तीनें रेखाटलेलें हें चित्र प्रत्येकानें पाहिलें आहे. पण कधीं हा विचार आला होता का ? हीं रचना साधी असली तरी भरीव आहे. चित्रण वास्तव असून वेधक आहे. अर्थबाहुल्यानें भावसिंचन केलें असलें तरी शद्ब थोडे आणि निवडक आहेत. ही रचना मधुर नाहीं काय ? ह्यांच्या रचनेंत आलंकारिकता भरपूर आहे-' मांडवाच्या मेढी। तुम्ही दूर दूर सरा। लक्ष्मीबाईच्या। रथाला जागा करा.' हींत व्याह्याचें वैभव सुचविलें तें फार सुंदर आहे, पण किती पर्यायानें, किती आढेवेढे घेत. चेतनगुणोक्तीच्या योगें मेढींवर सचेत-नत्वाचा आरोप करीत, अतिशयोक्तीचा पदर धरून ही कल्पनावधू जणूं स्वतःच्याच लग्नमंडपांत प्रविष्ट झाली आहे. आतां ही असंगति पहा 'मारीला इंद्रजित। ढासळल्या माड्या। खाईना दाना/चारा। याच्या कोतवाल घोड्या.' आतां यांत कशाशीं कांहीं संबंध आहे काय ?

इंद्रजिताच्या शोकानें माड्या मोडून पडल्या आणि घोड्यांनीं दाणा पाणी वर्ज केलें. कोठें कारण आणि कोठें कार्य ? पण ही असंगति कितीतरी काव्यमय आहे. ही आलंकारिक रचना तर संस्कृत कवींची आठवण करून देते. स्त्री आणि अलंकारांची आवड नसणें हें शक्य तरी आहे काय ?

अशा प्रकारें ही रचना अनेक अलंकारांना लेऊन निघते, अर्थाचा पदर धरून चालते आणि मनांत भोळा भाव चिंतीत असते. आणि वर नवल असें कीं हा सारा प्रकार अकृत्रिम आहे. हें अशिक्षित पाटव आहे. यांत प्रयत्नाचा खटाटोप नाहीं, सौंदर्याचें प्रसाधन नाहीं, आणि शब्दांची निवड करण्यास एक तर सवड नाहीं आणि दुसरें तेवढीं विवेचकताहि नसते. पण हें अकृत्रिम भोळं मन पाहून शब्द आणि अर्थ आपोआप येऊन बसतात. "वाचमर्थोनुधावति" असाच हा प्रकार आहे. मन मोहरून आलं कीं तें असं गीतरूपानं बाहेर फुटून येतं. वर्णनशैली अगदीं सरळ नि सूचक आहे, अल्पाक्षर नि ठसठशीत आहे, साधी दिसत असली तरी सालंकृत आहे.

त्यांचे व्यवहार साधे आहेत पण उक्तिवैचित्र्य मोठमोठ्या विद्वानांनींहि अभ्यास करण्याजोगें आहे. हेंच तर माय मराठीचं बोलणं आहे. वर विवेचिलेलीं उदाहरणें याचींच आहेत तरी पण आणिकहि कांहीं पहा. "मामा ग पुसती। भाची केवढी दिसती ?" तेव्हां ह्या मातोश्री म्हणतात, "गोरी ग माझी बाई। चोळी परकर नेसती" ह्या पद्धतीनें मुलीचं वय त्या सांगतील. क्षेम कुशल विचारायचं असलं तर पुढील ओंवी गातील, "दूरल्या देशींचा। विचारीला सुखवसा। सखे ग बाईचा। डाळिंबाचा कोंब कसा ?" भावाचं सौंदर्य पुढीलप्रमाणें सांगतील "दुरून वळखीतें। भाईराजाची चालनी। दुकान सोडूनी। पाहू लागल्या वानिनी।' पुरुषी सौंदर्य स्त्रियांनीं ह्यापेक्षां अधिकतेनें कसें वर्णावें ? संयम आणि औचित्य यांची कास तर न सुटली पाहिजे आणि काव्य-सौंदर्य तर फुललंच पाहिजे. हेंच तर यांच्या रचनेंतील चातुर्य आहे. भावाचं ऐश्वर्य आणि भावजयीचं पातिव्रत्य एकीनं असं वर्णिलं आहे, "माझ्या बंधुराजाच्या। नाल हे घोड्याला। बाई चौघडा झडतो। पतिवर्ताच्या वाड्याला'.

किती झोकाची ही रचना आहे ? आणिक एक ओंवी पहा, "संपतीची नार । चालली ताठ्यानं । पदर पायघोळ । रिंगनी भरली काट्यानं" हें वर्णन ठसठसशीत तर आहेच, पण किती बोचणारें आहे: समोरा समोर म्हणण्याऐकण्यांतच ह्याची तीक्ष्णता जाणवते.

एवंच ही रचना उक्तिवैचित्र्यानें पूर्ण खचून भरली आहे. प्रसंगानुरूप ती कोमल आणि कठोर आहे, शब्दांचा संक्षेप असला तरी तींत अर्थाचा विस्तार आहे आणि भावनांना कल्पकतेच्या कोंदणांत बसविण्याची कला आहे. भावना एकच असली तरी तिला वेगवेगळ्या पद्धतींनीं मांडण्याचें सामर्थ्य हींत आहे. प्रत्येक ओंवींत वेगळीच भावच्छटा आहे आणि वर्णनाचा घाट कांहीं वेगळाच आहे. प्रत्येक भावना यथोचित शब्दांनीं समर्पकतेनें व्यक्त होते आणि तीहि कशी अगदीं सहज, हंसत खेळत वावरते. ह्या वर्णनासाठीं घेतलेल्या कल्पना आणि वापरलेलीं उपमानें अंवतीं भंवतींच्या जगांतील आहेत. संभोवतीं पसरलेल्या जीवनांतून केलेली ही उचल आहे. यांतील भावना जशा जिवंत आहेत तशीच सजावटहि संजीवक आहे. ही खऱ्या अर्थानें मराठी कविता आहे. हींत नऊहि रसांची नांदणूक आहे. रसिक साहित्यिक मानोत न मानोत मी तर निःशंकपणें म्हणतों कीं हींत संसाररस खळखळून वाहतो. हींत भावना–कल्पनांचें मनोहर मिश्रण आहे, कवयित्रींचा व्यक्तिविकास आहे, वास्तवता आहे नि वास्तवाचें उदात्तीकरण आहे, नादमाधुरी आहे, शब्दचित्रण आहे आणि कलेचें सहजसुंदर स्वरूप आहे. हींत जीवनाचा गाथा आहे आणि मनाची व्यथा आहे, निसर्गाचें वर्णन आहे आणि संस्कृतीचें संरक्षण आहे. आणि हें सर्व सार्थ आहे. हा पोटांतला उमाळा आहे, पण यांत अंतरींच्या नाना कळा आहेत. जीवनांतील औदासीन्य मालवून आनंदोत्सुक्याचें आणि आशा–उल्लासाचें वातावरण निर्माण करण्याचें यांत सामर्थ्य आहे. जात्यावरील ओंव्या, त्यांत कसलें हो काव्य ? ही हेटाळणी नेहमींच ऐकण्यांत येते. पण ह्या ओंव्यांत खुंट्यालाहि पालवी फुटेल अशी भावसुधा आहे. ही भावनाहि उद्दाम नाहीं, लवली लतेसारखी नमणारी आहे आणि हें नमन नवलाख प्रकारांनीं नटलें आहे.

पोटांतून निघालें तें ओंठांतून बाहेर पडलें. जसें जिला सुचलें तसें तिनें रचलें. असा हा काव्यप्रकार आहे.

हा सर्व वाङमयप्रकार गेय आहे. आपल्या भावना व्यक्त करण्यासाठीं स्त्रियांनीं अनेक प्रसंगांवर गाणीं रचिलीं आहेत. पण तीं ह्या ओंव्यांच्या मानानें फारच थोडीं आहेत. ती रचना करण्यासहि अवघड आणि स्मरण्यासहि अवघड आहे. पण ओंवींची रचना तशी नाहीं. हें स्त्रियांनीं बनविलेलें वृत्त आहे आणि शुद्ध मराठी आहे. ह्याचें नांवहि मराठी आहे. ओंवीचा अर्थ ओंवणें, गुंफणें, ग्रथन करणें असा आहे. संस्कृतांतील अनुष्टुभाच्या मागें जी कल्पना आहे तिजवरून हें नांव पडलेलें दिसतें. संस्कृतांत अनुष्टुभाच्या एका श्लोकास ‘ग्रंथ’ म्हणतात. महाभारत एक लक्ष ग्रंथ आहे याचा अर्थ त्यांत एक लक्ष श्लोक ग्रथन केले आहेत.ग्रंथ म्हणजे एकत्रित केलेली शद्वसंहति.छंदःशास्त्रानुसार अशा प्रत्येक वैशिष्टयपूर्ण रचनेस स्वतंत्र नांव असतें; जसें शालिनी, मालिनी इ. ह्या सर्वांना सर्वसाधारणपणें श्लोक म्हणतात. प्रारंभीं जेव्हां मराठींत असें ग्रथन होऊं लागलें, विशिष्ट पद्धतीची बांधीव रचना होऊं लागली तेव्हां तिला मराठी शद्ब ‘ओंवी’ हा रूढ झाला. अर्थात् येथें ‘ग्रंथ’ ह्या शद्बामागें जी बांधणीची आणि रचनावैशिष्टयाची कल्पना आहे, तीच ओंवीच्याहि मागें दिसते. हा रचनाप्रकारहि मराठी आणि नांवहि मराठी आहे. हें वृत्त प्राकृत आहे असें सर्व छंदःशास्त्रकार सांगतात. ही रचना संस्कृतांत नाहीं. हें केवळ मराठीचेंच वैशिष्टय आहे.

प्राथमिक अवस्थेंत सर्वच रचना तोकडी असते. मनांतील आशय बहुधा कवि एकाच श्लोकांत सांगतो. दुसरा आशय सांगतांना दुसरा श्लोक आणि दुसरा श्लोक रचतांना वेगळाच आशय. अशीच त्रोटक रचना बहुधा असते. यास्तव हे लहान लहान घटक स्वयंपूर्ण असतात. आणि त्यामुळेंच यांना स्वतंत्र अस्तित्व प्राप्त झालें. ह्या कारणामुळेंच अनुष्टुभाच्या एका श्लोकास ग्रंथ म्हणूं लागले. या नैसर्गिक रचनापद्धतीस अनुसरूनच ओंवीचीहि निर्मिति होऊं लागली. तिचा दुसऱ्या ओंवीशीं संबंध नसे तो ह्याच कारणामुळें. कवयित्रीचा वर्णावयाचा विषय एका

ओंवींत आलेला असतो. दुसऱ्या ओंवींत दुसराच विषय. ह्या रीतीनें प्रत्येक ओंवी हें स्वतंत्र गीत असे आणि आजहि तसेंच मानलें जातें. परंतु पुढें अनुष्टुभाच्या अनेक श्लोकांत मिळून जसा एक प्रदीर्घ आणि सुसंगत विषय येऊं लागला तशीच कांहींशी अवस्था ह्या ओंवीचीहि झाली. मात्र ही अवस्था प्राप्त होत असतां ओंवींचें स्वरूप किंचित् पालटलें आणि त्यांतूनच ग्रांथिक ओंवी निर्माण झाली. यास्तवच ज्ञानेश्वरींतील पुष्कळ ओंव्या गेय आहेत.

ओंवीच्या उगमासंबंधीं विचार करतां दिसून येतें कीं म्हणी, आहाणे, उखाणे यांच्यावरून ही निघाली असावी. ‘ झाड झोपाळा, फळ गोपाळा, झाडाला फूल नाहीं, फळाला आठोळी नाहीं. ’ किंवा ‘ आठ आटांगण, बारा पटांगण, चार चौकडे, दोन आकोडे ’ अशांसारखे आहाणे कूट म्हणून आजहि खेड्यापांड्यांतून वापरांत आहेत. ‘ हाती गुढीला नीका दिसे, जोगी मुंडीला नीका दिसे,’ अशासारखीं सयमक बोधपूर्ण वचनें जुन्या वाङमयांत सांपडतात. स्त्रिया आपल्या नवऱ्याचें नांव नेहमीं उखाण्यांत घेतात हें तर प्रसिद्धच आहे. ही सर्व रचना किंचित् तालबद्ध आणि यमकानुप्रासयुक्त आहे. नादमधुर शद्बांची पुनरुक्ति करून नवे शद्ब बनविण्याची मराठीची प्रवृत्तिहि प्रसिद्धच आहे. तेव्हां या नादमाधुरीच्या नादानें, यमकानुप्रासप्रियतेवरून, अंत्ययमकाच्या मराठीच्या वैशिष्ट्यावरून त्याचप्रमाणें म्हणी, आहाणे, उखाणे यांच्या विपुल उपयोगावरून असें अनुमान करण्यास सबळ जागा आहे कीं स्त्रियांनीं ह्यांतील ग्राह्यांश स्वीकारून त्याला व्यवस्थित स्वरूप देऊन आपल्या अंतःकरणांतील भावनांच्या ऊर्मि प्रगट करण्याचें साधन अशी ही ओंवी निर्माण केली असावी.

ओंवीची ही सारी रचना स्त्रियांची आहे. पुरुष लेखकांनीं ग्रंथांत उपयोजिलेली ओंवी अशी लवचिक आणि गेय नाहीं. ग्रांथिक ओंवी पाठ्य असते तर ही ओंवीं गेय असते. गेयता हें हिचें वैशिष्टय आहे आणि त्याची आठवण स्त्रियांना आहे. ‘ पहिली माझी ववी । कोनाला गाऊ बाई । देवा या मार्वतीला । वलभीमाला भईन नाहीं ’ असा ओंवी गाण्याचाच उल्लेख त्यांनीं केला आहे. पुरातन वाङमयांतहि ज्या ज्या ठिकाणीं

लोकगीतात्मक ओंव्यांचा उल्लेख होतो त्या त्या ठिकाणीं स्त्रिया ओंव्या गातात असाच उल्लेख आहे. ह्यावरून आणिक एक गोष्ट सूचित होते. गेयता लोपवून हिनें ग्रंथांत प्रवेश केला तसाच गेयता अबाधित ठेवून हिनें आपणांतून अभंगास जन्म दिला. हें विधान थोडें धाडसाचें आहे. पण ग्रांथिक 'ओंवी' आणि 'अभंग' ह्यांच्या निर्मात्यांचा विचार केला तर त्यांच्या सुशिक्षितपणांत-साक्षरपणांत पुरुष आणि स्त्री यांच्याइतकेंच अंतर दिसतें. ओंवीबद्ध ग्रंथ करणारे बहुतेक सुशिक्षित आणि व्युत्पन्न असत तर अभंगरचना करणारे साक्षर आणि सुशिक्षित असतच असें नाहीं. संतकवींतहि असाच भेद दिसतो. तसेंच ओंवीबद्ध रचना करणारे आणि लावण्या, पोवाडे, पदें, गौळणी इत्यादि गेय रचना करणारे यांतहि हाच भेद आढळतो. हें व्युत्पन्नतेचें विधानहि अगदीं स्थूलपणेंच पहावयाचें आहे. सारेच अभंग रचना करणारे अव्युत्पन्न होते नि सारेच ओंवीबद्ध लेखन करणारे व्युत्पन्न होते असेंहि नाहीं. ह्यास दुसरें उपोद्बलक प्रमाण असें कीं 'अभंग' हाहि लोकगीतात्मक ओंवीप्रमाणें सर्वदा गेयच असतो, पाठ्य कधींच नसतो. त्यांतहि ओंवीप्रमाणेंच प्रासप्रियता आणि विशिष्ट यमकरचना असते. ही गोष्ट ओंवीशीं त्याचें फार निकटचें नातें आहे हें दर्शवितें.इतकेंच नव्हे तर **जनाबाई, तुकाराम** इ.साधुसंतांनीं ह्या अभंगरचनेस 'ओंवी' च म्हटलें आहे. 'जात्या' च्या अभंगांत **जनाबाई** 'ओंवी' हाच शब्द वापरते. **तुकाराम**हि 'पंढरिये माझें माहेर साजणी। वोवीया कांडणीं गाऊं गीति' 'आनंदें वोविया गाईन मी त्यांसी। जाती पंढरीसी वारकरी' अशा प्रकारें 'ओंवी' हाच शब्द वापरतात. त्यांनीं 'अभंग'रचना केली असून तीस 'ओंवी' म्हटलें आहे. ह्यासारखेंच दुसरेंहि एक प्रमाण आहे. 'अभंग देणें' किंवा 'अभंग मागणें' म्हणजे त्या लेखनाचें कर्तृत्व आपणांकडे मागणें, त्या रचनेचा कर्ता आपण आहोंत असें त्या रचनेंत घालणें. हा जो अर्थ आला आणि ह्या रचनेस 'अभंग' नांव प्राप्त झालें तें ओंवीच्या नेमकें विरुद्ध आहे. ओंवी कोणीहि ओंवावी, रचावी. तीच ती इतरांनींहि आपली म्हणून गावी, म्हणावी आणि करावी. तिच्या रचनेविषयीं

अधिकृत असें आपलें कर्तृत्व कोणीहि सांगत नसे. तें सार्वजनिक धन आणि साधन होतें. पण अभंग असा 'अकर्तृक' नाहीं. तीच रचना दुसऱ्याला आपली म्हणून मानतां येऊं नये, तिच्यांत किंचितहि भंग होऊं नये अशा विचारानेंच त्या रचनेच्या अंतीं नांव घालून तिला 'अभंग' ठेवण्यांत आलें आणि या प्रकारास 'अभंग' असें नांव छंदःशास्त्रानें मानलें. हा भेद दाखविण्यास तो ओंवींतून निघाला हीच गोष्ट कारणीभूत झाली. नाहीं तर ज्यांनीं आपलें नामरूपहि मिटविण्याचा प्रयत्न केला त्या संतांनीं या रचनेंत आवर्जून आपलें नांव घालण्याचें कांहीं कारण नव्हतें. तसेंच ह्याचें ओंवीविरुद्ध वैशिष्टय असें कीं 'ओंवीं'त सर्व संसार सांठला आहे तर ह्यांत तो आटला आहे. अभंगानें केवळ परमार्थ, अध्यात्म हाच पाहिला आणि गायिला आहे.

हा स्त्रीगीतात्मक वाङमयप्रकार फार पुरातन आहे. तो मराठी भाषेंत ग्रंथनिर्मितीस आरंभ होण्यापूर्वींचा आहे. चालुक्यवंशीय राजा सोमेश्वर ह्यानें शके १०५१ मध्यें 'मानसोल्लास' अथवा 'अभिलषितार्थ चिंतामणि' हा ग्रंथ लिहिला. त्यांत त्यानें 'महाराष्ट्रीय स्त्रिया कांडतांना ओंव्या गातात' असें म्हटलें आहे. 'संगीत रत्नाकर' ह्या ग्रंथाचा कर्ता म्हणतो, 'महाराष्ट्रीय स्त्रिया देशभाषेंत ओंव्या गातात. ह्या ओंव्या जनमनोहर असतात, आणि स्त्रिया त्या विविध छंदांत गातात.' त्यानें ओंवीचें लक्षण पुढीलप्रमाणें दिलें आहे: 'खंडत्रयं प्रासयुतं गीयते देशभाषया । ओंवीपदं तदंतेचेदोवी तज्ज्ञैस्तदोदिता । त्रयाणां चरणानां स्युरेकाद्यावृत्तितो भिदाः । आदि-मध्यान्तगैः प्रासैरेकाद्यैश्च पदे पदे । छंदोभिर्बहुभिर्गेया ओंव्या जनमनोहराः । सानुप्रासैः त्रिभिः खंडैर्मंडिता प्राकृतैः पदैः' यावरून ओंवी ही तीन पदांची प्रासयुक्त रचना असते. तिन्ही चरणांच्या अंतीं अर्थात् यमक असते आणि चवथा चरण पुनःपुन्हा घोळून म्हणावयाचा दिसतो. आजच्याहि स्त्रीगीतांतील बहुसंख्य ओंवींची रचना तीन चरणांचीच आहे पण त्या तीन चरणांसमवेत चवथाहि एक चरण येतो तो बहुधा नातेवाचक असतो. भाईराजस, नेनंती प्राणसई, देसाईराया इ. इ. हाच चरण पुनः पुन्हा

आवर्तनाप्रमाणें फिरतो. त्याचप्रमाणें हे चरण सयमक असतात. पण यमकांचें हें बंधन थोडें शिथिल आहे. शके १५०० मधील भीष्माचार्य ह्या ग्रंथकारानेंहि ओंवीचें लक्षण दिलें आहे, पण तें ग्रांथिक ओंवीचें आहे. तो स्त्रीगीतरूप ओंवीहून ग्रांथिक ओंवीस भिन्न समजत असावा असें दिसतें. एवंच ओंव्यांचा हा वाङमयप्रकार प्राचीन आहे. ओंव्या गात असत. त्या दळतांना आणि कांडतांना गात असत.

प्रथम प्रथम जरी ओंवी तीन चरणांची असली तरीं पुढें ती साडेतीन चरणांची, चार चरणांची आणि क्वचित् पांच चरणांचीहि झाली. हिच्या चरणांतील अक्षरसंख्या निश्चित नाहीं. प्रत्येक चरणांत सहा ते आठ अक्षरें असतात. पण कधीं कधीं ती संख्या १०।११ पर्यंतहि गेलेली आढळते. चरणांत अधिक अक्षरें असलेल्या ओंव्या गाण्यास त्रासदायक जातात. साडेतीन चरणी ओंवींत शेवटल्या चरणांत अक्षरसंख्या अल्प असते चार चरणी ओंवींत देखील अक्षरसंख्या अनियमित असते. यमक आणि अक्षरसंख्येप्रमाणेंच अर्थाच्या दृष्टीनेंहि ओंवीची बांधणी विविध असते. तीन चरणी ओंवींत अर्थ संपूर्ण असतो. साडेतीन चरणीं ओंवींत कधीं सर्व चरणांचा मिळून एक अर्थ होतो, तर कधीं तीन चरणांतच तो पूर्ण होऊन शेवटचा चरण केवळ पादपूरक अथवा व्यक्तिवाचक असतो. चार चरणी ओंवींत कधीं संपूर्ण ओंवींत मिळून अर्थ पूर्ण होतो आणि कधीं तीन चरणांत अर्थ पूर्ण होऊन चवथा चरण व्यक्तिनिदर्शक असतो आणि कधीं तर तो दूरतःहि मूळ ओंवीशीं संबद्ध नसतो. गोविंदा गोविंदा, सखूला सांगा कोणी, अशा प्रकारचा असतो. ह्या तिन्ही प्रकारच्या रचनापद्धतींत थोडीतरी एकसूत्रता आहे. एका मूळ कल्पनेवरून इतर दोन प्रकार वाढविलेले दिसतात. पांच चरणी ओंवींत अक्षरसंख्या आणि यमकरचना इतर प्रकारांप्रमाणेंच असते; पण अर्थविभागांत ती भिन्न आहे. हिच्या पांचहि चरणांत अर्थ असून परस्पराशीं त्यांचा संबंध असतो. उदा. ‘ सिताबाई बाळातीन । निजाया नाहीं बाज । केली तना याची सेज । आकोसा बाळा नीज । तुह्या पितयाचं राज ’ हींत चार चरणांत अंकुशाला अंगाई गीत गायिलें

असून पांचव्या चरणांत प्रभु रामचंद्रास सीतात्यागाच्या सत्कार्यासाठीं अहेर केलेला दिसतो. दुसरी ओंवी अशी : ' भाऊ घेतो चोळी । भावजय रागांत । चोळी चाटयाच्या मागांत । राहून गेली बाई । बहीन भावाच्या हुदींत ' हिच्या पांचहि चरणांत अर्थ आहे नि चरणांचा परस्परांशीं संबंध आहे. पण अशा पांच चरणी ओंव्या तुरळक आहेत.

एवंच 'ओंवी' हें आपलें मराठीचें वैशिष्टय आहे. पूर्वीं ही तीन चरणांची असली तरी लौकरच चार चरणी झाली. जुन्या वाङमयांत ही चार चरणीच आढळते. हिचें कांडतांना गाण्याचें वैशिष्टय मात्र आज अगदींच लोपलें, पण तेंहि पूर्वींपासूनच पालटत होतें असें दिसतें. जनाबाईच्या ओंव्या जात्यावरील आहेत; कांडतांनाच्या नाहींत 'सुंदर माझं जातं ग । फिरतं बहुत । ओंव्या गाऊं कौतुकें । तूं येई बा विठ्ठला ' ही तिच्या नांवावरील रचना प्रसिद्धच आहे. तिच्यांत दळतांना गाण्याचा निर्देश आहे. पण तुकारामांनी केलेला निर्देश कांडण्याचा आहे 'वोविया कांडणीं गाऊं गीति ' तथापि आज कांडतांनापेक्षां दळतांनाच ओंव्या गाण्याचा प्रघात आहे. पण तिनें कांडतांना गाण्याचें पूर्वींचें आपलें वैशिष्टय आजहि ठेवलें आहे. लग्नामुंजींत 'जात्यासांगातीं' 'उखळाचेंहि' मुहूर्त करतात. तेव्हां कांडतांना पांच तरी ओंव्या गायिल्या पाहिजेत असा आजहि प्रघात आहे. दळतांना गाण्याचा प्रकार मात्र सार्वत्रिक आहे. पूर्वींच्या काळचीं अनेक अंतर्गत आणि वस्तुगत वैशिष्टयें पालटून आज भिन्न प्रकारांनीं रूढ असलीं तरी 'उंच ओसरी ' चें पुरातन वैशिष्टय हिनें आजहि सांभाळून ठेवलें आहे.

ही स्त्रीगीतें अनेक दृष्टींनीं महत्त्वाचीं आहेत.तें एक तर स्त्रीधन आहे. आमच्या मराठीच्या जन्मापासून आमच्या मायमावल्यांनीं जतन करून ठवलेलें, कालाच्या प्रवाहांत पालटतां पालटतांहि आपलें वैशिष्टय अबाधित ठेवून, त्यांत नवीनाची भर घालून आज आपल्या मायबहिणींच्या मुखीं आणून सोडलेलें, म्हणूनहि आम्हांस अवश्यमेव संग्रहणीय आहे. दुसरें त्यास सांस्कृतिक महत्त्व आहे. तिसरी गोष्ट त्यांत काव्याच्या नाना कळा आहेत. चौथी गोष्ट तें सोपें आणि सहज संस्मरणीय आहे.

पांचवी गोष्ट त्यांत अनेक सुभाषितें आहेत. पण ह्याजसमवेत त्याचें आणिकहि एक वैशिष्टय आहे. भाषेच्या दृष्टीनें हीं गीतें फार महत्त्वाचीं आहेत.

ह्या गीतांतील भाषा नित्याच्या बोलण्याची आहे. ग्रांथिक भाषा आणि बोलण्याचीं भाषा ह्यांच्या रूपांत अंतर असतें. ग्रांथिक भाषा आपलें रूप लौकर पालटीत नाहीं. याविरुद्ध लौकिक, बोलण्याची भाषा आपलें रूप नित्य पालटतें. पण तिच्यांत दुसराहि एक भाग असा आहे कीं ती आपलीं कांहीं वैशिष्टयें सोडतां सोडीत नाहीं. त्यांतल्या त्यांत ही रचना करणाऱ्या स्त्रिया आहेत नि त्या खेडयांतून राहणाऱ्या, नव्या संस्कृतीचे संस्कार फारसे न झालेल्या आहेत. त्यांच्या बोलण्यांत आणि गाण्यांत हीं जुनीं नाणीं, जुने शद्ब, जुने वाक्प्रचार आणि व्याकरणविषयक पुरातन रूपें फार येतात. हीं त्यांनीं आपलें पूर्वनिधान म्हणून सांभाळून ठेवलीं आहेत. ह्यांच्या अभ्यासानें आजची शद्बांची घडण कळते, त्यांची पूर्वपीठिका कळते. भाषाशास्त्रीय नियमाची सिद्धता करण्यासाठीं यांतून उदाहरणें विपुल सांपडतात. सर्वनामें विभक्तिरूपें, आख्यातरूपें आणि प्रयोगरचना यांचीं वैशिष्टयपूर्ण उदाहरणें यांत आढळतात. (यासाठीं 'माहेरचं मराठी' पाहणें).

इतर वैशिष्टयपूर्ण गोष्टींप्रमाणेंच यांत म्हणी आणि वाक्प्रचार विपुल आहेत. हे वाक्प्रचार अथवा म्हणी म्हणजे भाषेचे प्राण असतात. लोकव्यवहारांतील कल्पना आणि लोकांनीं सांठवून ठेवलेलें ज्ञान, त्यांना आलेले विविध अनुभव ह्या म्हणींत समाविष्ट असतात. त्यांतहि लोकमन खेळतें, लोकस्थिति कळते. ह्यांतहि बराच सामाजिक इतिहास लपलेला असतो. हाहि संग्रह स्त्रियांच्या भाषणांतून विपुलतेनें विखुरलेला असतो. मात्र हा भाग केवळ स्त्रीधन नाहीं. यांत पुरुषांचाहि पुष्कळ वांटा असतो. खेडयापाडयांतील पुष्कळ सज्जनांना उठतां बसतां म्हणी वापरण्याचा उल्लास असतो. 'म्हण' हा शद्बहि वाङमयाप्रमाणेंच आहे. याचाहि लेखनाशीं संबंध नाहीं. लोकांनीं पिढयान् पिढया जें म्हटलें तेंच 'म्हण' या नांवानें मोडतें. विद्वानांनीं लिहिलेलीं वाक्यें अडाण्यांनीं

घोकायचीं असा प्रकार हा नसतो. आणि या प्रान्तांत तर जनता कोणाची विद्वत्ता मानीत नाहीं. सगळ्यांच्याच जीवनांतील अनुभूति त्यांत असते. जरी तें वाक्य प्रथम कोणा एका व्यक्तीनेंच उच्चारलें असणार हें खरें, तरी पण पुढें त्या व्यक्तीच्या कर्तृत्वाचा ह्याजवरील अधिकार उडून जातो आणि तें वाक्य अथवा तो भाग सार्वजनिक होतो. हाहि अर्थात बोलण्याचा भाग असतो, हें सुभाषित असतें आणि म्हणूनच लोकवाङ्मय असतें.

हें बोलायचें, बोललेलें,वाङ्मय आहे. हें वापरण्यांत राहण्यानेंच सतेज राहतें कोणास सांगून सवरून हें वापरावयास लावतां येत नाहीं, 'तुझ्या गळां पडूं दे अन् माझी माया येऊं दे' अशानें याचें प्रेम उत्पन्न होत नाहीं. पण अभ्यासकाला ह्याचा विचार करतां येत नाहीं, त्यानें संग्रह हा केलाच पाहिजे, आभ्यास हा झालाच पाहिजे. येथें मी एक–दोन म्हणींचीं उदाहरणें देतों. 'लागो बाई लागो साता घराला लागो' असें स्त्रिया पुष्कळदां म्हणतात. याचा अर्थ हें प्रकरण सगळीकडे पसरो, असंच सगळ्यांचं होवो, आपणांसारखंच होवो असा आहे. हा अर्थ स्थूल मानानं बरोबर आहे. 'सात' शद्वावरून आम्ही 'सगळे' असा अर्थ घेतों. पण ह्या 'साता' चा अर्थ बहुधा अंकवाचक असाच आमच्या मनांत असतो. तेव्हां सात शद्व संपूर्णतादर्शक कसा ? मला वाटतें तो तसा नाहीं. 'सात' ह्या शद्वाचा अर्थ जुन्या वाङ्मयांत हाटपेठ असा आहे. हाटपेठेंतील घरें श्रीमंतांचीं, ऐश्वर्यवंतांचीं. यास्तव ही म्हण म्हणणारणीचें म्हणणें दिसतें कीं हाटपेठेंतील श्रीमंत माणसें अशींच मजसारखींच होवोत. त्यांच्याहि घरांना ही (आग) लागो. हाटपेठ हीं गांवाचें भूषण तर असतेंच पण सर्वस्व असतें. यास्तव ह्या म्हणींत सगळें असा अर्थ आला. अशीच एक दुसरी म्हण आहे. तिच्यांतहि 'सात' शद्व आहे 'साता घरची सनकाडी, नांदतं घर वस पाडी.' म्हण वाईट आहे; पण विचार करावयास लावणारी आहे. येथेंहि 'सात' शद्वाचा अर्थ हाटपेठ, बाजारपेठच आहे. संख्यावाचक अर्थ घेतला तर 'घर' शद्व एकवचनी आहे. येथें 'सनकाडी' हाहि एक शद्व आहे आणि त्याचा संबंध

नांदतें घर ओस पाडण्याशीं लावला आहे. तेव्हां ह्या म्हणीचा अर्थ सकृद्दर्शनीं नीटसा लागत नाहीं. पण स्त्रिया ही म्हण एखाद्या कुलटेची निंदा करण्यासाठीं वापरतात आणि तें अगदीं योग्य आहे. सनकाडीचा उपयोग चूल इ. पेटविण्यासाठीं करीत. पण येथें घर जाळायचें नसून 'ओस' पाडायचें आहे आणि तेंहि 'नांदतें घर' आहे. तेव्हां ही साधी 'सनकाडी' नव्हे. यांतहि महत्त्वाचा शब्द 'सात' हाच आहे. 'सात' म्हणजे बाजारपेठ. बाजारांत जर सनकाडीचें छप्पर असलेलें घर असेल तर येणारा जाणारा येतां जातां एखादी काडी उपसतोच. हा बहुधा खेड्यांतल्या लोकांचा अनुभव आहे. तेव्हां ही म्हण म्हणते, बाजाराच्या घरावरील केवळ सनकाडी,जी कोणीहि उपसावी, तद्वतच अगदीं क्षुल्लक, नीच अशी ही स्त्री जर एखाद्या नांदत्या घरांत शिरली तर त्या घरा-दाराचं वाटोळं करते. एवंच वेश्या एकदां घरांत शिरली म्हणजे ती संसाराची धूळधाण करते. 'साता घरची' ह्या शब्दाला असा वाईटच अर्थ कां ? तर त्याचें कारण 'बाजारबसवी, पालमांडी' या शब्दांत आहे. दोन्हींतहि उपरोक्त कल्पना आहे. आपणांस ठाऊकच आहे कीं जुने संकेत पालटून नवे येतात, जुन्या कल्पना पालटून नव्या येतात, तेव्हां त्यांना दर्शविणारे शब्दहि नवेच उत्पन्न होतात. पण कल्पना तीच असली तरी नवे शब्द वापरण्यांत येऊं लागले म्हणजे नव्या शब्दांनीं ती व्यक्त होते. 'बाजारबसवी, पालमांडी' ह्या नव्या शब्दांनीं 'साता घरच्या' सनकाडीची कल्पना व्यक्त होते. अशी ही म्हण मला तरी वाटते.

अशा प्रकारें आमच्या ह्या स्त्रीगीतात्मक वाङमयाचें सांस्कृतिक, वाङमयीन, भाषाशास्त्रीय आणि इतरहि अनेक प्रकारांनीं महत्त्व आहे. हें वाङमय जितकें प्रकाशित होईल तितकें पाहिजेच आहे. यापूर्वी 'माहेरचं मराठी' या नांवानें मी कांहीं स्त्रीगीतांचें संकलन केलें होतें. प्रस्तुत 'मराठीचा मोहोर' या नांवानें मी हा दुसरा संग्रह प्रकाशित करीत आहे. प्रस्तुत संग्रहास जी प्रस्तावना म्हणून जोडली तीं 'मराठवाडा साहित्य परिषदेच्या' माझ्या अध्यक्षीय भाषणाचा भाग आहे. यास्तव

या भाषणांत जीं उदाहरणें आलीं आहेत तीं कांहीं प्रस्तुत संग्रहांतील असून कांहीं बाहेरील आहेत. जनताजनार्दनास ही मराठीची सेवा मान्य होईल ही आशा आहे. ज्या मावल्यांनीं हीं गीतें दिलीं आणि ज्या माझ्या स्नेह्यांनीं, विद्यार्थ्यांनीं आणि विद्यार्थिनींनीं मला ह्या संग्रहकार्यांत साह्य केलें त्या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे.

वैकुंठ चतुर्दशी
शके १८७८
'आशीर्वाद' हैद्राबाद.

मराठीचा पाईक
**ना. गो. नांदापूरकर**

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | चौदा चौकड्याच्या ओव्या | १ |
| २ | तुळस | २ |
| ३ | पंढरपुरामध्यें | ३ |
| ४ | भरली चंद्रभागा | ४ |
| ५ | विठ्ठलाचं सुख | ६ |
| ६ | समुद्र-मंथन | ७ |
| ७ | खंडोबा | ९ |
| ८ | राजस-यज्ञ | १३ |
| ९ | मीठ | २३ |
| १० | माहेर | ३० |
| ११ | ओवी गाईन देवाचङ | ३१ |
| १२ | शेजी साइली-माय मावली | ३३ |
| १३ | वाघिणीचं दूध | ३४ |
| १४ | गोत | ३५ |
| १५ | माझं सुखदुःख | ३७ |
| १६ | माझ्या घरीं मी | ३८ |
| १७ | कुंकू | ३८ |
| १८ | काळी चंद्रकळा | ४० |
| १९ | शेजीची संपत | ४१ |
| २० | लेंकीचा जन्म | ४३ |
| २१ | सासूचा सासरवास | ४४ |
| २२ | इंद्रसभेची कामीन | ४५ |
| २३ | सासऱ्या जातांना | ४६ |
| २४ | प्रीतीचं पंचखाजं | ४७ |
| २५ | लेंकुरवाळी | ४९ |
| २६ | बहिणीचें कौतुक | ५० |
| २७ | उंबरगांवची अमरांगना | ५१ |
| २८ | भूषणाचा भाऊ | ५२ |
| २९ | भावजय मालन | ५४ |
| ३० | भाळल्या गोपींगना | ५६ |
| ३१ | गांवा आल्या कलावातिनी | ५६ |
| ३२ | लावणीचा आंबा | ५७ |
| ३३ | चाटयाच्या दुकानांत | ५८ |
| ३४ | सांगून धाडीतें | ६० |
| ३५ | पाहुणा | ६१ |
| ३६ | चाल चाल शिंगेबाई | ६२ |
| ३७ | गुऱ्हाळ | ६४ |
| ३८ | माळयाच्या मळयांत | ६५ |
| ३९ | वसुराज | ६७ |
| ४० | साळीचे तांदूळ | ६८ |
| ४१ | गोरीचं गोरेपन | ६९ |
| ४२ | गोरी गेली पान्या | ७० |
| ४३ | लिंबाच्या लिंबोळ्या | ७१ |
| ४४ | जांवई | ७१ |
| ४५ | नवरा पाहूं आले | ७३ |
| ४६ | नेमीनाथ-राजामती | ७५ |
| ४७ | गुरु | ७६ |
| ४८ | नारायणगडावर | ७६ |
| ४९ | वाटच्या वाटसरा | ७८ |
| ५० | सरलं दळण | ७८ |
| ५१ | तालखेडचा मारुती | ८० |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 22848 वि: 3104
क्रमांक 9328 नों: दि: 30/11/80

# चौदा चौकडयाच्या ओंव्या

पहेली माझी ववी । निराकार निर्गुनाला
बाई माझा नमस्कार । ओंकार सोरुपाला ॥
दुसरी माझी ववी । आर्धी मात्रा पकुरती
बाई माझा नमस्कार । आधि पुरुष गूरुमूर्ति ॥
तिसरी मझी वई । निर्गुन तिन्ही देवा
बाई माझा नमस्कार । ब्रम्हा–इस्नू–सदाशिवा ॥
चवथी माझी माझी वई । चार देही चार वाचा
कळू आल बाई । चार शून्य ज्ञानदीप ॥
पांचवी माझी ववी । पंचे भूतांचा गुन
नाना तरंग मिळून । इथ रमतो पंचेप्रान ॥
सहावी माझी ववी । सड्दळ सहा चक्र
नाना तरग मिळून । घेती तत्त्वाचा आकार ॥
सातवी माझी ववी । सप्त धातूचा आकार
चार पिते तीन माता । झाला देहाचा इस्तार ॥
आठवी माझी ववी । आठवितां आठवना
अशी पा कुळकामिना । खेळ हे तिचे नाना ॥
नववीमाझी ववी । नऊ खिडक्या देहेप्रती
नाना तरंग उठती । पिरमाचे मानिक मोती ॥
दहावी माझी ववी । उलटा पंथ दसवें दार
सोहं शब्दाचा आकार । संत मुनींचें माहेर ॥
अकरावी मझी ववी । पुढें आकार नाही
यथ झालेत रही । येद मुनावले बाई ॥

बारावी माझी ववी । गुरुकिर्पा जया झाली
निजवस्तु सापडली । देहेबुद्धि हारपली ॥
तेरावी माझी वई । गुरुकुरपा अनिवार
याची चुकली येरझार । लक्ष यौनी चेराचेर
चवदावी माझी ववी । यथ शिनल्या चारी वाचा
लक्ष लावी येता जाता । समाधी आली हाता ॥

## तुळस

तुळसाबाईला । नाहींत मायबाप
धरनी उगवलं रोप । अन् पानी घाली जनलोक ॥
तुळशी ग बाई । नको हिंडू रानोरानीं
वाडा माझा चवकोनीं । जागा देतें इंद्रावनीं ॥
माझ्या अंगनांत । तुळसाबाईच भारूपन
गोइंदाच रमलं मन । नेली मंजूळ चोरून ॥
तुळसाबाईला । न्हाईत कान-केस
हिरवा पाला लसलस । वऱ्हे मंजुळाचे घोस ॥
तुळसबाईला । न्हाईत नाक- डोळे
इच्या सावळ्या रूपाला । देव गोइंद भाळले ॥
तुळसी ग बाई । तुझा हिरवा पाला
गोइंदाच्या पासोडीला । करारी रंग देला ॥
तुळसी ग बाई । तुझ्या मंजिऱ्या किती लाल
तुझ्या इंद्रावनीं । देव खेळले गुलाल ॥
तुळस बाईची । रस्त्यावरीं माडी
मठा गोइंद खिलाडी । सिड्या लावून मंजुळ तोडी ॥
तुळसीच्या बनीं । झुळूझुळू पानी
आंघुळी केल्या बाई । सावळ्या गोइंदानी ॥
तुळसीच्या वृंदावनीं । हरि सखा निजला
आयशा आम्हुतानं । पदर शालीचा भिजला ॥

तुळशी बाई । वाऱ्यानं तू हलू नको
विष्णूच्या मंजुळा । पायंदळीं पाडू नको. ॥
तुळसी ग बाई । हिरवा तुझा पाला
तुझ्या मंजुळेची । आवड गोविंदाला ॥
तुळसीचा वटा । मोती-पवळचाचा
पांडुरंगाचा माझ्या । इना वाज सावळचाचा ॥
तुळसी ग बाई । तुझ्या मंजुळा बारीक
सख्या इठ्ठलासारीख । आल व्हत गिऱ्हाईक ॥
तुळसाबाई । वाळून कोळ झाली
कातून माळ केली । अन् हुरदीं वागविली ॥
तुळशीचं नांव । कंठींत कोरीलं
रातन दिवस । हुरदीं वागविलं ॥
तुळसीची पुजा । नित्तेचा नेम माझा
जाऊ माझ्या जलमाला । पतिवर्तै संग तुझा ॥

## पंढरपुरामध्यें

माझ्या जिवाला वाटतं । पंढरी पाहावी
हरि-सख्या-दयाळाला । माळ तुळसीची घालावी
पंढरपूरामध्यें । कोन कातीव जोडव्याची
सावळी रुकमीन । रानी इठ्ठल बडव्याची ॥
पंढरपुरामध्ये । गल्लोगल्ली काळ पानी
विठ्ठल रुखमीन । किल्यामध्ये राजारानी ॥
पंढरपुरामध्यें । काय कुंकाची धारन
बाई माझी रुखमीन । पुसे हवेलीवरून ॥
पंढरपुरामध्यें । गल्लोगल्ली मनेरी
बाई रुखमीन माझी । चुडा भरीती सोनेरी ॥
पंढरपुरामध्यें । भाजीचे परवत
पांडनीला शाखाव्रत । माय माझ्या रूक्मीनीला ॥

पंढरपुरामध्में । उतराया नाहीं जागा
लावील्या तुळसी–बागा । हरि सावळ्याचं माझ्या ॥
पंढरपुरामध्यें । बुक्कीयाचं पेव ।
पायरीला नामदेव । जाता दर्शन घ्यावं ॥
पंढरपुरामंदी । हरदास घरोघरीं
ग्यानोबा–तुकाराम । इना वाज भिवरवरी ॥
पंढरपुरामंदी । हरदास कोन कोन
ग्यानोबा तुकाराम । बाळ बैराग्याचे दोन ॥
पंढरपुरामंदी । शंख वाजतो मोराचा
आला गोरोबा तेराचा । इठुलाच्या भेटीसटी ॥
पंढरपुरामंदी । जना भाजिती लाह्या
देवा माझ्या इठुलानं । रथ नेला मिरवाया ॥
पंढरपुरांत । येक दनाना उठीला
माझ्या विठ्ठल देवाचा । नंदी रथाचा सुटला ॥
पंढरपुरांत । तुळसा वाळून खाकर
इटू–रायाचे लेकर । लुब्ध झालेत पाखर ॥
पंढरपुरमधी । कुखू सांडल वटच्यावरी
लेकी देऊ मोठ्या घरीं ॥

## भरली चंद्रभागा

भरली चंद्रभागा । भरली दोही तीरीं
कसा नेसील पैलतीरी । सावळ्या पांडुरंगा' ॥
भरली चंद्रभागा । भरली दोही थड
सखा माझा पलीकड । सावळा पांडुरंग ॥
भरली चंद्रभागा । भरली आटोकाट
मला देशील कधीं भेट । सावळ्या पांडुरंगा ॥
भरली चंद्रभागा । पानी लागलं लिंबाला
उभा गरुडखांबाला । सावळा पांडुरंग ॥

भरली चंद्रभागा । नाव चालली वाहूनी
विठ्ठलाची रुखमीन । आली नारेळ घेऊनी ॥
भरली चंद्रभागा । पानी लागलं कंगनी
पंच–आरती घेऊनी । उभी रुखमीन आंगनीं ॥
भरली चंद्रभागा । नावचा घोडा उड
रुक्मीन झाली पुढ । गंगला पानी थोड ॥

× × ×

भरली चंद्रभागा । पानी लागलं वडाला
आईवडलांच्या सेवेंत । देव पुंडलीक बुडाला ॥
भरली चंद्रभागा । पानी उड भाला भाला ॥
धारला डेरा देला । न्हाई कुंडलीक भेला ॥
भरली चंद्रभागा । दोन्ही थडचा लोक
बाई आंघुळ करीतो । धारंत पुंडलीक ॥
भरली चंद्रभागा । चालली संभरून
धार ही पडली । देवा पुंडलीकावरून ॥

× × ×

भरली चंद्रभागा । पानी लागल जोत्याला
सांगा इठ्ठल पित्याला । जत्रा थोपली वाटला. ॥
भरली चंद्रभागा । चालली दोन्ही थडचा
घाला नामांच्या सांगडचा ॥
भरली चंद्रभागा । भरली दोही थडी
संकटीं घाली उडी । सावळा पांडुरंग ॥
भरली चंद्रभागा । उतार कोन्या काठीं
तारू झाला जगजेठी ॥
भरली चंद्रभागा । पलीकडे कसं जावं ?
पांडुरंगानं माझ्या । फुलाची केली नाव ॥
भरली चंद्रभागा । कुनीकड जाती बगा
सावळा पांडुरंग । सका नावमंदी उबा ॥

## विठ्ठलाचं सुख

आपलं हे ग राज्य । रुक्मीन सांगती माईला
ऐशे ऐशे मोती । माझ्या उजव्या बाहीला ॥
भ्रताराचं सुख । रुक्मीन सांगती माईला
टाळमुर्दुंगाचे ठसे । माझ्या उजव्या भाईला ॥
इठ्ठलाचं सुख । रुक्मीन सांगती मावशी
मोठा इठ्ठल ह्यावशी । रथा लाविल्या तुळशी ॥
इठ्ठलाचं सुख । रुक्मीन सांगती माईला
सोन्याचं गळदाव । माझ्या आनंदी गाईला ॥
इठ्ठलाचं सुख । रुख्मीन सांगती माईला
वाहती चंद्रभागा । माझ्या पंढरी गावाला, ॥
इठ्ठलाचं सुख । रुक्मीन सांगती बापाला
सोन्याचे दरवाजे । माझ्या देवाच्या रथाला ॥
भ्रताराचं सुख । रुक्मीन सांगती बापाला
मोतीयाचे घोस । माझ्या देवाच्या रथाला ॥
भ्रताराचे सुख । रुक्मिन सांगती बापाला
शामकर्ण वारू । माझ्या देवाच्या रथाला ॥
भ्रताराच सुख । रुक्मीन सांगती भावाला
सोनियाच्या येशी । माझ्या पंढरी गावाला ॥
इठ्ठलाचं सुख । रुक्मीन सांगती भावाला
सोन्याचे कळस । माझ्या पंढरी गावाला ॥
इठ्ठलाचं सुख । रुक्मिन सांगती भावाला
कीर्तनाची हवा । माझ्या पंढरी गावाला ॥
इठ्ठलाचं सुख । रुक्मिन सांगती भावाला
चंदरभागा येचं पानी । माझ्या पंढरीरायाला ॥
इठ्ठलाचं सुख । रुक्मिन सांगती भावाला
सव्वाशें बामन । माझ्या देवाच्या पुंजेला ॥

इठ्ठलाचं सुख । रुक्मिीन सांगती भावाला
· राजमंदीरीं माझ्या । वारा लागन दिव्याला ।।
इठ्ठलाचं सुख । रुक्मिन सांगती घडनीला
सोन्याचा गरुडखांब । देवाच्या जोडनीला ।।
इठ्ठलाचं सुख । रुक्मीन सांगती माहेरी
मोती पलंगाला दोहेरी । देवा या इठ्ठलाच्या ।।
इठ्ठलाचं सुख । रुक्मिन सांगती गोतांत
हळदीकुंखाच्या पराती । मह्या देवाच्या रथांत ।।
इठ्ठलाचं सुख । रुक्मीन सांगती बापाघरीं
बुक्याचा भडिमार । साता ताळाच्या रथावरी ।।

## समुद्रमंथन

समुद्र–मंथनीं । रत्न काढिले चौदा ।
केला वासुकी पैदा । पांडुरंगानं माझ्या ।।
शेषाचा रविदोर । मेरूचा माथला
यानं समुद्र मंथिला । हरि दयाळानं माझ्या
समुद्रमंथनीं । पर्वत खाले जात
कासव झाला तेथ । हरि दयाळ माझा ।।
समुद्र मंथितांना । रवी गेली रसातळा
सावळा पांडुरंग । कूर्मरूपी हो सावळा ।।
समिंदर घुसळीतां । देव–दईत भागले
हरि घुसळू लागले ।।
समिंदर घुसळीतां । वासुकीला आला फेस
हरि घुसळी सावकास ।।
समुद्रमंथनीं । निघालं काळकूट
नील वर्ण झाला कंठ । देवा या शंकराचा ।।
समुद्र मंथितांना । काढिली आदिशक्ति
पूर्ण ब्रह्म नारायण । पराक्रमी सांगू किती ।।

समुद्र मंथूनीं । काढिली लक्ष्मीबाई
सावळा पांडुरंग । झाला शेषाचा जावाई ॥

समुद्र मंथूनी । काढीले रत्न किती
झाला लक्षुमीचा पति ॥

समुद्र मंथूनी । कढीली लक्षुमी
विष्णूच्या सिंव्हासनीं । स्थापन केली सई ॥

समुद्र मंथूनी । काढीली कामधेनु
हरि दयाळाला । पराक्रमी किती मनू ॥

समुद्र मंथूनी । रत्न काढीले चारी
हरि दयाळ माझा । लक्षुमीचा अधिकारी ॥

समुद्र मंथूनी । काढीला ऐरावत
आहे इंद्राच्या सभेंत । अंबारीचा हत्ती ॥

समुद्र मंथूनी । काढी अम्रुताचा पेला
हरि सावळा माझा । मोहनीरूप झाला ॥ १७०

समुद्र मंथूनी । अम्रूत काढीलं
मोहनीरूपानं । नाही यानं वाढीलं ॥

समुद्र मंथूनी । रत्न काढीले चौदा
केला देवांनीं सवदा ॥

देवादैत्याच्या पंगती । बसल्या शेजारी
असा वाढू आला । मोहिनीरूप हरि ॥

देव दइत्याच्या । यांच्या बैसल्या पंगती
अम्रुत चुकवुनी । त्यांना मव्हनी वाढिती ॥

देव ग दैत्य । दोन्ही बैसले खेटून
सावळा हरि माझा । देतो अम्रूत वाटून ॥

समुद्रमंथनीं । रत्न निघाले फार
पूर्ण ब्रह्म आवतार । हरि दयाळ माझा ॥

# खंडोबा

उंच वसरीला । समोर देवघर
येता जाता नमस्कार । देवा मझ्या मल्हारीला ॥
मना घुरट तूप कोनी । धनगराची बानू
जेजुरीच्या खंडेराया । तुला लुब्ध झाली बानू ॥
काखला कोकरूं । बानू चालली नटत
मल्लारी देवानं । झेंडा रवला पेठंत ॥
धनगरीनबाई । तुह्मा ताकामंदीं माशा
देव ह्यो मल्हारी । सोडीना तुहा पिच्छा ॥
धनगरवाड्यांत । कुतऱ्याह्यचा केंघा
देवा मल्हारीनं । बानू नेली लाल बागा ॥
धनगरवाड्यांत । कुतरी भुकती
देव मल्हारीनं । बानू नेली कोन्या गती ॥
बानूबाई धनगराची । म्हाळसा चडाची
नाहीं तिला रेंघू देली । उच पायरी गडाची ॥
काखला कोकरूं बानू बुंथीची देखीली
म्हाळसाबाईनं । आरती उभ्यानं टाकली ॥
म्हाळसा बानाई । भांडती सवती एवा
डोघीचा झगडा । आईक माह्या देवा ॥
म्हाळसा मने बानू । तुझं काज काई
मल्हारी राया देव । चोरून भंडारी दावी ॥
बानाई धनगराची । म्हाळसा वान्याची
दोघीच्या दोन जाती । मल्हारी देवासाठीं ।
बसल्या यक्या ताटीं ॥

× × × ×

देवा मल्हारीचा । झाडीते देवकोनी
सापडली हिरकनी । बाई नैनंती माझी ॥

देवा या मल्हारीचा । झाडीतें दरबार
सापडले मोतीसर । बाळ नेनंते माझे ॥
देवा माझ्या मल्हारीची । पूजेची झाली येळ
फुलाला गेला बाळ ॥
देवा माझ्या मल्हारीच्या । हे ग कमरेला मोती
नवसाचा सांगू किती । बाळराजस माझा ॥
अंबारीचा हत्ती । आंगनीं उभा केला
गढीला रंग देला । देवा मझ्या मल्हारीच्या ॥
माझ्या दारावून । हत्ती गेले बारा तेरा
पालखीला इंजनवारा । देवा माझ्या मल्लारीच्या ॥
माझ्या दारावून । हत्ती गेले वीस तीस
पालखीला मोतीघोस । देवा माझ्या मल्लारीच्या ॥

× × × ×

घरीं पठारावर । देव मल्हारी उभा राहे
सख्या माझ्या जिवलगा । भक्ताची वाट पाहे ॥
हाळदीचं जात । वढन माळसला
मल्हारीराय देवा । हाक मारी बानू तुला ॥
जेजूरगडावरी । वाघ्या मुरळीच ठान
देव मल्हारीराया । गर्दी झाला भंडाऱ्यान ॥
जेजूरीला जाया । तय्यारी झाली माझी
भाशा बांधवा माझ्या । हैती गाडीला बैल तुझी ॥
गाडीच्या बैलाला । घाटया घागऱ्या लावू
चला जेजूरीला जाऊ । बाळराजा माझ्या ॥
जेजूरीच्या वाट । हळदीचे मळे
देवा मह्या मल्हरीच्या । पदर शेल्याचे पिवळे ॥
जेजूरीच्या वाट । हळदीचे पेव
भक्ता उधळीत जाव । बाळराजा मह्या ॥

22848 (११) दि: 3104
क्रमांक 931e नों: दि: 30199214/60

नवलाख पायरी । जेजूरीगडाला
देली गवंड्याच्या बाळाला । गळयांतली कंठी ॥
जेजूरीचा गड । येंगता जाईल जड
सांगते भावाला । दुरून रे पायां पड ॥
जेजूरीचा गड । मी त येंगते भारानं
कड्यावरी पुत्र । नवस केलेत देरानं ॥
सवासिनी सांगू गेल्या । करंज्यावरी रवा
मह्या वडील बाईच्या । एक्या घरीं तीन जावा ॥
जेजूरी गडावरी । कोनी करी वारी हात
जिवलग सख्याच्या । माळूदेव मुंडाशांत ॥
जेजूरी गडावरी । येक उठली आरोळी
पाठच्या र भाऊ माझ्या । हौशा उचलावी तळी ॥
देवा मल्हारीच्या । भंडारीला सोनं
बाळा तुमचा पायगुन । दईवाला काय उन ॥
देवाच्या देवळांत । पिवळं पटांगन
भक्त घेती लोटांगन । खंडोबा देवापुढें ॥
देवा माझ्या मल्हारीचं । पिवळं पटांगन
देरा माझ्या राजसा । घ्याव भक्ता लोटांगन ॥
हिरवी ग साडी । पिवळी ग भंडाऱ्यानं
हे ग वाजवीत । जेजुर केली पांडवानं ॥

× × × ×

सटीच्या महिन्यांत । खंडोबा नवरा
झाला डोंगर पिवळा । सख्याच्या भंडाऱ्यानं ॥
सटीचे नवरात्र । नाहींत आसोपाशीं
मल्हारी देवापशीं । जळतो नंदादीप ॥
सटीच्या महिन्यांत । खाऊने कांदा, वांग
बाळानं गुरु केला । जेजुरीचा पांडुरंग ॥

सटीच्या महिन्यांत । खंडोबाचं नेत
बाळ नेनंता माझा । वारी माग रुमालांत ॥
सटीच्या महिन्यांत । करीतो वारी वारी
माझ्या नेनंत्या बाळा । तुला पावले मल्हारी ॥
पहीली मुळचिठी । मैलारीच्या लाडीकाला
देवा माझ्या मल्हारीच्या । हिरवी बनात गाडीला ॥
सांगून धाडीते । माझ्या घरीं आहे सन
याव म्हाळसा घेऊन । मल्हारी राया माझ्या ॥
कुंभार दादा । डाक वाजव खल्लाळून
देव मुंजोबा राजा । आला पिपळ सोडून ॥
मझ्या ग गांवाकडे । डाक वाजे तराडूनी
आला मैलार सोडूनी ।मल्हारीं राया माझा ॥
माझ्या ग गावाकडे । हालक्याचा परीपाठ
आला नौबद्या ठोकीत । खंडोबा राया माझा ॥
सटीच्या दिशीं । माझ्या घरीं भरी पानी
गुळखोबऱ्याची गोनी । मल्हारीराईयाची ॥
सटीच्या दिशीं । आंगनीं झाली दाटी
हातीं भंडाऱ्याची वाटी । बाळराजाच्या माझ्या ॥
यंकोबा पाव्हना । खंडोबा घरधनी
येका पंक्तीला भोजनीं । मल्हारी महाराजाच्या ॥
मल्हारी घरधनी । अंबाबाई ग पाव्हनी
जेवून गेले सये । येक्या पंगतीला दोन्ही ॥
देवा खंडोबाच । जाग्रन होत दारीं
देवा मुंजोबाची । डाक वाजती दोहेरी ॥

## राजस यज्ञ

सोन्याचे खांब । मोत्याच्या झालरी
कह्याचा यवढा थाट । यज्ञे पांडवाह्यच्या घरीं ।।
स्वर्गलोकाहुनी । आली नारदाची स्वारी
पंडूचा जरी पुत्र । राजस यज्ञ करी ।।
पंडूचा निरोप । नारदाहातीं आला
राजस यज्ञाचा । धर्मानं वेत केला ।।
सोन्याच्या नांगरानं । प्रिथिमी नांगरिली
राजस यज्ञासाठीं ।धर्मानं जागा केली ।।
आकाशीं मंडप । सरूचे दिले खांब
राजस यज्ञाला । केला धर्मानं आरंभ ।।
आकाशीं मंडप । जडिताचे खांब
धर्मराजा तुमच्या घरीं । यज्ञाला आरंभ ।।
सोन्याच्या खांबाला । मोत्याच्या झालरी
धर्मराजा तुझ्या घरीं । यदन्याची शामगिरी ।।
धर्माच्या घरीं । राजस यज्ञ भारी
रंगारंगाच्या रांगोळ्या । देव मारवती भरी ।।

## श्रीकृष्णांस मूळ

सोन्याचं तोरण । धर्मराजाच्या वाड्याला
मूळचिठ्या सोयऱ्याला । द्वारकेच्या हारीला ।।
धर्म म्हने अर्जुनासी । तुम्ही जाव द्वारकेसी
राजस यज्ञासाठीं । आनावें माधवासी ।।
द्रोपती निरोप सांगे । लागे अर्जुनाच्या कानीं
सोळा सहस्र अष्ट नायिका । कृष्णासहित रुकमिनी ।।
पुढें चालला रथ । मागं उडते धूळ
राजस यज्ञासाठीं । कृष्णाशीं गेलं मूळ ।।

अर्जुन गेले द्वारकेला । थोर आनंद झाला मनीं
आजी मी देखियेले । रामकृष्ण सिंव्हासनीं ।।
अर्जुन गेले सभेसी । समोर जगजेठी
नरनारायन भेटले । फारा दिवसा पडल्या गाठी ।।
राजस यज्ञाचा । धर्मानं बेत केला
सावळ्या यदुवीरा । यज्ञाला जाऊ चला ।।
अर्जुन बलावितो । छप्पन कोटी यादवाला
तुम्ही माझ्यावर चला । देव बळीराम दादा ।।
अर्जुन बलावितो । छप्पन कोटी यादवाला
प्रद्युम्न आनिरुद्ध । तुम्ही सर्वेजन चला ।।

## श्रीकृष्ण यज्ञास निघतात

कुटुंबासहित । रामकृष्ण कोठे जातो
धर्मराजाच्या घरीं । राजस यज्ञ होतो ।।
देव म्हणे बळीराम दादा । तुम्ही बरोबरी चला
राजस यज्ञाचा । धर्मानं बेत केला ।।
रुक्मिनीकडे पाहूनी । हासले चक्रपानी
राजस यज्ञासटी । चला तुम्ही साऱ्याजनी ।।
रुक्मिनीला पाहून । बहु उल्लासले मनीं
रामकृष्ण दोन्ही । बसले रथासनीं ।।
राजस यज्ञा जाया । निघाले घननीळ
देव मारवती । पुढें अंजनीचं बाळ ।।
सोन्याच्या रथांत । रामकृष्ण हे बसती
हस्तिनापुरा जाया । रथ पालख्या होत्या किती ? ।।
पांडवाच्या घरीं । यज्ञाचा गजघाट
द्वारकेच्या वाट । रथ गेले तीनशे साठ ।।
द्वारकेच्या वाटन । गगनीं उडतो धुराळा
जातो राजस यज्ञाला । रथीं बसून सावळा ।।

मोतीयाचा तुरा । पडला वाटवरी
राजस यज्ञासाठीं । तातडीनें गेले हरि ॥
धर्मराजाच्या घरीं । यज्ञाची आइत
आले द्वारकेचे हरि । रुक्मिणीसहित ॥
राजस यज्ञ । धर्मराजानं केला
हरि सावळा माझा । द्वारकेहूनी आला ॥

## श्रीकृष्णांचा सत्कार

शामकर्ण वारु । आंगनीं कोनाचा ?
सावळा कृष्णनाथ । मेव्हना पांडवांचा ॥
अंबारीचा हत्ती । उभा केला यज्ञद्वारीं
धर्मराजाच्या घरीं । पाव्हनं आले हरि ॥
शामकर्ण वारु । महाद्वारीं उभा केला
धरून देवाच्या हाताला । यज्ञमंडपांत नेला ॥
धर्म येऊनी सामोरा । रामकृष्णांचा मान केला
धरून देवाचा हात । यज्ञमंडपांत नेला ॥
सुभद्रा द्रोपती । सामोऱ्या रुक्मिनीला ॥
देऊनी हळदी-कुंकू । सर्वांचा मान केला ॥
देव आले मंडपांत । द्रोपती पाय धरी
त्याह्यच्या पद्माचा उजेड । पडला चुड्यावरी ॥
द्रोपती सुभद्रा । करीती नमस्कार
देला चुड्याला आशीर्वाद । मनीं हासले यदुवीर ॥

## कामाची वांटणी

राजस यज्ञामध्यें । काम देलेत नेमून
देव नारायेन । उभा कंबर बांधून ॥
राजस यज्ञाचे । काम देलेत नेमून
देवा माझ्या नारायनाचं । मध्यभागीं सिंव्हासन ।

राजस यज्ञामध्यें । काम करी कोन कोन ?
द्रोपतीसहीत । भीम ग अरजून ॥
नकुळ सहदेव । ब्राह्मणाची पूजा करी
राजस यज्ञामध्यें । अर्जुन साह्ये करी ॥
धर्मराजाच्या घरीं । कारभारी कोन कोन ?
देवांनीं नेमीयेले । द्रव्यावरी दुर्वेधन ॥
राजस यज्ञामध्यें । दुर्योधन कोठीवरी
आतां मच्छयंत्र । उजव्या त्याच्या हातावरी ॥
धर्मराजाच्या घरीं । कारभारी कोन कोन ?
अंगीं त्याच्या **नवनीत** (?)। दान वाढीतो दुर्वेधन ॥
राजस यज्ञाचा । कोठीवाला कोन
कोठीवर **भीवसन** । वाटी सिद्धा हावसन ॥
देव भावाचा भुकेला । भक्तीन आकळतो
राजस यज्ञामध्यें । पाय ब्राह्मणाचे धुतो ॥
राजस यज्ञ । धर्मराजाचे घरीं
हरि सावळा माझा । ब्राह्मणाचे पात्र काढी ॥

## यज्ञ-वर्णन

राजस यज्ञाला । सारे रुपी बोलाविले
वसिष्ठ वामदेव । कपिल महामुनि आले ॥
राजस यज्ञ । धर्मराजानं केला
कुटुंबासहित । इंद्र सभेचा आनीला ॥
सोन्याच्या मुद्या । तुपांत नितळती
यज्ञाला बसले । धुर्पती तुमचे पती ॥
होम ग शाळेला । मोती पवळ्याचे घोस
द्रोपतीबाई माझे । त्रिवेणी खालीं बस ॥
पिवळा पीतांबर । माय द्रौपदी नेसली
धर्माशेजारीं बसली । यज्ञ ग मंडपांत ॥

यज्ञाचं कंकन । धर्मराजाच्या हातांत
शोभा देती बाई । धुपंती मंडपांत
राजस यज्ञामधे । सभेला तेज कसे ?
धर्माच्या शेजारीं । बाई द्रोपती बसे
धर्मराज्याच्या घरीं । यज्ञाला आली लाली
शालजोडी पांघरली । बाई द्रोपती माझी
राजस यज्ञामध्यें । रुषी मंत्र हे म्हनीती
धर्मराजाच्या हाताला । हात द्रोपदी लाविती
यज्ञाचं कंकन । धर्मराजाच्या दंडांत
तुपाची धार पडे । यज्ञाच्या कुंडांत
सोन्याचं कंगन । धर्मराजाच्या दंडांत
पडे रात्र न दिवस । धार तुपाची कुंडांत
तुपाची हे ग धार । हत्तीच्या सोंडवानी
असा राजस यज्ञ । केला बाई पांडवांनीं
हिऱ्या माणकांची । मयासुरानं सभा केली
राजस यज्ञांत । दक्षणा धर्मानं वाटली
राजस यज्ञांत । बामनांची झाली दाटी
चंदनाच्या तबकांत ।धुपंती सोनं वाटी

## श्रीकृष्णाचा अहेर

इस्वर बोले पार्वतीला । आपुन यज्ञाला जाऊ
धर्मराज द्रोपतीला । आहेर होतो पाहू
रुक्मिनी येऊन । द्रोपतीला नाहू घाली
हिऱ्यामोत्याचे अलंकार । चोळी पैठनी हातीं देली
राजस यज्ञामधे । वाजंत्र्याचा कडाका
धर्मराज द्रौपदीला । आहेर करी प्रानसखा
राजस यज्ञामधें । वाजंत्र्याची घाई
धर्मराज-द्रौपदीला । आहेर करी शेषेशाई

राजस यज्ञामधें । सभेला दाटी काय
धर्मराजाला आहेर । करीती देवराय
राजस यज्ञामधें । सभेला झाली दाटी
धर्मराजाला आहेर । करिती जगजेठी
राजस यज्ञामधें । वाजंत्री वाजती
धर्मराजाला आहेर । करीती यदुपति
द्रोपदी नेसली । पिवळा पीतांबर ।
राजस यज्ञांत । केला भावानं आहेर
धुर्पतीबाई लेली । हिऱ्यामोत्याची कनचोळी
राजस यज्ञामधे । करी आहेर वनमाळी
राजस यज्ञाची । सभा दिसती तांबडी
धुर्पती बाई माझी । पांघरली शालजोडी
सुभद्रा नेसली । पिवळा पीतांबर
राजस यज्ञामधें ।केला क्रिष्णानं आहेर
जरतारी सेले । भीमा-अर्जुना पांघरिले
राजस यज्ञांत । नकुळसहदेव द्रिष्टावले
राजस यज्ञांत । वाजंत्र्याचा गजेर
धर्मराजा द्रोपतीला । राजे करीती आहेर

## नांव घेणें

रुक्मिणी म्हणीती । द्रौपदीबाईला
पांची पांडवांचे । नांव घ्यावेत सभेला
पांची पांडवांत । धर्मराजा पुन्यशीळ
पाठीशीं घननीळ । द्रौपदी नांव घेती
पांची पांडवांच । याज्ञसेनी जाणे वर्म
वहिनी तुम्हांला सांगतें । जन्मा जावो राजा धर्म
साता समुद्राचा । आहे प्रिथ्वीला येढा
वहिनी तुम्हांला सांगतें । भीमासारीखा नाहीं जोडा

पांची पांडवांत ।अर्जुन धनुर्धर
त्याच्या रथांत दामोदर । द्रौपदी नांव घेती
पांची पांडवांत । अर्जुन भक्तिवान
त्याच्या रथावरी । सारथी भगवान
पांची पांडवांत । नकुल रूपवान
वहिनी तुम्हाला सांगते । जसं पुनवचं चांदन
पांची पांडवांत । वडील राज्यावरी
सहदेव एकनिष्ठ । चौघांची सेवा करीं
सात्त्विक सहदेवाची । कीर्ति दूरवर गेली
राजस यज्ञामध्यें । दक्षेना यानं देली
सुभद्रा नांव घेती । करू नका गलबला
कृष्णानं देलं मला । अर्जुना संन्येशाला
अर्जुन म्हणीतो । मला संन्याशी कोणी केलं
सुभद्रा नांव घेती । देवा तुम्ही आयकिलं
द्रौपती मनीती । सुभद्रा आहे पोर
आतां नांवासाठीं । काय रुसावं तिच्यावर

## ब्राह्मण–भोजन

लक्ष बैसल्या पंगती । द्रौपदी बाई वाढी
करुनी ब्राम्हनांची पूजा । धर्मराज हात जोडी
रुषींच्या पंगतीला । वाढीती कोन कोन
वसिष्ठाची अरुंधती । कृष्णाची बहीन
राजस यज्ञामधें । कोन कोन वाढीइती
वसिष्ठाची अरुंधती । लोपामुद्रा बलाविती
राजस यज्ञांत । लक्ष ब्राम्हन जेवती
द्रोपदी बाई वाढी । पक्वान्नाचें ताट हातीं
लक्ष बैसल्या पंगती । बाई द्रौपदी वाढीती
देव विमानीं पाहाती । जसी वीज चमकती

राजस यज्ञांत । कोन वाढिती सया
द्रौपती रुखमीन । ननंद-भावजया
राजस यज्ञांत । कोन वाढीती सई
बाई द्रौपती माझी । पैठनीचा घोळ खवी
राजस यज्ञामधें । लक्ष ब्राम्हनभोजन
ब्राम्हनाला तूप वाढी । वसुदेवदेवकीनंदन
राजस यज्ञांत । तूपवाला कोन झाला
देवा नारायेनाच्या । पवित्र जानव्याला
बाई धुर्पतीची । गांठ चोळीची सुटली
धांवा धांवा यादोराया । सभा वैऱ्याची दाटली
द्रौपतीबाई वाढी । गांठ चोळीची सुटली
पाठीसी भगवान । सती चतुर्भुज केली
द्रौपदी बाई वाढी । पाठीशीं शेषेशाई
पांडवांचा साहेकारी । कोठ कांहीं उन नाहीं
राजस यज्ञांत । लक्ष ब्राम्हनांचा वळी
देव नारायेन । अंग काढी पत्रावळी
राजस यज्ञांत । उच्छिष्टाची लगबग
हरि सावळा माझा । मोहनमाळ टाकी माघं
राजस यज्ञांत । देवाला श्रेम फार
द्रौपदीं बहीन । घाम पुसी वारंवार
ऋषींची पंगत । वाढोनी मुरडली
माय द्रौपतीला । सभा तुला मानवली

## शुक प्रसादास येतात

स्वर्गीच्या घंटा । वाजती घणा घणा
धर्मराजाच्या घरीं । शुक आलेत भोजना
राजस यज्ञामधें । धर्म कृष्णाला पुसत
स्वर्गी वाजला घंटा । झालं लक्षाचं गणित

१७०६

लक्ष पंगती बैसल्या । स्वर्गी घंटानाद झाला
कृष्ण म्हने धर्मराजा । शुक प्रसादाला आला
लक्ष पंगती बैसल्या । स्वर्गी घंटनाद होतो
राघूच्या रूपान । शुक प्रसाद येचितो
स्वर्गी झाला नाद । कोनी लावीन गनती
राजस यज्ञामधें । शुक बसले पंगती
राजस यज्ञामधें । धर्मराजा यजमान
जेवून गेले बाई । शुकासारिखे ब्राम्हन
राजस यज्ञामधें । धर्मराजा यजमान
शुकासारिखे ब्राम्हन । तुष्ट झालेत जेवून
राजस यज्ञामधें । पुन्यें झालं थोर
सरगींचा घंटा । वाजतो वारंवार
राजस यज्ञामधीं । स्वर्गी घंटा ग वाजतो
धर्मराजाचा पिता । इंद्र सभीं बैसवितो

## अग्रपूजा

राजस यज्ञ झाला । धर्मराजाच्या ग घरीं
देव नारायेन । अग्रपूजेचा अधिकारी
अग्रपूजेला आले हरी । उद्धव अक्रूर हात धरी
राजस यज्ञाची । उठून उभी सभा सारी
हि-यामोत्याची सभा । महेसरानं केली
देव बसले सिंव्हासनीं । सभेसी सोभा आली
द्रोपती बाईला । नकुळान बलाविले
अग्रपूजेसटीं । धर्मराज खोळंबले
धर्म धुती पाय । द्रोपती घाली पानी
नकुळ म्हने सहदेवा । अग्रपूजेचं ताट आनी
राजस यज्ञांत । भीष्म सभा बयसती
अग्रपूजेचं ताट । सहदेवाहातीं

राजस यज्ञांत । संध्यापात्र सोनियाचे
आधीं अग्र ग पूजन । देवकीच्या तान्हीयाचें
हिऱ्यामोत्याचे अलंकार । वऱ्हे तुळशीचा हार
देवाची द्रिष्ट काढी । द्रोपती वारंवार
राजस जरी यज । धर्मराजानं केला
अग्रपूजेचा मान । देवा गोविंदाला देला
द्रोपदी मनीती । वहिनी तुम्ही नांव घ्यावं
छप्पन कोटी यादवराव । आहेत अवघ्याहिला ठाव
द्रोपदी मनीती । वहिनी तुम्ही नांव घ्यावं
भीमकानं देल मला । अनंत त्याचे नांव
सुभद्रा बाई म्हने । वाहिनी तुम्ही नांव घ्यावं
तिन्ही लोकांमध्यें । प्रसिद्ध केशव
अर्जुनानं देव । अडविले यज्ञद्वारीं
सोड सोड अर्जुना । सोळा सहस्र नारी
। नांव घेऊ कोठवरी
राजस यज्ञ झाला । धर्मराजानं ग केला
अग्रपूजा देली याला । हरि सावळ्याला माझ्या

## ( निरोप देणें )

राजस यज्ञे झाला । राजे निरप मागती
देउनि आहेर विडे । धर्म सन्मान करीती
राजस यज्ञाचा । द्याकार वाटीला
कुटुंबासहित । कृष्ण द्वारकेला गेला
धर्मान निरोप देला । छप्पन कोटी यादवाला
रुक्मिनीसहित । माधव निघाले द्वारकेला
सोन्याच्या पालखींत । रामकृष्णाची स्वारी
धुर्पतीला पुसे हरी । पांडव बसलेत राज्यावरी
। पुन्हा येऊ लवकरी

——

# मीठ

प्रथम नमो गनपती । आनिक माता सरस्वती
पूर्न द्यावी मज मती । गुरुराया
उत्तम गोविंदाचे गुन । निजेभावें मी वर्नीन
चित्त होईल समाधान । संतोषेल
सर्व श्रोते करा श्रवन । पूर्व पातक होईल भस्म
अैसें तारक हरिनाम । कलियौगीं.
व्रतदान तपदान । यथासांग नव्हे पूर्न
कलींत अन्नमय प्रान । मानवाचे
म्हनूनि नाम एक सार । उच्चारावें वारंवार
उतरून जावे भवसागर । हरिकृपे
एके दिवशीं साऱ्या जनी । मिळून कृष्णाच्या कामिनी
आल्या रुक्मिनीच्या सदनीं । क्रीडावया
अष्टनायिका हिरकनी । रुखमीन पट्टरानी
मध्यें शोभे सारंगपानी । चंद्र जैसा
रत्नजडीत सिंव्हासन । त्यावर बसले नारायन
अर्ध्या अंगीं रुखमीन । आदी शक्ती
प्रथम विनवी सत्येभामा । आवडतें कैशी तुम्हा
सत्ये सांगा पुरुषोत्तमा । मेघश्यामा
हासू आले गोविंदासी । प्रती-उत्तर दे भामेसी
चित्तांतूनी आवडसी । प्रिय नारी
जगीं उत्तम जैसा गुळ । तैसी आवड सर्व काळ
मग ती संतोषली वेल्हाळ । नमन केलें
नमन करुनी गोविंदासी । जाऊनि बसली आसनाशी
आनंद मावेना चित्ताशी । सांठवेना
मग ती विनवी जांबुवती । सत्य बोला प्रानपती
माझी आवड कोन्या रीती । सांगा स्वामी

जगीं उत्तम साखर गोड । तैसी आवड सर्व काळ
मगती संतोषली वेल्हाळ । नमन केलें.
नमन करुनी गोविंदाशी । जाऊन बसली आसनाशीं
आनंद मावेना चित्ताशीं । सांठवेना
मग ती विनवी कालिंदी । सत्ये बोला कृपानिधी
माझी आवड कोन्या विधीं । सांगा हो स्वामी
जगीं उत्तम जैसा पेडा । तैसा तुमचा आमचा जोडा
आनंद झाला मग केव्हडा । नमन केलें.
नमन करुनी गोविंदासी । जाऊनि बसली आसनाशीं
आनंद मावेना चित्ताशीं । सांठवेना
मग ती विनवी मित्रविंदा । सत्ये बोला हो गोविंदा
माझी आवड आनंदकंदा । कोन्या हो विधी
जगीं उत्तम साखरखडी । तैसी प्रिये तुझी गोडी
आनंद झाला हो तातडी । नमन केलें
नमन करुनी गोविंदासी । जाऊनि बसली आसनाशीं
आनंद मावेना चित्ताशीं । सांठवेना
मग विनवी नग्नजिती । सत्ये बोला प्रानपती
माझी आवड कोन्या रीती । सांगा स्वामी
जगीं उत्तम जैसें दूध । तैसी आवड तुझी सिद्ध
झाला नारीसी आनंद । नमन केलें
नमन करुनी गोविंदासी । जाऊन बसली आसनाशीं
आनंद मावेना चित्ताशीं । सांठवेना
मग ती विनवी भद्रावती । सत्ये सांगा प्रानपती
माझी आवड कोन्या रीती । सांगा स्वामी
जगीं उत्तम जैसा मध । तैसी आवड तुझी शुद्ध
झाला नारीसी आनंद । नमन केलें
नमन करुनी गोविंदासी । जाऊन बसली आसनाशीं
आनंद मावेना चित्ताशीं । सांठवेना

मग ती विनवी लक्षुमणा । सत्ये बोला नारायेणा
माझी आवड तुमच्या मना । कोण्या रीती
जगीं उत्तम जैसें तूप । तैसें आवडतें रूप
आनंद झाला आमोलिक । नमन केलें
नमन करुनी गोविंदासी । जाऊन बसली आसनाशीं
आनंद मावेना चित्ताशीं । सांठवेना
सोळा सहस्र विनविती । सत्य बोला प्राणपती
आमची आवड कोण्या रीती । सांगा हो स्वामी
जगीं उत्तम जैसी बर्फी । तैसी तुम्हांवरी प्रीती
आनंद झाला मग तो किती । नमन केलें
जगीं उत्तम जैसा खवा । तैशी तुमची आवड जीवा
आनंद झाला मग तेधवा । नमन केलें
जगीं उत्तम जैसें लोणी । तैशा तुम्ही साऱ्याजणी
आनंद झाला मग कामिनी । नमन केलें
नमन करुनी गोविंदाशीं । जाऊनि बसल्या आसनाशीं
आनंद मावेना चित्ताशीं । सांठवेना
मग ती विनवी रुखमिणी । सत्य बोला चक्रपाणी
माझी आवड तुमच्या मनीं । कोण्या रीतीं
हसून बोलले गोपाळ । तुझ्या प्रीतीचा कल्लोळ
आनिक नसहे वेळोवेळ । रुखमिनी
जगीं उत्तम जैसें लोण । तैसें तुझ्यावरी मन
भीमकबाळी झाली खिन्न । आपल्या चित्तीं
सोळा सहस्र हांसती । ठायीं ठायीं कुजबुजती
अनिक डोळ्यानें खुनविती । एकुनएकी
उदास रुक्मिनीचं मन । सर्व अंगें झालीं क्षीन
आपल्या प्रालब्धाचा गुन । सखेबाई
भामा म्हने रुक्मिनीसी । आम्हांहूनी श्रेष्ठ होसी
भ्रतारासी नावडसी । कोन्या गुनीं

मनीं दचकली सुंदर । उतरला मुखचंद्र
कंठीं दाटला गहिंवर । रुखमिनीच्या
मूर्च्छा दाटली शरीरीं । सर्व अंगीं आली घेरी
उलंगली धरनीवरी । भीमकबाळी
सोळा सहस्त्र सुंदरी । धांवुनि आल्या शेजेजवळी
तया म्हने वनमाळी । इंजने वारा
देव म्हणे रुखमिनी । दहा अवताराची रानी
आज कां पडली धरनी । उलंघूनी
देव म्हने रुखमिनी । काय राग धरला मनीं
सत्य सांग मजलागोनी । प्राणप्रिये
रुक्मिन बोलली देवासी । मजला निजवेना सेजेसी
सत्वर जावे हो सभेसी । वेळ झाली
परतुनि यावें मंदिराशीं । मग मी बोलन तुम्हांशीं
अवश्य म्हने रुषीकेशी । तयावरी
समजावूनी रुक्मीनीसी । निजवोनी निजशेजेसी
पांघरून घातलें तियेसी । कृष्णनाथें
सभेसी गेले नारायेन । आनंदले सभाजन
बैसविलें सन्मानानें । गोविंदासी
सभा दिसती शोभिवंत । देव मनीं चिंताक्रांत
आतां कशानें होईल शांत । भीमकबाळी
सभा सारोनी वेगेसी । देव विचारी मानसीं
सत्वर जावें मंदिरासी । देवकीच्या
सभा सारोनी वेगेसी । कृपावंत ऋषीकेशी
सत्वर गेले मंदिरासी । देवकीच्या
देवकी म्हणे तान्ह्या बाळा । मुखचंद्र झाला काळा
काय चिंता बा गोपाळा । उद्धवली
वानीचा तूं एकूलता । काय धरिली मनीं चिंता
सत्य सांग प्रिय पुत्रा । मजलागी

वानीचा मी तुझा साच । सोळा सहस्रांचा काच
कोठवर सोसू जाच । जननीये.
आज तुझ्या अवघ्या सुना । एके ठायीं मिळल्या जाणा
पुसती आवडीच्या खुणा । मजलागोनी
सांगितलं समस्तांशीं । सांगितलं रुक्मिणीसी
मिठासारखी आवडसी । म्हणोनीया
कोपूनीया मजवरी । कासावीस झाली भारी
उलंघली धरणीवरी । भीमकबाळी
देवकी म्हणे बाळकृष्ण । आधीं करावें भोजन
मग मी जाऊन समजावीन । रुक्मिणीसी
उदक उपसोनी गंगाळीं । स्नान घातलें करकमळीं
भोजनाशी वनमाळी । बैसविले
भोजन घालोनी देवाशी । शेजे निजवुनि गोविंदासी
देवकी गेली मंदिराशीं । रुक्मिनीच्या
सुनमुख देखोनी देवकीं । आदर गौरवे भीमकी
प्रीतिभावें धरोनि हातीं । मंदिरीं नेलें
रुक्मिन वंदीती चेरन । देवकी बोले आशीर्वचन
पांच पुत्र होतील जाण । सैभाग्यवती
वाणीच ग माझ तान्ह । तुम्हा दिसतय किलबिलवान
माझे की ग पंचप्राण । तयावरी
नाहीं केलं स्तनपान । झुरतसे माझं मन
कृष्णाच हें बाळपन । देखीलं नाहीं
कौंसाचिया बंदिशाळे । बहू छळिले भीमकबाळे
नाहीं तरी साती बाळे । असते की बाई
वानीचे बाई माझे मान । तुम्हास वाढिलं दैवानं
त्यावर माझे पंचे प्रान । रुखमीनी
सून तू माझी हिरकनी । आवडशी चित्तांतुनी
सोळा सहस्र कामिनी । दासी तुझ्या

सोळा सहस्त्रां वरिष्ठ । सून तूं माझी वडील श्रेष्ठ
आतां तोडील तुझं मीठ । ग रुक्मीणी
समजावूनी रुक्मिणीसी । पांघरूण घातलें तिजसी
देवकी आली मंदीराशीं । आपुलीया
उठोनीया सौख्यभरीं । नमिलीं देवकी सत्वरी
देव चालले मंदीरीं । आपुलीया
देखोनीया गोविंदासी । दासी म्हणती रुक्मिणीसी
घरीं आले रुषीकेशी । उठा हो बाई
घेवोनीया पंचारती । रुक्मीन ओवाळी श्रीपती
प्रीतीभावें धरुनी हातीं । मंदीरीं नेलें
येवोनीया आनंदानं । शेजे बसले नारायन
वदन पाहती न्याहाळून । रुक्मिनीचें
मुखचंद्र झाला काळा । कोमेजली भीमकबाळा
पाहोनीया घननीळा । कृपा आली
सहज बोललों वचन । तुज काय लागलें कठीन
माते देवकीची आन । आवडसी मज
मीठ त जगाचं जीवन । तुझं माझं एकच मन
पित्या वसुदेवाची आन । आवडसी मज
प्रातःकाळीं दुसऱ्या दिनीं । देवकी बैसे सुखासनीं
चक्रपानी आले सदनीं । देवकीच्या
देव बोले ग जननी । सोळा सहस्त्र कामिनी
आठासहित मेजवानी । करावी आम्हां
उठोनीया देवकी माये । सतवर लवलाह्ये
मंदिराशीं सांगूं जाये । सोळा सहस्त्रां
पाक सारोनी सत्वरी । सोळा सहस्त्र सुंदरी
आठां सहीत आले हरि । भोजनासी
काढोनीया रंगमाळा । रत्नदीपक सोज्वळा
करी देवकी सोहळा । कृष्णजीचा

मांडून सोनियाचे ताट । रत्नजडिताचे पाट
हिऱ्यामानिकाच्या वाट्या । झळकती
नानापरीचे रायते । आंब्यालिंबा–भोकराचे
करवंद–निरवंदाचे । वाढियेले
चटण्या कोशिंबिरी भाज्या । फळभाज्या पालेभाज्या
सांभारें फूलभाज्या । वाढीयेल्या
वड्या, पापड्या, कुरवड्या । त्यावर वाढील्या चिकवड्या
वडे बोंड मिरवड्या । वाढीयेल्या
सुंदर पुरणाची पोळी । त्यावर वाढिली गुरोळी
त्यावर वाढीली करंजी । सुकुमार
सुंदर मांडियाची घडी । त्यावर आळवाची वडी
दहींभातावर मीरपुडी । वाढीयेली
लाडू बुंदीचे सोज्वळ । दळव्या, बेसन मोतीचूर
फेनी जिलबी घीवर । वाढीयेला
भात वाढूनी सोज्वळ । वरतें वरण निर्मळ
साजुक ताकाची जे कढी । वाढियेली
तूप वाढोनी सुगंध । देवकी बोलली आनंद
आतां बैसावे गोविंद । भोजनासी
समस्त बसले भोजनासी । लोन नाहीं त्या पाकासी
रुचा येईना मुखासी । न गिळे अन्न
देवकी बोलली प्रगट । मीठ त जगाच खरट
तैसा गोविंदासी वीट । रुक्मीनीचा
अवघ्या जनी झाल्या खिन्न । खालीं घातलीसे मान
करती मौन्यें भोजन । न बोले कोणी
झालें सर्वांचे भोजन । वस्त्रभूषणें देऊन
बोळविले आनंदानं । देवकीनं
झाले मातेचें भोजन । तिघे बसले आनंदानं
विडा देतसे करून । रुखमीन

एके दिवशीं नारायन । चरित्र मांडीलं गहन
मीठ उडालें नगरांतून । एकाएकी
मिठासाठीं लहान थोर । पौर नारी सोळा सहस्र
आल्या धुंडीत राऊळ । रुक्मिनीचं
लोन नाहीं या पाकासी । रुचा येईना अन्नासी
मीठ द्या हो रुक्मिनबाई । पाकासाठीं

---

## माहेर

मह्या जीवाला वाटतं । तूप पोळी खाव
। अन् गवळ्याच्या गांवा जाव
दसऱ्यापसून । दिवाळी इसा दिशी
माहेरा कधीं नेसी । हारन मायबाई
दुरून दिसती । माहेरची पानंद
व्हतो जिवाला आनंद । भाऊ ग भाशियाचा
इथून दिसतो । माहेरचा हे ग वाडा
सराखालीं तळखडा । भाचा नेनंता माझा
इथून दिसतं । माहेरीचं ह्रिरवं रान
सख्याचं केळीबन । उतरीतो बागवान
दुरून दिसतो । माझ्या देसायाचा वाडा
चंद्र-सुखे कवाडा । भाई राजस माझे
चला ग फाया जाऊ । माझ्या माहेराच्या चाली
। पद्र काखनाच्या खालीं
माझ्या माहेरचा । मारोती कारभारी
नारेळाच्या गाड्या । सुटल्या दरबारीं

माझ्या माहेरीचं । कसं नांदनं सोयीचं
आई मारोतीचं । व्हत दर्शन दोहीचं
माहेर ग घरीं । राज्य केलं रावनाचं
हे ग उचलिलं नाहीं । पुढलं ताट जेवनाचं
माहेर ग घरीं । राज्य केलं मोंगलाई
मायबाईला माझ्या । भरला तांब्या देला नाहीं
मायबाईच्या घरीं । नाहीं म्या काम केलं
रांजनीचं पानी । कोसाच्या मानीं गेलं
मायबाईच्या घरीं । राज्य केलं राजावानी
रांजनीचं पानी । देलं माझ्या बंधुवांनीं
काय सांगू बाई । माहेरची बढाई
येसीपसून आंबराई । सख्यानं लावीयेली
जव्हर मायबाई । तव्हर माहेरा जाऊ द्या
पिकली आंबराई । यवढी सराई घेऊ द्या
जव्हर मायबाप । तव्हर माझी सत्ता
भाई राजसा माझ्या । नको बोलू दसरथा
माईचं माहेर । भावाची धर्मापुरी
सांगते बहिनाबाई । भाशाची लंका दुरी
देवाबापा नको । देऊ धन तू दौलत
द्यावं माहेर खेळाया । मायबापाच्या सावलीत

---

## ओवी गाईन देवाचड

फुलामधें फूल । फूल हुंगावं जाईचं
साऱ्या गोतामधें । सुख भोगावं माईचं

दिव्याच्या जोतीला। पतंग घाली झाप
लागला तुझा याप। माय हरना माझे
माळचाच्या मळ्यामधें। राघू-भरारी मारावी
हारन कवटाळून धरावी। माय मावली माझी
दिव्याच्या जोतीला। पतंग घाले उडी
भेटीसटी झालें येडी। मायबाईच्या माझ्या
चला जाऊ पाहू। प्रयागींचा वड
त्रिवेनीचं पानी गोड। हारन मायबाई
समुद्र सोशिल्यानं। जाईन माझी तहान
गंगा माझी आसमान। हारन मायबाई
तहान लागली। आरण्या वनांत
गंगा पांगली रानांत। माय हारना माझी
तहान लागली। आरण्य-डोंगरांत
गंगा माझ्या हृदयांत। हारन मायबाई
देसायाचा उपकार। फिटल काशी केल्या
मायबाईचा उपकार। फिटन काहीं केल्या
तळहाताचा पाळना। नेत्राचा केला दिवा
माय मावली ग तुझे। उपकार फेडू कव्हा
देसायाचा उपकार। फेडीन काडी काडी
मावलीचा उपकार। भिनला माझ्या हाडोहाडीं
मोडला काटा। रग माझ्या ग पायाला
नव महिन्याचं वझ। काय मनाव याला
नवू महिने वझ। वागविल निरीआड
ववी गायीन देवाचड। माय माझ्या हरनीला.

अनुक्रम 22848 दि. 9104
क्रमांक 2346 नों: दि: 30/9/1/56

# शेजी साइली–माय मावली

शेजी जेवू घाले । मालत्याची खीर
नाहीं आली तुझी सर । माय मावली ग माझे
शेजी जेवूं घाली । भरना माझं पोट
झाकून केलं ताट । मायबाईनं माझ्या
शेजी जेवू घाली । भरना माझं पोट
वरी ठेवीयला हात । मायबाईनं माझ्या
शेजी जेवू घाली । तूप खिचडी पापड
माते तुझा हात गोड । माय हारनाबाई
मायबाई जेवू घाले । खिचडीवरी तूप
माझ्या जेवनाची टूक । मायबाईला ठाऊक
इस्तारिलं ताट । वऱ्ही केळाची फनी
मह्या हारनीवानी । हाक मारिली कोनी
इस्तारिलं ताट । वऱ्ही तुपाचं मव्हन
मज्या हारनीसारखं । कोन वाढील जेवन
जिऱ्या साळीचे तांदुळ । दोन्ही आन्या बराबरी
जेवलें धनीभरी । मह्या हारनीच्या घरीं
येक्या गव्हाच्या । केल्यास बहूपरी
माझा आत्मा निवाला । मायबाई तुझ्या घरीं

× × ×

शेजी नाहू घाली । पाठ नाहीं वली झाली
मायबाईच्या नहान्यानं । नहानी खंगाळून गेली·
शेजी ग नाहू घाली । भिजला नाहीं धोंडा
मायबाई नाहू घाली । गल्लीनं गेला लोंढा
मायबाई नाहू घाली । निवला माझा माथा
मायबाईनं माझ्या । समुद्र केला रिता

शेजीं ग नटती । उसाच्या चुईला
    माय हारनीच्या घरीं । आंबे लोळती भोईला
शेजीच उसनं । माझ्या दारांत वसन
    मायबाईचं उसन । माझं पहेल्यापसून
मावलीची माया । काय करशील शेजीबाई
    कुठं पडल कुठं नाहीं । मिरगाचा पाऊस.

---

## वाघिणीचें दूध

काम मी करीतें । कामाला नाहीं भेलें
    वाघिनीचं दूध पेलें । मायबाईचं माझ्या
मायमावलीचा पान्हा । पेलें मी सरासरी
    कामांत राधे तुझ्या । आल्यें मी बराबरी
बत्तीस धाराचा । पान्हा पिल्यें मी हासून
    माय हारना माझे । तुझ्या मांडीवर बसून
बत्तीस धाराचा । पान्हा पिले कोन्या रंग
    मायबाईनं केला । मांडीचा चवरंग
दळन दळीतें । बाह्या माझ्या लोखंडाच्या
    मायबाईनं देल्या । घुटया मला येखंडाच्या
थोरलं जातं । वढाया नाहीं भिलें
    मायबाईचं माझ्या । दूध वाघिनीचं पेलें
थोरल्या जात्याला । नार माघारी फिरली
    मायबाईच्या दुधाची । म्या त हिंमत धरली
दळीतां कांडीईतां । अंगाची झाली गंगा
    मायबाईनं माझ्या । इनं चारिल्या लवंगा
दळन दळीतांना । करीना कुचराई
    माय माझ्या हारनीच्या । दुधाची चतुराई

दळन दळीतांना । अंग माझं घामेजलं
हारनं मायबाई । दूध तुझं इरजलं
दळना–कांडनानं । फुरती माझी बाही
दुधाची नवलाई । मायबाईच्या माझ्या
अम्रुताचा पान्हा । पिले झराझरी
आल्यें तुझ्या बराबरी । मायबाई माझे
थोरल्या जातीयाला । नार सरूऊनी गेली
दूध वाघीनीचं पेली । बहिनाबाई माझी
थोरल्या जातीयाला । नार बसली घपाघूळ
गोरीच्या संगतीनं । झाली तिची तारांबळ
थोरल्या जातीयाला । नार बसली कीचरट
। पडली वाघिनीची गाट

---

## गोत

गोतामध्यें गोत । मायेचं मंगळ
अन्तःकरण निराळं । मायबाईचं माझ्या
उदंड माझं गोत । वरीची वरघडी
सहिव शालजोडी । देसाईराया माझे
शंभर माझं गोत । काय करावं गोताला
भाईराजावांचून । कोनी धरीना हाताला
शंभर माझं गोत । शिववरून गेलं
देसाईराईयानं । जिव्हाळ्यानं येनं केलं
उदंड माझं गोत । झाडीझुडीचं गवत
मेरू मधें परवत । भाईराजस माझा
शंभर माझं गोत । नाहीं गोताची गरज
नेणंता भाईराजा । माझा किल्ल्याचा बुरूज

सगळं माझं गोत । माळावरलं तन
अन्तकर्नाचे दोघजन । भाईराजस माझे
सरवे गोत । माळाच गवत
मायजी बापूराया । मला दोघाची हिंमत
शंभर माझं गोत । झाडीचा झाडपाला
मायबाई माझे । शेवंतीचा वास आला
शंभर माझं गोत । झाडीचा झाडपाला
मायबाई हरणीचा । जाईईचा वास आला
गोतामध्यें गोत । मायबाई गोत
आसं आयकावं । पुरान भागवत
गोतामंदीं गोत । मायबाई गोत
पोथीमंदी भागवत । दिसत सोभावंत
गोतामंदी गोत । मायबाई गोत
हजार दिंडांमंधीं । पीतांबर देत जोत
शंभर माझं गोत । जशी कडव्याची सुडी
साखरची पुडी । माझी मायबहीन
सरवे गोत । येक्या पेंडीचा आळा
माय ग वाचून । कोठ लागन जिव्हाळा
शंभर मजं गोत । सरन जळत सावलीला
। दु:ख मज्या मावलीला
मावलीची माया । गोताला कुठून
आलं हुरद फुटून । माय मह्या हरनीचं

# माझं सुखदुःख

सुखा ग दुखाच्या । बांधित्यात पुडच्या
। उकलिनें थोडचा थोडचा

जिवा मह्या सुकदुक । उशाच ग पायत
येईल बंदव सोयरा । अन् करील सोईस

माझं ग सुखदुख । सांगू नका इथं तिथं
। हायत वाटवरी शेतं

मव्ह सुखदुख । कळालं मळचांत
शिवळा बैलाच्या गळचांत । भरल्या मोटा थारोळचांत

मज या सुकदुक । कळालं अर्ध्या रातीं
मज्या काशीच्या बाळाच्या । हिरवा खंदील डाव्या हातीं

मज या सुकदुक । जन मनी घाला घाला
रनसोद्या बंधू आला । सोयरिनी बोल मला
। आकरी बोळवन तुला

मज र सुखदुख । दुःखाचा मजा राजा
मजा काशींचा बाळ । वइदाला घाली बाजा

मज या सुकदुक । बंधु तुज्या मांडीवरी
। हिरवा शेला तोंडावरी

मज या सुखदुख । धंड पडलं पेवांत
बहीना माझी बाई । वाघीन गर्जली गांवांत

दुःखामागं दुःख । दुःखाचा आला पूर
जिवाला देती धीर । नेनंती प्रानसई

दुःखामागं दुःख । दुःखाचे झाले खडे
तुझ्यासाठीं येनं पडे । सावळे भावजयी

सुखदुःखाच्या बाई गोष्टी । ठेवीते माझ्या मनीं
कव्हा घालू तुझया कानीं । मायबाई मावलीच्या

———

## माझ्या घरीं मी

माझ्या मी ग घरीं । नको करूं माझा घोर
मायबाई माझे । मला वाटतं माहेर
माझ्या घरीं मी । सुखाचं पांखरूं
नको माझी चिंता करूं । माय हारनाबाई
माझ्या घरीं मी । लक्षापती राजा
मला आशीर्वाद तुझा । मायबाईचा माझ्या
माझ्या घरीं मी । लक्षापती नांदते
चोळी सजनाची लेतें । भाईराजसाची माझ्या
माझ्या घरीं मी । लक्षापतीची धनीन
तुझ्या चोळीची आशा करीन । भाई राजसा माझ्या
माझ्या घरींची मी । नेसन गुजरी
तुझ्या चोळीनं साजिरी । भाईराजसा माझ्या
मी आपल्या घरीं । कनगीच्या शिगा लोटी
बंधुराया तुमच्या । चोळीची आशा मोठी
माझ्या घरींचो मी । लक्षापती राजा
चौथाई भाग माझा । भाई राजसा रे
मी आपल्या घरीं । भाग्याची नांदते
भूषणानं चोळी लेतें । भाई राजसाची माझ्या

---

## कुंकू

देवा नारायना । तुझी धरमाची लेक
माझ्या कपाळीचं कुंकू । तुझ्या फुलामधें राख
देवाच्या देवळांत । गेलें होतें काल
कपाळीचं कुंकू । प्रसाद देला लाल
नारायना बापा । सुखाचे उगवा
माझं कुखाचं बगव । शेल्यापदरीं वागवा

हात म्या जोडीतें। तुळसीसंग नारायनाला
हळदीवरी कुखू । नित्ते माझ्या सिन्गाराला
आयुष्य चिंतितें। सासूबाईच्या पोटा
माझा शिनगार मोठा। हळदीवरी कुंखू
आवुक्ष्य चिंतीतें। सासूबाईच्या मंडळी
। त्यांत माझी कुंकू चोळी
सासूचा सासरवास। देराभाव्याच भुषान
लाल भडक निशान। कपाळीचं कुंकू
कुखाचा करंडा। सासूबाईचा ठेवा
हळदीवरी कुखू। जोडा जलमाला जावा
राजामंदी राज । भोळं राज भर्ताराचं
हळदी-कुखाचं। उघडं पाल आत्ताराचं
। भरल्या बजारांत
भर्ताराचं सुख। सांगतें देवादारीं
कुखाच्या करंडचाला। खिडक्या नानापरी
गोठपाटल्याचं। मजला व्हतं वज्ञ
कपाळीचं कुंखू। नाजूक लेनं माझं
सोन्याचे गोठ तोडे। नाहीं माझ्या खातरांत
कपाळीचं कुंखू। नित्ते पाहतें आरशांत
कुखाच्या परीस। आम्हा मेनाचं वजन
मोठे मोठे लोक। मह्या चुडयाचे सजन
काय सांगू बाई। मह्या चुडयाची नवती
भांगोभांग मोती। मह्या कुखाच्या भवतीं
मासोळया जोडव्यानं। पाय दिसतो सोयीचा
हळदीवरी कुखू। जुवा बसला दोहीचा
माझ्या कपाळीच कुखू। चांदाची हाय कोर
होता पारखी घोडयावर। बाप्पाजी राया माझा.

# काळी चंद्रकळा

काळी चंद्रकळा । नेसून उभी राहे
। कंथाची वाट पाहे
काळी ग चंद्रकळा । पदराला राघू–मैना
। चाटचासंग भाऊपना
काळी चंद्रकळा । धुऊन नेसावी
माय हरन ग माझी । जडभारीला असावी
काळी चंद्रकळा । नेसती चाळघोळ
। आडव माघती तान्ह बाळ
काळी चंद्रकळा । नेसन्यांत खुवी
कंथासेवेसी उभी । सावळी भावजय
काळी चंद्रकळा । पदरीं रामनाम
नेस तुला माझी आन । मायबाई माझे
काळी चंद्रकळा । पदरीं हीन दावी
मन माझं समजावी । भाईराजस माझा
काळी चंद्रकळा । कागदांत घडी
बाई सोयरी माझी । घेनाराची द्रिष्ट काढी
काळी चंद्रकळा । नेसता लागे मऊ
माझा भाईराज । भूषणाजोगा भाऊ
काळी चंद्रकळा । नेसावी घडीची
भाई सोयऱ्या माझ्या । तुझ्या पहेल्या जोडीची
काळी चंद्रकळा । मला वाटती नेसावी
माझ्या जल्माला असावी । माय हरन माझी
काळी चंद्रकळा । पदरीं पाहूं द्या
। माझा घेनार येऊ द्या
काळी चंद्रकळा । पदरीं झाली गोळा
सुर्ती देले साडेसोळा । भाईराजसानं माझ्या

काळी चंद्रकळा । चाटी मनीतो होन
घेईल माझा शक्तिवान । भाईराजस माझा
काळी चंद्रकळा । जसं काजळाचं बोट
घेणाराचं मन मोठं । भाईराजसाचं माझ्या
काळी चंद्रकळा । घोळ लोळे जमीनीला
राज्य शोभे कामेनीला । सावळ्या बाईईला
काळी चंद्रकळा । नेसू वाटली जिवाला
आले रंगारी गावाला । देते बंधूला हवाला
काळी चंद्रकळा । जन मनीती चोखट
भाईराजस माझे । चाटी लुटीले फुकट

---

## शेजीची संपत

शेजी लेनं लेती । तिचं तिला भुषेन
कपाळीचं कुंकू । लालभडक निशान
शेजी लेनं लेती । सरी ठुशीं ग ताईत
माझं कपाळींचं कुंकू । सर्व लेन्याचा नाईक
शेजी लेनं लेती । तिला लेन्याचं भुषान
हळदीवरी कुंकू । माझं जरतारी निशान
शेजी लेनं लेती । झांकून चंद्रहार
हे ग कपाळीचं कुंकू । उघडा माझा शिनगार
शेजी लेनं लेती । चालली तोऱ्यानं
नेनंतीं माझी बाई । उभी कुंकाच्या भारानं
शेजी लेनं लेतीं । असं चोरून मारून
कपाळीचं कुंकू । माझं दिसतं दुरून
शेजीची संपत । नाहीं माझ्या खातरांत
कपाळीचं कुंकू । नित्ते पाहतें आरशांत

× × ×

शेजी ले ' लेती । काय पाहाती लेन्याला
। झांक कडेच्या तान्ह्याला
शेजी लेनं लेती । काय पाहाती वस्ताला
। सखा खेळतो रस्त्याला
शेजीची संपत । सांदीचे सुगडे
भाईराजस माझे । हांडे मालाचे उघडे
शेजी घाली वस्ता । काय करावं वस्ताला
भीम अर्जुनाची जोडी । बसली रस्त्याला

× × ×

शेजी तुझा माल । लोळतो सांदीं कोंदीं
लाडके माझे बाळ । हिरे माझे सभेमधीं
शेजीबाईनं संपत । सांठविली घरांत
माझे बाळ हे राजस । हांडे मालाचे दारांत
शेजी करे लेनंवानं । मजला पाहून
सखे माझे देखिल्यानं । मजला समाधान
शेजी ग लेनं लेती । माझ्या वसरीचा केर
। मोती माझे डऊलदार
शेजीचा संसार । माझ्या वसरीचा केर
खांब रत्नाचे समोर । नेनंते सखे माझे
शेजी ग लेनं लेती । काय कराव वस्ताला
राघू-मैनाचा खेळ । चला दावितें रस्त्याला
शेजी लेनं लेती । गळा भरूनी पानं
मन माझं समाधान । बाळाला देखिल्यानं
शेजीची संपत्ती । सांदीच्या कोपरीं
माझी ग संपत्ती । सदा खेळती वसरी
शेजी लेनं लेती । झांकुनी मनीमुदी
बाई नेनंती माझी । उघडी माझी तोळबंदी

शेजी लेनं लेती । सना ग वाराला
बाळ नेनंते माझे । जर माझ्या पदराला
काय करायची । शेजी नार शिनगाराची
नेनंती शोभाताई । पेटी माझी घुंगराची
अंबारीचा हत्ती । चालला धजा देत
शेजी तुझी दवलत । नाहीं माझ्या खातरांत

---

## लेंकीचा जन्म

लेकीचा जन्म । जसा गाजराचा वाफा
माय हारने माझे । माया लावून काय नफा
लेकीच्या जल्माला । देव घालून चुकला
पोटीं नाहीं पुत्रफळ । बईल गाड्याला जुंपला
बाई लेकीचा जल्म । कशा घालू देवराया
केले कष्ट गेले वाया । हरि नाहीं उपसाया
काळी ग वावरी । पिकती शिवाराला
लेकीची समसम । हे ग बापाच्या जिवाला
लेकीचा जन्म । नको घालू देवराया
केले कष्ट गेले वाया । मायबाईचे माझ्या
लेकीचा जल्म । कसा घातिला येड्यानं
परायाच्या घरी । बईल राबतो भाड्यानं
मायबापानं लेक देली । वाटवरल्या कसाबाला
। काय करावं नशिबाला
गाईवरे गोन्या । लादिल्या ग लमान्यानं
सवतीवरी लेक । कोन देली बेमान्यानं
लेकीचा जल्म । रानांतली पातर
। जिवा लागली कातर

लेकीचा जल्म । घालूनं घातिला
परघराला जातीला । नेनंत्या प्रानसया
नदीच्या पलीकडं । लेक देऊन झाली येडी
। सांगडीला हात जोडी
लेकीची ग जात । भितीवरला ग चुना
गांवा गेली करमना । बाई नेनंती माझी

---

## सासूचा सासरवास

सासूचा सासरवास । कोनापशी सांगूं देवा
मनधरनीचा यावा । भाचा नेनंता माझा
सासूचा सासरवास । सोसावा नखीं बोटीं
आशीलाच्या नांवासाठीं नेनंते बाई माझे
सासूचा सासरवास । सोसावा हारनी
येक्या भ्रताराकारनी । नेनंते प्रानसई
सासूचा सासरवास । सोसावा सखेबाई
आपल्या कुळीं नाहीं । फिरून जाब देनं
सासूचा सासरवास । नंद तुम्ही हळू बोला
नेनंत्या बाईईचा । कंथ बाहेरूनी आला
सासूचा सासरवास । नंदच्या लावन्या
। कंथ करी संपादन्या
सासूचा सासरवास । नंदची धाकधुक
। रामचंद्राचं आहे सुख
सासूचा सासरवास । नका करू सासूबाई
। अन्यावाजोगी नाही
सासूचा सासरवास । नका करू सासूबाई
। चांफ्यासाठी आली जाई

सासूचा सासरवास । नको करू ग सास
। केले लेकाचे नवस
यवढा सासरवास । नका करू सासूबाई
आपल्या मोगऱ्याच्या पायीं । आली परायाची जाई
यवढा सासरवास । नको करू माय माता
आपला राम व्हता । आली परायाची सिता
सासचा सासरवास । सितासारख्या बयाला
वाटून देला बाई । घरोघरींच्या सयाला
सासूचा सासरवास । कडू इखाचा पेला
अंम्रुत मानून गोड केला । भरताराच्या जिवासटी
सूनला सासरवास । सासूबाईन ग केला
लेक देली परायाला । आनभाव तिला आला.

---

## इंद्रसभेची कामीन

मामे पुसती हे ग । भाचीचं चांगुलपन
इंद्रसभेची कामीन । बाळ सगुना माझी
चांगुलपनाला । कशाला यनी फनी
गोरी ग माझी मैना । रूप तुझं गेंदावनी
तांबड लुगडं । भडक्या मारीत काठाला
। उभी वानीन पेठला.
माडी ग वरी माडी । माडीखालीं चंदनशिडी
। हे ग पुतळी केस झाडी
दात मोतियाचे दाने । व्हट पवळ्याच्या येली
। हासता द्रिष्ट झाली
कुरळ्या केसाची । कपाळावरी वाकी
दैवाची तु ग लेकी । बाई सावळे माझे

कुरळया केसाची । हिच्या भांगापुढें वाकी
प्रानाचे सये । माझे दईवाचे लेकी
लाडक्या लेकीची । यनी येती गोफावनी
आवडती लेंकावनी । वाई नेनंती माझी
यवल्याचा पितांबर । भरला तोळाभर
नाजुक मैनाची कंवर । मिऱ्या पडल्या शंभर
चांगुलपनाला । कशाला आरसा
वतीव तुझा ठसा । प्रानाचे सये माझे
असं चांगुलपन । मंगलाबाई लेकीचं
आंगनीं झाड केकतीचं । हेलावे देत सये
लाल पिंजरीचं कुखू । जसं सूरयाचं तेज
झळकून गेलं बाई । याच्याखालीं रूप तुझं
चांगुलपनाचा । नका करू गाजावाजा
इच्या रूपाचा अगाजा । प्राणसईच्या माझ्या
तुझ्या चांगुलपनाची । माझ्या जिवाला काळजी
। नको बसू तू ढाळजी
मैनाला झाली द्रिष्ट । हातच्या बिल्वरा
कवळी तुझी जानी । आंब्याचा फुल्वरा.

---

## सासऱ्या जातांना

सिपिनी चोळी सिव । आखुड बाह्याची
वाई नेनंती माझी । मैना सासऱ्या जायाची
सासऱ्या जात्यावेळीं । नाहीं नाहीं ग मनीती
भाऊ बोळावू मागतो । नेनंती बाई माझी
सासऱ्या जातेवेळी । माग परतोनी पाहे
उभे तुझे बाप-माये । नंद मालनी माझे

सासऱ्या जातांना । नेत्रांना आली गंगा
बोली महिन्याची सांगा । शोभा या ताईईला
सासऱ्या जातांना । माय धरीती पोटाशीं
शोभाताई माझे । कधी हरणे भेटशी
सासऱ्या जातांना । सयाला पुसना
हरन गळ्याची सुटना । नेनंती बाई माझी
सासऱ्या जातेवेळीं । घोडं लागलं चरनीं
बाई माझ्या नेनंतीच्या । उभ्या मैनाच्या गडनी
सासऱ्या चालली । मैना लाडाचा ग फोड
नेनंत्या मैनाचे । वडील चुलते माग पुढ
सासऱ्या चालली । सखेबाई ग लाडाची
वऱ्हे सावली ताडाची । तिच्या ग बंदवाची
सासऱ्या जातेवेळे । डोळ्याला येतं पानी
सासऱ्या गेली ताऱ्ही । नेनंती बाई माझी
सासऱ्याला गेली । हासत खेळत
बाई माझ्या मयनाला । नाहीं अझून कळत
सासऱ्या गेली । माझी मयना गुनाची
मजला सय व्हती । तिच्या अनाडपनाची
माझ्या ग दारामध्यें । सांडलं कुंकू पाणी
नेणंती मैना माझी । सासऱ्या गेली ताऱ्ही.

---

## प्रीतीचं पंचखाजं

महादेवाच्या पिंडीवरी । तांदुळ वाहिला सगळा
। जोडा पिर्थिमी आगळा
टिका ठुशीखाले । सरीबाई जामीना
नेनंतीबाई माझी । हौशा कंथाची कामिना

सरजाची नथ । सरजे सोडून बारामती
नेनंते बाई माझे । हौसेदार तुझा पति
अस्तुरीचा हात । पुरुपाच्या हातांत
वचन दिलं बाई । हिरव्या मांडवांत
भर्तारांचं राज । जसे पान्याचे हाऊद
लाडके माझे बाई । कर मनाची मऊज
गोठ-पाटल्याचा हात । कंथाच्या उशाखालीं
नेनंत्या बाईला । प्रीतीची झोप आली
उंच वसरीला । कोन निजला सावळा
माझ्या नेनंत्या बाईचा । हात उशाला पिवळा
सावळ्या जावायाची । अंधारांत खोली
नेनंती बाई माझी । वीज चमकत गेली
चिक्कन सुपारी । अडकित्त्यानं फुटना
सावळ्या जावायाला । भीड रानीची तुटना
चिक्कन सुपारी । रुपायाची पसाभर
सावळ्या जावायाला । रानीचा छंद फार
सासू ग सासरीं । कोन्या भाग्याच्या संगतीला
। ही त जाईन माहेराला
सासू ग सासरीं । खालीं ग बसाया
ही ग लागते पाया । रामचंद्र आले न्याया
भर्ताराची खून । नेतरापसून
गोरे पिरतीवाचून । हसू येईन बाई
शेजबाजवरी । भर्तार देवरूप
नेनंती बाई माझी । इसरली मायबाप
अतिप्रीति, वहु प्रीति । प्रीतीचं पंचखाजं
सांगतें मैनाला । भ्रताराला वेड तुझं

---

# लेंकुरवाळी

लेकुरवाळीच्या । कामाचा घोंटाळा
नेनंत्या मैनाला । नाग घालितो येटाळा
लेकुरवाळीच्या । कामाची गाळन
रवीदोराला खेळन । जाऊ या मालिनीच्या
लेकुरवाळीचं । काम सरन इळाचं
तिला निमित्ते बाळाचं
लेकुरवाळीचं । काम सरन इळं
कपाळींचं ग कुंकू शिळ
लेकुरवाळीचं । काम ग मोलं द्यावं
नेनंत्या मैनाचं । बाळ खेळायला न्यावं
लेकुरवाळी झाली । जाईना पोरह्ट
बाई वहेना माझी । हसून मैना सांगे गोष्ट
लेकुरवाळी झाली । जाईना पोरपन
मैनाचं माझ्या । काळे दांत गोरं पन
लेकुरवाळी झाली । धांवत पान्या गेली
पापी ग मनुष्यानं । माग तिची निंदा केली
लेकुरवाळीची निंदा । करू ने भलीयानं
आडवं बाळ तान्हं । गेला पदर वारीयानं
लेकुरवाळीचे । अंचळ हायेती रांजन
मन काय पानी पेले बाई । त्यथ देव नारायेन
लेकुरवाळी झाली । जाईनं पोरपन
माता करी लिंबलोन
कोन दृष्ट केली । आंब्याच्या डहाळीला
माझ्या लेकुरवाळीला

## बहिणीचें कौतुक

सोनसळे गहू । त्यांत नाहीं खडा माती
वहेना बाईईला । जोडा पाहून देलं हातीं
साकरचे लाडू । गाडींत झाले भुगा
वहेनाबाई माझी । दूर देशीं चंद्रभागा
परावा परदेस । कंठीला एकटीनं
बाई वहीनानं । भ्रताराच्या संगतीनं
मेव्हना सावळा । आगाशींचा दिवा
गौळन्या बाईईचा । हरताळीचा रंग नवा
निशिगंधाची कळी । उगवता पिवळी
कांत गोरा तू सावळी । वहेनाबाई माझे
सावळचा मेव्हन्याचा । पलंग अवघड
वहेनाबाई माझे । कर धरूनी वऱ्हे चढ
हे ग सोन्याची सांखळी । पलंगाखालीं लोंबली
नार कंथाहून चांगली । बाई मही गवळन
मेव्हन्या सावळचाचं । पहाटचं तोंड धूनं
राधा बोल माडींतून । हांडचामंदीं पानी उन
सावळचा मेव्हन्याच्या । नहानीवरी जाई
सुखवासी मही बाई । सावलीनं धुनं धुई
सावळचा मेव्हन्याची । शिवऊनी सेना चाल
मेन्यांतून मैना बोल । मुकामाचं गांव आलं
सावळचा मेव्हन्याला । पानं खायाला वलवा
वहेनाबाईईचा । मेना राधाचा कलवा
रस्त्यावरी वाडा । बारीक बांधनीचा
मधीं उजेड चांदनीचा । वहेनाबाईईचा
सावळचा मेव्हन्याचं । पिवळं गोरेपन
वहेनाबाईईचं । कस्तुरीचं मेळवन

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ९१०८

गोऱ्या मालनीचा । हासत मुखवटा
वहिनाबाईला माझ्या । लक्षुमीचा पुरवठा
बाई उजेड पडला । नाकांतल्या मोरनीचा
भांग टिळा गवळनीचा । मह्या लाडक्या वहेनीचा

---

## उंबरगांवची अमरांगना

इथूनी दिसती । उंबरगांवची येस
परानाची सखीबाई । पान्या निघाली राजस
उंबरगांवींची ग येस । येस हाये कंगुऱ्याची
परानाचो सखीबाई । त्येक देली चौधऱ्याची
उंबरगांवच्या शिवदरी । बंधु माझा घोड फिरवी
परानसखी माडीवरी । नारायनाला हात जोडी
इथुनी दिसतो । उंबरगांवीचा कळस
परानाचे सखेबाई । उभी माडीला तुळस
आल्या गेल्याले पुसते । उंबरगांवींचा राजा सुखी
नेनंती गवळन । त्यथं माझी बहीन सखी
उंबरगांवच्या वाटनं । सारं दिसं लाल लाल
परानसखी पांघरली । हौशा कंथाची दुशाल
कामून सुकलीस । गवळनी घननीळ
बंधूजी धाडी मूळ । येतेल येका इळ
माझ्या घराला पाव्हनी । आल्याली कशी कळ
माझ्या गवळनी बाईचा । मेन्यामधी खंदील जळ
उंबरगांवींच्या वाटनं । टांगा कोनाचा पळतो
माझ्या परानसखीचा । पदर जरीचा लोळतो
उंबरगांवींच्या वाटनं । जाईजुईचे वावर
माझ्या परानसखीचा । इचा जरीचा पदर

उंबरगांवींच्या वाटनं । उधळती रेवाई
परानाची सखी । मेन्यामंदी साळूबाई
नेनंत्या मुराळयानं । दाटून केली रात
उंबरगांवींच्या पानंदींत । ह्यान लाविली चंद्रजोत
नेनंता मुराळी । केवळ बाई कनडीचा
माझा परानाचा सखा । समला सोडी चुनडीचा
नेनंता मुराळी । वाटनं रुसला
परानाचा सखा । बग्गी सोडून बसला
इसवंदाचे घोस । उंबरगांवींच्या पानंदीं
अशे द्रिष्टावले । तुझ्या गाडीयेचे नंदी
उंबरगांईच्या वाटनं । पिकले चने बोर
खाली उतर सखेबाई । तुहे मुराळी छंदखोर
गवळन सासऱ्या चालली । चालली माझी तान्ही
परानाचा सखा । झारी वागवितो पानी
आवुक्ष मागते । उंबरगांवच्या दोही जना
तिथं बहीन मेव्हना । सुखी राख नारायेना

---

## भूषणाचा भाऊ

शेजी ग शेजाराला । मायबहीन कैवाराला
। सखा माझा भूषनाला
पाडाचा बाई आंबा । आगाशीं पिकला
रावन माईला येकला । भाई सोयरा माझा
उन्हाळ्याचं उन्ह । लागलं चईताचं
माज्या काशीचं बाळ । सोनं माज्या ताईताचं
आईबापाच्या पोटीं । हे ग जल्मला मोती
भाई माझ्या राजसाची । बोलन्याची रसवन्ती

मोठे ग मोठे डोळे । भुवया रत्नरेघा
भाई राजस माझा । वर कोन्या नारीजोगा

× × ×

शंभराची घोडी । पन्नासाचा जीन
भाईराजसाची । बसनाराची कवळी सीन
चिरवंदी वाडा । फरसी दगडाची
भाई ग राजसाचो । मबर सिंगी सोयऱ्याची
बारा ग बयल । सोन्याच्या कुटारींत
भाई ग राजस । वलांड्याच्या गेला सेत
बारा ग बयल । तेरावी मईस
भाई ग राजसाच । घर वाड्याला पईस
सोन्याची मोहोरकी । माझ्या बंदूच्या मसीला
पांड्या बसला येसीला । दूध माग दसमीला
पोळियाच्या दिशीं । गाई झाल्या वरमाया
नंदी गेले मिरवाया । भाईराजसाचे माझ्या
पोळियाच्या दिशीं । येशीला ग तोरन
नंदी चालले भारानं । भाईराजसाचे माझ्या
गाईला झाला गोऱ्हा । तोंडावरी मोरा
सजने ग बाई । सजन दईवाचा खरा

× × ×

पावसाच्या पोटीं । आनंदाच्या गोष्टी
बोलले बंदुराज । चला भईनीच्या भेटी
बहिनीच्या गांवा । भाऊ चालले नटत
असे जरीचे पटके । बांधू लागले वाटंत
माहेराच्या वाट । मुरमाचे खडे दाट
बंदु माझ्या राजसाच्या । तेजिनीला परिपाट
महीना महीना । भाईराजसाचं घोडं
सख्या राजसाला माझ्या । बहिनीचं फार येड

आंब्याचे आंबे तोडी । ऊसाचे वाढे मोडी
भाई ग राजस । बहिनी वानवळे धाडी
ऐरावताचा हत्ती । माझ्या वाड्याला भिडला
। सखा नांवाला चढला
भाईराजाला भेटतें । पुरना माझा हात
उफाड्याचा सका । अंजनीचा परवत
बहिनीच्या आशीर्वाद । भाऊ नांदतो बळी
गंगना गेल्या केळी । हात पुरना कंवळी
पिकला उंबर । देटाला हिरवा
आपल्या बंदवाची सर । कोन करील परावा
नखीच्या धोतराची । टाचनस्तोर लांबन
मह्या अंजना बंधूला । वानी मनू की बामन
नवं ग नेसतें । जुनं देतें धरमाला
भाईराजसाला ग माझ्या । आसा मोक्ष घेनाराला
नवं ग नेसतें । जुनं ठेवितें आडभिंती
भाईराजसाचं । भोळं राज्य लुटूं किती
घरचा पितांबर । भावाचं खेंडपांड
। मला साडीवनी दंड

---

## भावजय मालन

भाईराजापरीस । मालन चांगली
राया देसायाला । घडी रंगाची लागली
बहीन-भावंड । काही लागन भेद
सीता मालन माझी । रानी मव्हळाचा मध
मालन कुकू लावी । बारीक गव्हावनी
भाईराजसा माझ्या । रूप तुझं देवावनी

सावळी भावजय । शुक्राची चांदनी
        चंद्र डुलतो आंगनीं । भाईराजस माझा
माझ्या बांधवापरीस । माझी मालन देखनी
        आशी वसरीला उभी । जशी दऊत-लेखनी
आशी झाली द्रिष्ट । तुला घराच्या घरांत
        हे ग भाऊचं माझ्या । ह्याच बसनं दारांत
गोरे मालनी ग माझे । बंगईची वज राख
        भाईराजसाचे माझ्या । नाजुकाचे पाय झांक
कपाळींच कुंकू । घामानं वल्ल झाल
        भावजय सावळे । तुझ्या पायीं दैव आलं
नको घोर करू । तू ग मालनी-सिता
        हे ग माझा भाईराज । रात्रीं माझ्या घरीं व्हता
सिताबाई माझे । तुझ्या केसाचा येतो वास
        भाईराजसाच्या । केवडा मुंडाशांत
भाईराज मनील्यानं । तोंड पडल खमंग
        गोऱ्या माझ्या मालनीनं । विडया घातली लवंग
आपल्या सोन्यासटी । चिधीबाई तुझी चाड
        गोरी मालन माझी । जिवाप्रानाच्या पल्याड
सोनियापरीस । मला सवागीची चाड
        सखियापरींस । मालन जिवाच्या पल्याड
माझ्या घरीं दूध । शेजीनं देलं ताक
        सखियापरीस । मला मालन अधिक
माझ्या बांधवापरीस । माझी मालन मव्हनी
        शालूच्या पदरी । चोळया धाडिती शिवूनी

---

22848
9/01
9.3/6
दि: 30/12/56

## भाळल्या गोपींगना

काळा ग सावळा । जसा सजगुऱ्याचा दाना
सावळ्या सुरपाला । भाळल्या गोपींगना
रस्त्यानं चालला । केकत केवडा
। गंध डाळिंबीयेवढा
रस्त्यानं चालला । सखा माझा आयना दिस
। माडीवरची रंभा पुस
वाटनं चालला । वंधु मव्हा सारंगधर
ह्याला पुसी रंभा नार । बंगला किती दूर
नवतीची नारी । तू नको वसू दारी
ह्यो सिनला येरझारी
नवतीची नार । उभी राहीली वाटला
आंबा मव्हरांनीं दाटला
नवतीचे नारी । तुझी नवती आवर
तुझ्या बोलन्याचा । पडला सख्याला बावर
नवतीचे नारी । नवती धर आकळुनी
आंब्याला आला भार । फांद्या गेल्या झाकळुनी
मव्हनी मव्हनी । मव्हनी घातली इडयांत
सख्या सोयऱ्याचा । पाय ठरना जोडयांत

---

## गांवा आल्या कळवांतिणी

गांवा आल्या कळवातिनी । जागा पुसती राह्याला
माझ्या बांधवाचो । रानी बसली नाह्चाला
गांवा आल्या कळवातिनी । जागा पुसती पेठंत
माझ्या बंदवाची । रानी जलाल वाडयांत

गांवा आल्या कळवातिनी । उतरल्या बागांत
रानी तुझी रागांत । भाईराजसा माझ्या
गांवा आल्या कळवातिनी । उतरल्या परकोटीं
रानी तुझी जलाल मोठीं । भाईराजसा माझ्या
गांवा आल्या कळवातिनी । उतरल्या बागाठायीं
वंद्धु महचा अंजनाला । रंगेल्याला ठाव नाहीं
गांवा आल्या कळवातिनी । उतरल्या कोसामानी
चालविलं शिदापानी । वंधु महचा अंजनानं
गांवा आल्या कळवातिनी । उतरल्या कोसापाशी
मायबापाचा सासरवाशी । मजा अंजना वंदु

× × ×

आयेका सासूबाई । आपल्या ल्योकाचे गुन
यांनीं शिडिया लावून । वाडचा आनली कळवातीन
रानीचं चांगुलपन । जसं नागेलीचं पान
सख्या गळियाचो आन । नको ठेवू कळवातीन

---

## लावणीचा आंबा

लावनीच्या आंब्याला । पानी घालीते कुडता
नेनंता भाईराज । उद्यां व्हईल वाढता
लावनीचा आंबा । पानी घालू दोघी तिघी
। आंब्या वाढ बिगी बिगी
लावनीचा आंबा । चोपनाची माती
महचा राघोबाला । वहचनी खालीं वर फाती

× × ×

लावनीचा आंबा । पानी घालीतें वंजळ
बाई नेनंती माझी । आंब्या चडीची जांबळ

लावनीच्या आंब्याला । पानी घालीतें पळीनं
केला दाटवा केळीनं । बाई माझ्या सावळींनं
लावनीच्या आंब्याला । पानी घालीते दोहेरी
गोरी ग माझी मैना । आंब्याशेजारी कबरी
लावनीचा आंबा । पानी घालीतें सोयीनं
बाई माझ्या नेनंतीनं । केली दाटनं जाईनं
लावनीचा आंबा । त्याला पानी झुळझुळा
अशी वाढी गेली । आंब्या शेजारी वकुळ

× × ×

लावनीचा आंबा । पानी घालीते वाटी वाटी
सावलीची आशा मोठी । भाईराजस माझा
लावनीचा आंबा । पानी घालून निगा केली
रत्नजोडी हातीं देली । सून माझ्या मालनीच्या
लावनीचा आंबा । पानी घाला परातीनं
राज्य करा शरतीनं । भाईराजस माझे
लावनीच्या आंब्याला । पानी घालून वाढविला
सावलीला कामा आला । भाईराजस माझा
लावनीचा आंबा । याला पारंबी फुटली
भाईराजाला पाहूनो । जीवा संतोपी वाटली

---

## चाटयाच्या दुकानांत

चाटयानं दुकान । लावीलं उमाटीं
पैठनीचे खन हातीं । भाईराजसाचे माझ्या
चाटयानं दुकान । लावीलं देवडीं
उंच खनाळ निवडी । भाईराजस माझा

चाटयाच्या दुकानीं। माझा भाईराज उभा
। अन् खन माझ्या चोळीजोगा
चाटयाच्या दुकानांत। काढी रुमाल घडीचे
। दोन्ही प्रल्हाद जोडीचे
चाटयाच्या दुकानांत। पिवळा पीतांबर
मुंजीजोगा विश्वंभर। भाईराजस माझा
चाटयाच्या दुकानांत। बसले डिगांबर
भाई ग राजसानं। खरेदी केले पितांबर
चाटयाच्या दुकानांत। बसले डिगांबर
सव्याच्या मांडीवर। सव्वाशाचा पितांबर
फाटला पाटव। चिंद्याचा झाला भार
। यडा झाला सावकार
चाटयाच्या दुकानांत। उंच मोलाची फडकी
शकुन माझी बाई। भईन भावाची लाडकी
चाटयाच्या दुकानांत। बसली तुझी आजी
अंगरख्याचा घोळ मोजी। बाळा नेनंत्या माझ्या
चाटयाच्या दुकानांत। लावीली हवाई
ल्योक सून जावाई। मामी बाईईचे
चाटयाच्या दुकानांत। कंदील झोका खात
हिरव्या गादीला सोबा देत। अंजना बंधु माझा
चाटयाच्या दुकानांत। लावीलया ऊदकाडया
। लेकी सुनाला घेतो साडया
चाटयाच्या दुकानांत। उंची मोलाची कुतन
। कुंचीजोगा ग रतन
चाटयाच्या दुकानांत। कोन रुपाया फेकीला
। खन लाडक्या लेकीला
चाटयाच्या दुकानांत। भिंगाचे परकोल
बाई नेनंती माझी। मैना मोठी छंदखोर

चाटयाच्या दुकानांत । वसले दोघं तिघं
हावशा बंधु निवडितो । पातळ वहिनीजोग
चाटयाच्या दुकानांत । बंधु बसला पठान
। झाली चाटयाला दाटन
चाटयाच्या दुकानांत । भईन-भावाची गंमत
। सांगा शालूची किमत

---

## सांगून धाडीतें

सांगून धाडीतें । आल्या-गेल्याला गाठून
झाले फार दि भेटून । भाई राजसा माझ्या
सांगून धाडीतें । आल्या गेल्या को रे बहू
। आंगनीं माझे भाऊ
सांगून धाडीतें । लखोटचापोटीं चिठ्ठी
। कांतेसहित यावं भेटी
सांगून धाडीतें । कागदामधीं टप्पा
निष्ठुर झाला परानसखा । भाऊ सोयरा माझा
सांगून धाडीतें । कागदीं काळचा रेघा
भाई राजसा माझ्या । भेटी यावं जिवलगा
सांगून धाडीतें । माहेरच्या मंगळिका
जेवल्याबिगर सांगू नका । यडा व्हईल माझा सखा
सांगून धाडीतें । गंगथडीच्या भोयाला
। शेंगा जेवनीं व्हयाला

× × ×

सांगून धाडीतें । इव्हाया चंद्रभाना
गाडीवर नगारखाना । कळवातनीचा ताफा आना

सांगून धाडीतें । बाईच्या सासूला
आपल्या सोन्यासटी । सांभाळ मोत्याच्या राशीला
सांगून पाठवितें । विहिनीबाई तुला काशी
। मैना माझी गोडघाशी
सांगून धाडीतें । आल्या गेल्याच्या हातीं
उभी वसरीला व्हती । बाई नेनंती माझी
सांगून पाठवितें । पुन्याच्या मोमिनाला
बाई माझ्या नेनंतीला । हिरवा शालू कामिनीला
सांगून धाडीतें । चिंचच्या पानावरी
। उब कुकू मेनावरी
सांगून धाडीतें । माय मजे वंजारनी
अशा कटकीच्या चोळ्या । लेल्या माज्या शेजारनी
तुला सांगून धाडीतें । माजं सांगन्याचं लाड
बागंत फुलझाड । तसली चोळी धाड
सांगून पाठवितें । मायबाईच्या गांवा
भेटीसाठी धाड रावा । माय हारना माझे
सांगून धाडोतें । काकाजी बेलाला
सावळी हारना । जाई गुंतली वेलाला

---

## पाहुणा

घरा पाव्हना आला । पाट तिव्हईचा
क्रिष्ण माझ्या देवईचा । माय माझ्या हारनीचा
माझ्या घराला पाव्हना । शेजी मनीती कोन ? कोन ?
बंधूला व्हईल द्रिष्ट । मग सांगल निचितीनं
माझ्या घराला पाव्हना । शेजी मनी कोन राजा ?
। राजा नव्ह बंधु माजा

माझ्या घराला पाव्हना । शेजीं म्हनते राजावानीं
। तोंडवळा माझ्यावानी

× × ×

माझ्या घराला पाव्हना । शेजीला पल्ड कोड
\ । माज्या सक्याचं जेवन थोड
माझ्या घराला पाव्हना । नाही गुळाची आगत
। दारू वकर लागत
बंधु पाव्हना आला । आंब्याच्या दिसांत
। साकर सोडीतें रसांत
पाव्हन्याला पाव्हनचार । आताच्च जुनं पानं
सखा सांग वहिमान । शिरा केला भइनीनं
पाव्हन्याला पाव्हनचार । दाळ नाहीं म्या सडिली
ढेप गुळाची फोडिली । अन् धार तुपाची वाढिलीं
पाव्हन्याला पाव्हनचार । खडीसाखर पुरनांत
। तूप केळीच्या दुनींत
पुरनाची पोळी । तूप लावून करते मऊ
। शेतकरी माझे भाऊ
माझ्या घराला पाव्हना । साखराच्या करते लाह्या
निरस दूध हात धुया । बंधु माझ्या सोयऱ्याला
माझ्या घराला पाव्हना । तुपानं चूळ भरी
लवंगानं दात कोरी । बंदू सोयरा माझा

---

## चाल चाल शिंगेबाई

चाल चाल शिंगेबाई । तुझी चाल मला पाहन
निस्ये दवऱ्याला जानं । भाईराजसाला माझ्या

चाल चाल शिंगेबाई । कंदीलाच्या उजेडानं
साहेबाच्या डेऱ्या जानं । भाईराजसाला माझ्या
चाल चाल शिंगेबाई । तुझ्या चालनीची तार
माझ्या कुळकर्णी बांधवाची । बाट पाहत्याती तहसीलदार
चाल चाल शिंगेबाई । नको भिऊ लवनाला
माझ्या देखन्या बांधवाला । रात्र व्हईल दिवानाला
चाल चाल शिंगेबाई । झिजले ग तुझे खूर
राया माझ्या देसायाचं । तालुक्याचं गांव दूर
चाल चाल शिंगेबाई । येवढ्या बारीला
बाळराजानं ग माझ्या । वैरी आनीले जारीला

× × ×

चाल चाल शिंगेबाई । तुझी चाल मला पाहून
ढवळी घोडी पिवळा जीन । वऱ्हे शिपाई सजन
चाल चाल शिंगेबाई । चाल तुझी पाखराची
। वरी स्वारी लेंकराची
चाल चाल शिंगेबाई । नको वाकडी करू मान
। वर केवड्याचं पान
चाल चाल शिंगेबाई । तापले तुझे खूर
। ववंड्याचं शेत दूर
चाल चाल शिंगेबाई । मोती तुझ्या चाबुकाला
भाईराजसाला माझ्या । उन्ह झालं नाजुकाला
चाल चाल शिंगेबाई । तंग-तोबऱ्याला मोती
। वऱ्हल्या हिऱ्याचं मोल किती

× × ×

दुरून दिसतेत । शिंगी मालिनीचे कान
वरी केवड्याचं पान । भाईराजस माझा
हे ग बहिनीचा भाऊ । चालला घाई घाई
शिंगीबाईचं पाऊल । कोठं पडल कोठं नाहीं

चाल चाल शिगीवाई । कर रातरचा इळ
आला शिमगा जवळ । फार जल्दी आलय मूळ
चाल चाल शिर्ग वाई । हासत हिसत
भरल माहेर दिसत । भाऊ या भाशियान

---

## गु-हाळ

लावीयला ऊंस । वाडीं गेलीं गंगनाला
वाटत भेवो माझ्या । पानी भरनाऱ्याला
दोही मोटचं पानी । चाललं सुसत
बंदु माज्या राजसानं । दारं धरिलं ऊंसांत
चला जाऊ पाह्या । याच्या गुऱ्हाळघराला
मखमलीचे पडदे । सोडलेत मांडवाला
धर्मामंदी धर्म । ऊसाचा धर्म भारी
माझ्या बंदवानं थळ । लावलं वाटवरी
लग्नाची हवा । तुझ्या गुऱ्हाळीं आली
चरकाच्या बैलावरी । चांदनी कऱ्हा देली
भाईराजसाच्या घरीं । चरक दनानला नवा
लगनापरता । गुऱ्हाळाची हवा
पहाटच्या पहाऱ्यामंदीं । हाका मारितो कुंवाराला
राजस बाळ मनी । नांदी आना गुराळाला
बाई लगनापरीस । गुराळाची हवा
नांदीवर दिवा । दिसती न चारी शिवा
बाई उजेड पडला । आरध्या शिवारांत
कंदील जळतो । गुऱ्हाळघरांत
उगवला नारायेन । रसाच्या नांदीवरी
। गुळव्या माझा गादीवरी

मळ्यामधें ऊंस । पानीयाच्या मिस
श्रीमंत भाईराज । बैलाला पाजी रस
पिकला पिकला । सक्याचा पुंड्या ऊंस
चरकाच्या बैलाला । पानी मुन पाजी रस
शेजी ग नटती । पान्याच्या ताकाला
सक्याच्या गुऱ्हाळांत । आली कल्हई पाकाला
हाकावरी हाका । गुराळाच्या लोका
। तुमची कल्हई आली पाका
कल्हई आली पाका । लोनी टाकूनी थिर करा
भाई राजसाला माझ्या । गुळव्याला हाका मारा
साळकरी, मोळकरी । तिसरा पेरकरी
भाई राजसाच्या घरीं । गुळव्या गादीवरी
कल्हई आली पाका । इंद्रसभे गेला वास
असा भाग्याचा पुरुष । वर्साभरा लावी ऊंस
पिकलं पिकलं । माझ्या सक्याचं थळ
चरकाच्या वैलाला । पेंड मनून चारी गुळ
वान्याला वानी पुस । साकर जन्मती कोन्या थळा
गंगामोटी याचा मळा । भाई राजसाचा माझ्या
गुळाचा वाई भाव । वानी पुसतो थळामंदीं
गुळव्या गुऱ्हाळघरामंदीं । भाई राजस माझा.

## माळ्याच्या मळ्यांत

माळ्याच्या मळ्यामंदीं । माळिन्या दोघी जावा
। फुल तोडितो माझा रावा.
माळ्याच्या मळ्यामधें । अनवाळ राघू गेला
। जाई तोडून चेंडू केला

माळयाच्या मळयामंदी । चाक वाज नानापरी
। मनमव्हन वाटवरी
माळयाच्या मळयामंदी । लिंबाऱ्यावऱ्हे जाई
। नवसाची प्रानसई
माळयाच्या मळयामधीं डाळिंबी पिकअली
। बहीन भावाला यकअली
माळयाच । मळयामंदी । पेरीली खसखस
। मह्या बंदूला यकादस
माळीयाच्या मळयामंदी । साळीमंदी बाई सावा
। तिचीमंदी योक रावा
माळयाच्या मळयामंदी । गेंद कशान सुकला
माय मह्या हारनीला । सय झाली ग सखूला
माळयाच्या मळियांत । पेरीलं उगवलं
शिकविलं कामा आलं । माय हारना माझे
माळयाच्या मळीयांत । हे ग पेरीयला गहू
। अबोल्यानं नको राहू
माळयाच्या मळयामंदी । चाक वाज किनी किनी
। केळचा झाल्या बाळांतिनी
माळयाच्या मळयामंदी । नको जाऊ मुसलमाना
केळी ग बाळांतिनी । घात केला दुसमाना
माळयाच्या मळियांत ।मोटला नवा नाडा
पानी जातं फुलझाडा । देवा या विठ्ठलाच्या
माळयाच्या मळयामंदीं । दांडानं वाहे पानी
राम चालले वनाला । सिता चालली मागूनी
माळयाच्या मळयामंदी । फुलाची बागशाई
अग ह्या मार्वती मेढयाला । राजा तुला रानी नाहीं

---

# वसुराज

माजलगांवच्या ठेसनीं । बईल खंदाऱ्या थांब थांब
। आडत्या घाली राम-राम
बैलामंदी बैल । द्ावशा उधळला
। विरा येशीचा हादरला
बैलामंदी बैल । नंद्या बईल किती शहाना
। भर गाडीला देतो माना
बैलामंदी बैल । बईल कठाळ्या आभंड
। दावनीला साखळदंड
बईल कठाळ्या । मांडी घालून बसला
। धनी मनांत हासला
बैलामंदी बैल । येक बईल गुनाचा
सांग चाकरमान्याला । नका धरू रे उन्हाचा
बैलामंदी बैल । हावशा नाजूक
। केला फुलाचा चाबुक
बैलामंदी बैल । कठाळ्या गुनाचा
नको हानू बाळा । नवा आसुड पानाचा
बैला खंदाऱ्याची । चालनी चंचळ
झाली पेरनी पातळ । कनस पडले कंबळ
शिनले वसुराज । शिनल्या यांच्या माना
शेत हायेत दुहारीचे । उभ्या मारगानं हाना
शिनले वसुराज । शिनले यांचे खूर
सांगते बाळा तुला । शेत दुहारीचे दूरं
घाटच्या घुंगराचे । नंदी येशींत दाटले
रावन-हारीचे । औत जोडीचे सुटले
बैला खंदाऱ्याची । चालनी चंवूवानी
। घरीं येतो नंदीवानी

बैला खंदाऱ्याचा । चालतांना खूर वाज
जाळीमंदी वाघ वुज । मोटवाला सोनं माज

---

## साळीचे तांदूळ

साळीचे तांदुळ । मामाच्या वंजळीं
। लगीन लावावं गोदावळी
साळीचे तांदुळ । आधानीं वोलत्यात
। वाट उंबराव चालत्यात
साळीचे तांदुळ । आदन झालं थोडं
। राघु–मैनानं केलं येड
साळीच्या तांदुळा । तुपाची मव्हन
। तेचं नाजूक जेवन
साळीच्या भाताला । तुपाचा सडका
। रावन मातचा लाडका
साळीचे तांदुळ । आधनीं वातड
नेनंत्या हरीची । जेवनाराची तातड
साळीचे तांदुळ । येळीते परातींत
वैजोबाराजा देव । नवरा झाला शिवरातींत
साळीचे तांदुळ । सडीतें मोत्यावनी
माझ्या सख्याला मेजवानी । देवा माझ्या गोइंदाला
साळीच्या तांदळाला । क्रिष्णाबाईचं पानी
खाशाला मेजवानी । देवा या गोइंदाला
साळीचे तांदुळ । गंगाळीं भिजू घाला
सखा पारन्याला आला । देव गोइंद माझा
साळीच्या भातावरी । साखर किती वाढू
लिंबाजी बाळा माझ्या । नको भाताची आळ काढू

साळीचे तांदूळ । ठेवीतें बांधून
आला उन्हाळा साधून । देव गोइंद माझा

---

## गोरीचं गोरेपण

गोरीचं गोरेपन । हळदी राही मन
। लेकी तुला लिंबलोन
गोरीचं गोरेपन । उन्हानं झाल लाल
माझ्या सावलीनं चाल । बाई नेनंते माझे
गोरीचं गोरेपन । काळी रुसली मनाला
सुंदर माझं बाळ । बेगड चमकत उन्हाला
गोरीचं गोरेपन । हळदीला माघ सारी
द्रिष्ट लावून गेल्या नारी । बाई माझ्या नेनंतीला
गोरीचं गोरेपन । येईना माझ्या मना
माझी सावळी कामीना । नेनंती बाई माझी
गोरीचं गोरेपन । काळीचं गेलं मन
। नको लावू दातवन
गोरीचं गोरेपन । काळीला मिळवन
। काल केली बोळवन
गोरीचं गोरेपन । असलं कसलं
। पानी तळयाचं नासलं
गोरीचं गोरेपन । ऊंसाच्या वाफ्यावनी
। मूर्ख बघतो येड्यावनी
गोरीचं गोरेपन । मूर्खा तुला काय व्हावं
। खाले पाहून चालावं

---

# गोरी गेली पान्या

गोरी गेली पान्या । तिची घागर काळी
। फिकिली मोत्याजाळी
गोरी गेली पान्या । गुंडावर ग चरवी
। सखा नजर पुरवी
गोरी गेली पान्या । घागर तिची डोले
। गारुडी विद्या बोले
गोरी गेली पान्या । घागर तिची जड
। नारदा वाट सोड
गोरी गेली पान्या । नदी सोडून नर्मदेला
चतुर गेला आंघोळीला । शेला देला चुंबळीला

× × ×

गोरी गेली पान्या । गुंड ठेवला वगरांत
। राघो बोलला मोगऱ्यांत
गोरी गेली पान्या । गुंड ठेवला नईवर
। राघो बोलला जाईवर
गोरी गेली पान्या । पानी काहून लाल लाल
। सखा फेकला गुलवाल
गोरी गेली पान्या । पानी काहून डहूळ
। सिळ फेकली महूर
गोरी गेली पान्या । गोरीचा गुंड जड
। सख्या बहुरा वाट सोड

## लिंबाच्या लिंबोळ्या

लिंबाच्या लिंबोळ्या। लिंबाला झाल्या जड
मायबापाला लेकी गोड। भावाला बहिनी जड
लिंबाच्या लिंबुळ्या। लिंबाखाली अथरून
भावाला झाल्या लेकी। गेला भइनी इसरून
बाजार भरला। भरूनी वसरला
बंधूला लेकी झाल्या। भाऊ बहिनी ग इसरला
लिंबाच्या लिंबोळ्या। लिंबाखालीं पसरल्या
भावाला लेकी झाल्या। आम्ही बहिनी इसरल्या
भावाची माया। लेकीवर गेली
पोटी अनसया झाली। बंधु माझ्या सोयऱ्याला
बहिनीच्या गांवा जाया। भावा पडलं कोड
घेतो कोसाच वाकड। पोटच्या लेकीसटी
पाडव्याच्या दिशीं। लेक ववाळी बापाला
घोर पडला भावाला। भाऊबीजच्या दिशीं
पाडव्याच्या दिशीं। बाप लेकीला टाके व्हन
भाऊबीजच्या दिशीं। बहिनीला खनखन
आईक भाऊराया। नको मनू बहिनी फार
जशी चिमन्यांची हार। भुर उडून जाईल
सुकी ठेव देवराया। माज्या बाप्पाजीचा येल
माज्या नवतीचा लाल। दुनया दिस गुलजार

---

## जांवई

येडाई बांगडा। पोटीं पुतुर असावा
शहाना चतुर जावाई। याचा समंदू नसावा

जावायाची जात । अन् बाई भोंदून खायाची
बोली सरावन बाळाची । कावड काशीला नेयाची
जावाया सावळयानं । आपला कावा केला
माडीशेजून मेना नेला । नाहीं वाडयांत येऊं देला
जावाई सोयरा । जसा चिचचा आकडा
। सदा बोलतो वाकडा
जावायाची जात । जशी हुरग्याची पेरनी
लेक देऊनिया । याची उगीर बोलनी
जावायाची जात । मोठा बईमान
मैना आपली देऊन । शिवी देतो माईऊन
सोयरा जावाई । त्यो बसला लोकांत
पोटींचा बाइ सरावन । पानी घालीतो मुखांत
त्योक पाजवितो पानी । त्येक उकलिती यनी
अग त्यो सोयरा जावाई। उगा शेजाऱ्यावानी
तरोंटयाचं फूल । सोन्याहून सवाई
किती केल्यानं जावाई । येना लेंकाचा भलाई
जावायाची जात । कडू लिंबाचा पाला
तुझ्यासाठीं गाड केला । लेकी बाई
पाव्हन्याला पाव्हनचार । जावायाला दूधभात
लक्ष केलं दान । शिव्या देतो आंगनांत
जावायाची जात । उडीद मुगाची पेरनी
लक्ष केलं दान । तरी उगीर बोलनी
जावायाची जात । फार निस्टूर सांगती
लक्ष केलं दान । तरी आईहून शिव्या देती
जावाई जावाई । नको करू मायबाई
जिनं देला जन्म । तिचा तिला झाला न्हाई

# नवरा पाहूं आले

राञ न दिवस । जीव होतो ग बावरा
नेनंता बाळराज । कधीं व्हईल नवरा
लगनसराईंत । जीव माझ ग बावरा
कधीं व्हईल नवरा । बाळ नेनंता माझा
नवरा पाहूं आले । काय पाहतां शेत वाडा
। नवरा मोरनीवरला खडा
इव्हाई ग्रहस्ता । काय पाहशी वतन
मुलगा नवरा रतन । बाळराजस माझा
नवरा पाहू आले । काय पाहता वतनाला
जोडावी रत्नटीक । माझ्या या रतनाला
नवरीच्या बापा । काय पाहतूस वतनाला
बाळ माझ्या नेनंत्याला । टिळा लाव रतनाला
नवरीच्या बापा । काय पाहतू गाडी घोडा
। नवरा आहे चुनखडा
नवरा पाहू आले । काय पाहतां वाडाहुडा
नवरा आंगठीवरला खडा । बाळराजस माझा
सोयरा ग्रहस्त । माझ्या वसरीला बसे
बाळराजसाला माझ्या । माम्याचं गोत्र पुसे
नवरा पाहू आले । काय पहातां गोत्र व्रित्ती
नवरा सुरतीचा मोती । बाळराजस माझा
सोयऱ्या सज्जना । काय पाहतां वाडे भिंती
बाळराजस माझा । नवरा सुरतीचा मोती

× × ×

सोयऱ्या सज्जना । काय पाहाशी घरांत
रास मोत्याची दारांत । बाळ नेनंता माझा

पाव्हने पाहू आले । काय पाहता घरदार
नवरा आहे वतनदार । बाळ नेनंता माझा
पाहुने पाहू आले । काय पहतां पुस्तक
देसाईराईयाचं । वतन हत्तीचं मस्तक
सोन्याचं पिंपळपान । हत्तीच्या मस्तकाला
बाळराजाला माझ्या । वतन शोभ दस्तऱ्याला
हरळीची मुळी । भोईनं मोकळी
बाळराजाचं माझ्या । वतन सोन्याची साखळी
इव्हाई ग्रहस्त । चोपचा वाडा चढ
बाळराजाच्या माझ्या । वतनानं केला चड

× × ×

नवरीच्या बापा । काय पाहतू करनीला
घालू तुझ्या हारनीला । सोन्याची मोहनमाळ
इव्हाई ग्रहस्ता । नको भिऊ करनीला
घालू तुझ्या हारनीला'। विंदल्या बिजवरा
इव्हाई ग्रहस्ता । नको भिऊ करनीला
गोठ, तोडे, चंद्रहार । घालू तुझ्या हरनीला
इव्हाई ग्रहस्ता । हुंडा मोजावा रोकड
बाळाच्या नवरीला । घालू पैठनी कापड
नवरीच्या बापा । हुंड्यामधें दे मोहरा
बाळाच्या नवरीला । घालू बिंदी बिजवरा
इव्हाई ग्रहस्त । हुंडा मोजितां चुकला
बाळ राजसाचं माझ्या । रूप पाहून दंग झाला
इव्हाई ग्रहस्ता । हुंडा देशील नको देऊ
देसाई राईयाच्या । रहितीला घाल जेवू

× × ×

सोयऱ्या सज्जना । काय पाहतोस पारख्या
देसाई ग राईयाला । लेकी सुना रे सारख्या

घराची घररीत । पाहून गेला व्याही
रमू बाळ माझा । चित्तीं ठसला जावाई
घराची घररीत । व्याही पाहून गेला
रमू या बाळाला । लेक द्याया राजी झाला.

---

## नेमीनाथ–राजामती

पहिली माझी ववी । अरिहंत देवाजीला
नेमीचं राज्य । राजामती बाईईला
पहिली माझी ववी । जातीयाच्या फेरी
उभे हाती गिरीनारीं । नेमीनाथ महाराज
पहेली माझी वई । गायिली येकल्याला
शिवादेवीच्या लेकाला । नेमीनाथ तीर्थंकराला
पहिली माझी ववी । नेमीनाथाला गायिली
राजामतीबाई । शंसे बनांत राहिली
गिरनारी पहाडावरी । करवंदाच्या जाळचा
चालल्या लेंकुरवाळचा । नेमीच्या दर्शनाला
चला ग जाऊ पाहू । गिरिनार पहाडाला
राज्यमतीच्या महाला । आहेत सोन्याचे कंबळ
गिरनारीं पहाडावरी । सोन्याचं भवलं
नाहीं लगन लागल । राजामतीईचं
हळदीचा डाग । राजामतीला लागला
नेमी गेलेत तपाला । गिरिनारीच्या पहाडाला
गिरनारी या पहाडाला । हे ग सांडले आवळे
तपा गेलेत सावळे । नेमीनाथ महाराज
गिरनारी पहाडाला । केली दगडाची उशी
राजामती न बाईला । झोप लागून गेली कशी

हळदीचा डाग । राजामतीच्या शिरीं
नेमीच्या बराबरी । तपाला गेली
राजमतीबाई । नेमीसंग तपा गेली
इनं हळद धुतली । गिरनारी पहाडाला

---

## गुरु

पहिली माझी ववी । देवाआधीं ब्राह्मनाला
गुरूच्या चेरनाला । माझा नमस्कार
पहेली माझी ववी । सव्वा लक्ष मोहरा टाका
गुरु ग महाराज । सांयरा ववीजोगा
फार दिवस झाले । गुरुरायाच्या भेटीला
हार सुकले खुंटीला । जाई या मोगऱ्याचे
मायबाप जन्म देला । गुरुराय व्हता कोठं
यानं दाखविली । मला स्वरगाची वाट
मायबापापरीस । गुरुराया मोठा
असा दाखविला । स्वर्गाचा दारवंठा
देवा-ब्राह्मनापरीस । गुरुमावली मोठी
मोक्षाला न्यायाला । ज्ञानाच्या सांगे गोष्टी
नित्य आठवितें । गुरु महाराजांचे पाय
रात्र न दिवस । माझ्या न्हृदयांत राह्य
आले आले म्हणती । महाराज पाटांगणीं
शिष्या जावं लोटांगणी । गुरु माझ्या दयाळाला
जाईच्या फुलाचा । करीते उगानिगा
हार झाला तुझ्या जोगा । गुरु दयाळा माझ्या
मजला नाहीं शक्ती । गुरूच्या पूजनाला
वाहिली बेलपत्री । महाराजाच्या चरनाला

गुरूच्या पूजनाला । मजला नाहीं बळ
वाहीलं तुळशीदळ । गुरुरायाला माझ्या
प्रपंच साधूनी । परमार्थ साधीयेले
शेवटीं देव झाले । समर्थ गुरुराय
देहाचा देवपाट । आत्म्याच्या केल्या वाती
पंच प्राणांची आरती । गुरुरायाला माझ्या

---

## नारायण गडावर

नारायन गडावरी । चला सह्यांनो पाहू महिमा किती
दोही भुजाला दोन हाती । दरवाज्यावर गनपति
वाकडीच्या माळावरी । पालख्याची गर्दी झाली
अंबारीचा हातीं । सोंडानं वारा घाली
नारायन गडावरी । येक चित्तर सोन्याचं
मह्या अंजनाबाळानं । गवंडी लावीलं पुन्याचं
नारायन गडावरी । हाय वाळूचा वटा ग
मह्या भगवान बावाला । कीर्तनाचा नाद मोठा ग
नारायन गडावरी । नाहीं राह्याला जागा ग
सांगतो निरूपन । कोन्या मावलीचा हिरा ग
नारायन गडावरी । उन्ह पडलं पिवळ ग
भगवान सोमी माझा । राजा नेसला सवळ ग
नारायन गडावरी । शिंग वाजते दोहेरी ग
मह्या भगवान बाबाचा । मेना निघाला बाहेरी ग
आले आलेत भगवान । गांवखोरी ग लवनीं
गाईच्या दुधाला । नका घालू धारवनी
माझिया दारामंदी । रांगोळीचा थाट ग
रांगोळीचा थाट ग । हाये परभूची वाट ग

हातीं मह्या बेलतांब्या । वल्ल नारेळ वटीला ग
सोमी महाराजाच्या । जाईन गुरूच्या भेटीला ग
पताकामंधी पताका । येका पताकाला हाये तेज ग
सोमी भगवान बाबा । हाये वंजाऱ्याचं बीज ग

---

## वाटच्या वाटसरा

वाटच्या वाटसरा । तुला कोठं तरी जानं
सांग मह्या बंधुराया । खुशालीचं वर्तमान
वाटच्या वाटसरा । जाय निरोप घेऊनी
मायबाईला माझ्या । सांग वाड्यांत जाऊनी
वाटच्या वाटसरा । पानी प्याव माझ्या घरीं
मायबाई देसायाचं । नांव जातं दूरवरी
वाटच्या वाटसरा । तुला देतें खांडपान
। सांग मला वर्तमान
वाटच्या वाटसरा । तुला वाढितें मी जेवू
मह्या पितीयाचं नांव । घेशील गांवोगांवू
वाटचा वाटसर । बाई मनून गेला
सत्तचा उभा केला । भाईराजस माझा

× × ×

बारीक बाई गळा । वाऱ्यानं ऐकू गेला
वाटच्या वाटसर । घोडा मैदानीं उभा केला
बारीक बाई गळा । इऱ्याची बाई तार
वाटचा वाटसर । उभा राहीला सव्वापहार
वाटचा वाटसर । पानी पुसतो मला
। मोट चाल बारवला

वाटचे बाई वाटसर । पानी पुसती दाटून
गंगा पाराला खेटून । गोइंदा गोइंदा
वाटचा वाटसर । पानी पाहतो दुरून
बाग दिसतो भरून । जाई-मोगऱ्याचा
वाटच्या वाटसरा । व्हय वाटच्या येगळा
माय हारनीच्या पशी । जोव लागला सगळा
वाटचा वाटसर । मला बघून झाला दूर
। वाघासारीखे माझे दीर
वाटच्या वाटसरा । वाटनं जाये उगा
लावनीचा आंबा । नाहीं तुझ्या हाताजोगा

---

## सरलं दळण

सरलं दळन । उरल्या पांच मुठी
व्यंकटेशाच्या दारीं । सोन्याच्या चवकटी
सरलं दळन । हे ग उरला आठवा
माय माझ्या कौसल्याचा । राम हृदयीं साठवा
सरलं दळन । राहीलं सूपकोबीं
गायिले रत्न दोन्ही । राम हे लक्ष्मुमन
सरलं दळन । खालीं राहिली अंजुळ
सोन्याची तुळस । तिला मोत्याची मंजुळ
सरलं पळन । खालीं राहोली वंजळ
मोत्याचे कंवळ । देसाई मायबाई
सरलं दळन । उरले पांच गहूं
येक्या जोडीचे सहा भाऊ । औक्षवान व्हावे
सरलं दळन । राहीलं वरन
एक एक ववी । माझ्या गोताला पुरन

सरलं दळन । सरलं शिराळाला
औक्ष मागतें मुराळयाला । भाईराजसाला माझ्या
सरलं दळन । पीठ भरली परात
देवा भोळया शंकराची । स्वारी आली नगरांत
सरलं दळन । पीठ भरूनी उठावं
देवा गोपाळ किस्नाला । जाऊन सख्याला भेटावं
सरलं दळन । सूप झाडून उभं केलं
माझ्या रामराया । चित्त तुझ्या गावा गेलं
सरलं दळन । घासीं चंदन घासावं
जाऊन मातेला पुसावं । कसा परदेस कठावं
सरलं दळन । मी त आनीक घेनार
देवा नारायनाला । ववी पुरतीं गानार
सरलं दळन । सरती मपली आयका
माझ्या सोबतिनी । नामदेवाच्या बायका
सरलं दळन । जाऊन तुळशीला सांगा
पाचा शबदाची । आरती गाऊ लागा
सरलं दळन । सरल ग सारू जाये
पांची या प्रानांची । आरती ग गुरुराये
सरलं दळन । सरता ग शेवटाला
भय्याच्या ग वाडया । देव काशीचा ग आला
सरलं दळन । गान्याच्या छंदानं
राज्य देलं गोइंदानं । हळदीवरी कुंकू
सरलं दळन । जातं झाडून उभं करा
जात्या ईश्वराच्या । हात जोडून पाया पडा
सरलं दळन । हात खुटयाचे सुटले
। ववी गाऊन उठलें.

# तालखेडचा मारुती

गांव तालखेड । ताडेश्वरी त्याचं नांव
चिरबंदी कोटाखालीं । येकसे माडचा नव्वद गांव
माझ्या माहेरचा । मारोती कारभारी
नारेळाच्या गाड्या । सुटल्या दरबारीं
गाईच्या सेनाचा । सडा टाकीतें मी दाट
देवा माझ्या मारोतीची । माझ्या दारावुनी वाट
मारोती मेढ्या । तू ये माझ्या वाड्या
शेंदराच्या पुड्या । मी टाकीतें पायघड्या
फाटच्या पाऱ्हीं । गंगूबाई झोपी गेली
देवा मारोतीनं । खडा टाकुन जागी केली
फाटच्या पाहारीं । गंगूबाई झोंपीच्या भरांत
देवा मारोतीनं । झारी भरली धारांत
गांव तालखेड । मोठं वस्तीला सुंदर
यशीकड मारवती । मधीं रामाचं मंदीर
रामया गुरु । ज्यानं त्यानं केला
मारोतीराया । पार उतरोनी गेला
माझ्या संकटाला । कोन धांवतो येकला
नेसला पीतांबर । मागं मारोती देखिला
सकाळीं उठोनी । रामराम कोनी केला
देव मार्वती माझा । निजभक्त जागा झाला
गांव तालखेडचा । देव मार्वती काळा
नेनंत्या माझ्या हारी । घाली लवंगाच्या माळा
देवा मार्वतीचा । मला शेजार साजतु
याच्या आंघोळीला । नित्ते चौघडा वाजतू
देवामधीं देव । देव मार्वती खुजा
नेनंत्या माझ्या हरी । पानी घाला दोही भुजा

सकाळीं उठोनीं । सहज निघालें बाहेरी
नजरीं पडली । देव मार्वतीची पायरी
तालखेडच्या पारावरी । ढवळ्या मुंडाशाचे लोक
देव मारवती । लाल बनातीचा योक
अंधाऱ्या रातीचं । भय वाटतं लोकाला
मार्वतीराया । पारीं बसला येकला
येशीच्या बाहेर । कोन पहिलवान आला
देव मारवती । दूध अंजनीच पेला

# शब्दार्थ

## अ

अग्रपूजा = सर्वांच्या आधीं द्यावयाचा मान

अनवाळ = खोडकर

अंग = स्वत:

अंचळ = स्तन

अंजना–अज्ञान–अजाण = नेणंता,

आगत = अगत्य

आठवा = अर्धा शेर (माप)

आधिपुरुष–आदिपुरुष

आर्धी मात्रा–आदिमाता

आभंड = भंडविणारा, त्रास देणारा

आसमान = अथांग, अपार

आसुड = विशिष्ट प्रकारचा चाबुक

आळ = हट्ट, आग्रह, हेका.

आळा–आलंय–आळें = बंधन

इस्तारिलं–विस्तारणें = वाढलें

उगानिगा = व्यवस्था

उडालें = आटलें, नाहींसें झालें.

उलंगणें = उलथून पडणें

उशाचं पायथं = चांगल्या स्थितींतून वाईट स्थितींत जाणें

## क

कणगीच्या शिगा लोटणें = शिगोशिग कणंगी भरणें·

कनडीचा = अडाणी

करारी रंग = पक्का रंग

कंगुऱ्याची = वेलपत्री काढलेली.

काहून–कहाहून-कशाहून = कशासाठीं,

किचरट = किरकोळ, कुरकुर करणारी

कुटारी = बैलांपुढें कडबा, गवत टाकण्याची गव्हाण

कुडता = लहान माप

कुतन = एक प्रकारचा कपडा

केंधा = गोंगाट

## ख

खंगाळणें = खळबळून धुणें

खल्लाळून = कोलाहलानें, मोठ्या आवाजानें

खाकर = नि:सत्व

खातरांत = गणतींत

खेंडपांड = हलकें,

## ग

गजघाट = गडबड, गोंगाट

गर्दी होणें = बुडून जाणें

गुंड = पाणी भरण्याचें मोठें भांडें
गुलवाल = गुलाल
गोदावळी-गोधूळ = गोरज मुहूर्त

### घ

घडनी-गडणी = मैत्रिणी

### च

चरवी-चरुस्थाली = लहान भांडें
चुनखडा = चुणचुणीत, चाणाक्ष.
चुनडी = ठिपके ठिपके असलेलें पागोटें
चोप = उंचावरील वाड्यांत जाण्यासाठीं माती, दगड इ. चोपून बसवून केलेला रस्ता.
चौधरी = आदरार्थी माळीवाचक

### ज

जलाल = तापट स्वभावाची.
जारीला = वठणीला.
जुवा-युगुल = जोडा

### ट

टूक = युक्ति

### ढ

ढाळज-ड्हाळज-देहलि + ज = दाराजवळ आंतून असलेली बैठक

### त

तराडून-तडाडून = ताडताड, मोठ्यानें
तार = ढब, नाद
तिव्हई-तिवई-तिपाई = तीन पाय असलेली अन्नई, हिच्यावर ताट ठेवून जेवतात.
तेजिनी (तेजी पु.) = घोडी

### थ

थारोळें = मोटेंतील पाणी पडण्याची जागा.

### द

दंड = शोभतें
दनाना = आरोळी, आरडा ओरड
दस्तकी = ज्याच्या नांवें वतन असतें तो
दांतवन-दंत + अवन = दांत पक्के राहण्यासाठीं लावतात तें.
दाटून = हटकून, लबाडपणानें
दारं = दांडाचें पाणी वाफ्यांत जाण्यासाठीं केलेलें दार
धाकार = यज्ञ, लग्न, मुंज आदि प्रसंगीं ब्राह्मणांस वाटतात ती दक्षिणा

### ध

धजा देणें = हत्तीस हाकणारे माहूत ‘धजे धजे’ म्हणतात. त्यावरून हत्तीचें डौलांत चालणें

अनुक्रमांक ...२४५८... क्र. ...१४४...
क्रमांक ...९३८... नों: दि: ...30.1.1991



धनीभर–धन्य = समाधान, तृप्ती होईपर्यंत

धंड = धड

धारवनी = दुधांत घालायचें पाणी

### न

नखीं बोटीं = अंगोअंगीं, हाडोहाडीं

नटणें–नठेणें–ठा–स्था = न टिकणें, मागें सरणें.

नांद = चरकांतून पडणारा रस सांठविण्यासाठीं असलेलें मातीचें मोठें पात्र

निचितीनं–निश्चितीनें = सावकाश

नेत–नियत = निश्चित केलेलें, ठरविलेलें, व्रत.

### प

परकोट = गांवाभोंवतींचा तट

पवित्र = दर्भाच्या पवित्राच्या आकाराची सोन्याची मुदी

पहिल्या जोडीची = पहिल्या मिळकतीची

पातर–पात्र = पाचोळा, पातें,

पेरेकरी–पेरें–पर्व = ऊंसांचे टुकडे करणारा

पोरहट = पोरपण

पौर = पुरांतील, नगरांतील स्त्रिया

### ब

बहुपरी = अनेक प्रकार

बहुरें–भंवर–भ्रमर = भोंवतीं फिरणारा, प्रियकर, अथवा 'बोहहरी' = भाट, स्तुति करणारा

बंगई = चौफळा

बुंथी = ओढणी

मराठी ग्रंथ संग्रहालय ... ठाणे शाखा ... ९१०६

भंडार = भंडार, मल्हारीवर उधळायची हळद

भारानं = डौलानं

भारूपण = भारण्याचा गुण, मोहकपणा

भिवसन = बिभीषण, रावणाचा भाऊ.

भुगा भुग्न = मोडलेला, चुरा

### म

महुर = मधुर

महेसर = मयासुर

मंगळीक = मंगल करणारा, वारीक, न्हावी

माथला = मथि = मंथनदंड = रवी

मानीं–मान = प्रमाणांत

मालती = वळवटाचा प्रकार

मुनावले–मौनावले = स्तब्ध झाले

मुंडासें–मुंड+आस = डोक्यावर बसणारें अर्थात् पागोटें

मेढ्या–मेढ–मेढी = आधारस्तंभ

मेनाची वजन = हा अपपाठ असावा. 'मेनाची वज न' आम्हांला मेणाचें तितकें महत्त्व वाटत नाहीं.

मोहोरकी–मुख + राखी = बैलांच्या तोंडाभोंवतीं बांधलेलें वेष्टन.
मोळकरी = मोळ्या बांधणारा

## य

याप–व्याप = चहूंकडून लागलेली ओढ
येद = वेद
येंगणें = रेंघणें, चढणें

## र

रनसोद्या = रणांत शत्रूस शोधून काढून मारणारा.
रहितीला–रयतेला = प्रजेला
रही–लयी = विलीन
रंगाची = अनुरूप, जुळणारी
रेवाई–रेवालिआ = वालुकावर्तः = रेतीची धूळ

## ल

लवलाहे = लवकर

## व

वगर = लहान ओढा, ओहोळ
वज–ओज = शोभा, गंभीरपण, मोठेपण
वरघडी = वरचा पदर
वरनं–वैरण = जात्यांत घालायचा धान्याचा घास
वसु = बैल
वहिमान–महिमान = मोठेपण
वानोळा = शेतांतील पिकाचें अथवा कोणत्याहि वस्तूचें वाण–वानगी म्हणून पाठविण्याचा प्रकार
वावरीं = वावर, शेत, त्यांतील माती, काळी माती

## श

शामगिरी–सामग्री
शिराळाला = हिवशा वेळेस
शेसे–शिष्या

## स

समसम = रुखरुख, सततची काळजी
सरजा = मोठें, उत्तम मोतीं
सरती = शेवटली ओंवी
सवती एवा = सवतीहेवा, सवतीमत्सर
सहिब–स्वयंभू = नैसर्गिक
संभरून–संभ्रमानें, घाईनें
सावा = एक प्रकारचें धान्य
साळकरी = ऊंसावरील चोपट काढणारा, साळणारा
सुडी = कडब्याची विशिष्ट रचना
सुसत = सूं सूं करीत

## ह

हवा = शोभा

REFBK-0009106

REFBK-0009106